वा.सं.
१२२१२
२९६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रमांक ..३१२३१.... वि: ...
क्रमांक ........ नों: दि: ...
कि. क्र. १२३१२
REFBK-0012212
REFBK-0012212



# भारत दर्शन

• २ •

का. कालेलकर

मूल्य : दीड रुपया



कुमार साहित्य माला

.... ५२ ....

श्री : ३१५ [ ६–६१ ]

© १९६१
काका कालेलकर

●

कुमार साहित्य माला : ५२

●

आवृत्ति पहिली
शके १८८३
सन १९६१

●

मूल्य : रु. १–५०



प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्राय. लि. करितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

●

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ,
पुणें २

कुमार साहित्य मालेचें हें एकावन्नावें पुष्प – पुस्तक.

गेल्या सुमारें साडेचार वर्षांच्या अवधींत आम्ही या मालेंतून कुमारांसाठीं एवढें साहित्य देऊं शकलों याबद्दल संतोष बाळगण्याची आमच्या मनाची तयारी नाहीं. उलटपक्षीं या अत्यंत निकडीची गरज असलेल्या क्षेत्रांत आमच्या हातून एवढेंच काम होऊं शकलें याविषयीं असमाधान मात्र वावरत आहे. आणि या कामांत असलेल्या अनेक अडचणी कशा पार करतां येतील याविषयीं चिंताहि आहे.

कुमार साहित्य मालेंतील वेगवेगळ्या प्रकारच्या पांच पुस्तकांना सरकारी पुरस्कार लाभून तीं पारितोषिकपात्र ठरलीं, हें नमूद करतांना आम्हांला थोडा अभिमान वाटला तर तो अनाठायीं ठरूं नये.

कथा-कादंबरीपासून हिमालय-दक्षिण ध्रुवाच्या मोहिमांपर्यंत विविध विषय कुमार साहित्य मालेंत आजवर येऊन गेले आहेत. त्यांत उणीव असलेला एक विषय – आणि तोहि अत्यंत बहारदारपणें व अभिनव रीतीनें या पुस्तकानें मालेंत समाविष्ट झाला याचा आनंद वाटल्यावांचून रहात नाहीं. काकासाहेबांचें प्रस्तुत ( आणि अशीं तीन ) पुस्तक वास्तविक यापूर्वींच मालेंतून प्रसिद्ध झालें नाहीं याची मात्र रुखरुख वाटते.

इतकीं जिवंत, रसरशीत, समृद्ध आणि रसिकतेनें नटलेलीं प्रवासवर्णनें वाचूनहि ज्याच्या मनांत आपल्या मातृभूमीचें 'दर्शन' करावें अशी उत्कट इच्छा उत्पन्न होणार नाहीं व ज्याच्या हातून तदनुसार कृति घडणार नाहीं असा कोणी उरेल अशी कल्पनाच आम्ही करूं शकत नाहीं.

– प्र का श क.

# भारत-दर्शन

## दुसरा खंड

## दक्षिण भारत


१. कर्नाटक

२. बाहुबली

३. जोगचा धबधबा

४. गोकर्ण

५. आंध्राची सौंदर्यधानी

६. दोन मद्रासी बहिणी

७. दक्षिणेच्या टोंकास

८. वेदांची धात्री तुंगभद्रा

९. सोन्याची खाण

१०. नंदीदुर्ग

११. दक्षिण भारताचें उत्तुंग काव्य

क्र. ९२३१२
... शाखा ... प्रत

# कर्नाटक

१

कित्येक प्रांतांविषयीं एरवीं मी उदासीन असतों. पण त्या प्रांतांत जेव्हां जावें लागतें आणि तेथल्या लोकांत मिसळण्याचा प्रसंग येतो तेव्हां ती उदासीनता वितळून जाते. तथापि कित्येक प्रांतांविषयीं तेथें गेलों काय नि न गेलों काय मनांत प्रेमाचा उमाळा असतोच. यांपैकीं कर्नाटक एक प्रांत आहे. त्या प्रांताचा कांहीं अपराध नसतां त्याचे तुकडे पडले आहेत, यामुळेंहि कदाचित् माझ्या हृदयांत त्याला विशेष स्थान मिळालें असावें. तेथले लोक आपल्या लाभहानींचा फारसा विचार न करतां आपल्या आवडी-नावडीला वश होऊन जातात हें एक किंवा तेथलें प्राकृतिक दृश्य विशेष काव्यमय आहे हेंहि कदाचित् माझ्या अनुकूल ग्रहाचें कारण असावें. कांहींहि असो. कर्नाटकाविषयीं नेहमीं माझ्या मनांत वात्सल्यभाव वसत असतो.

तसें पहातां कर्नाटकाचे कांहीं स्वाभाविक तुकडे पडतात. पश्चिमगिरीखालचा कानड्याचा प्रदेश मुळांतच निराळा आहे. तेथल्या निसर्गाचा स्वभाव देखील निराळा आणि माणसांचाहि निराळा. लोकांच्या स्वभावाचें वळण मुंबईकडे, कोंकणाकडे आणि केरळ प्रांताकडे विशेष आहे. आणि जर सामुद्रिक वाहतुकीचा धंदा वाढेल तर काठेवाड ते कन्याकुमारीपर्यंतचा सारा प्रदेश सहज एक होऊं शकेल. परंतु निसर्गापेक्षां भाषा अधिक प्रभावशाली असते. केवळ भाषेमुळेंच कुर्ग जणुं एक स्वतंत्रच भूमिभाग आहे असें वाटतें. आणि राज्यव्यवस्थेमुळें म्हैसूर देखील एक स्वतंत्र प्रांत आहे अशी छाप मनावर पडते. पण जेव्हां आपण तटस्थपणें विचार करतों तेव्हां जेथें जेथें कन्नड भाषा बोलली जाते तो तो सारा प्रदेश एक झाला पाहिजे असें मानण्याकडे कल होतो. कर्नाटकाची संस्कृति शेजारच्या प्रांतांच्या संस्कृतीपेक्षां विशेष भिन्न आहे असें नाहीं. दक्षिण महाराष्ट्राच्या, कर्नाटकाच्या व तामीळनाडच्या लोकांची रहाणी, करणी, राग, द्वेष

आणि चेहरे देखील सारखेच वाटतात. कन्नड साहित्यांतील कांहीं प्रकार मराठीहून निराळे आहेत. कर्नाटकी संगीतांत देखील हृदयाला जागृत करण्याचें जास्त कसब आहे हें खरें. पण येवढ्यावरून सगळी संस्कृति निराळी आहे असें म्हणतां येणार नाहीं. तरीहि मला असें वाटतें कीं, जे लोक एकच भाषा बोलतात त्यांचें जीवन स्वाभाविक रीत्या एक होतें. भाषेमुळें आपलेपणा उत्पन्न होतोच.

कर्नाटकांत रहाणारे लोक एका जातीचे आहेत असें नाहीं. एक भाषा असूनहि धर्मामुळें, जातीमुळे आणि राज्यतंत्रामुळें जीवन एक होऊं शकत नाहीं. हीं तिन्ही तत्त्वें दाबून टाकून जेव्हां लोकांचें सामाजिक जीवन एकाच प्रवाहांत वाहविण्याची शक्ति उत्पन्न होईल तेव्हांच कन्नड भाषा बोलणारे लोक एकजीव होतील.

हिंदुस्थानांत लहान लहान राज्यें आणि लहान जातींमुळें प्राचीन काळापासून अशी एक संकुचित वृत्ति रूढ झाली आहे कीं, जातिभेदाबरोबर भिन्न भिन्न जातींतील द्वेषहि फार जुन्या काळापासून आपल्या देशांत चालत आला आहे. बिचाऱ्या राजा भर्तृहरीनें वैतागून म्हटलें आहे कीं, जेथें जाति आहेत तेथें समाजाला जाळण्यासाठीं दुसऱ्या अग्नीची जरूरीच काय ? – " ज्ञातिश्चेत् अनलेन किम् । " याच संकुचितपणामुळें प्रांतीय भेदाबरोबर प्रांताप्रांतांतील द्वेषाचें वातावरणहि आपोआप तयार होतें.

आपले तुकडे झाल्याबद्दल कर्नाटक दुःखी आहे. सबंध कर्नाटक जोंपर्यंत एक होत नाहीं तोंपर्यंत तो चिडलेला असणें स्वाभाविक आहे. जर त्यानें शेजारच्या प्रांतांना दुखविलें तर त्याबद्दल त्याला क्षमा केली पाहिजे.

केवळ न्यायासाठीं देखील कर्नाटकाचें एकीकरण तावडतोब झालें पाहिजे. परंतु देशाकडून तसें करून घेण्यासाठीं सबंध कर्नाटकाचें सार्वजनिक जीवन अखंड आणि समृद्ध झालें पाहिजे. अखिल कर्नाटक ज्यांत समाविष्ट होऊं शकेल अशा अनेक संस्था तेथें निर्माण झाल्या पाहिजेत.

कोणतीहि शुभकामना सिद्ध करावयाची तर यासाठीं अधिकाधिक लोकांचे आशीर्वाद मिळाल्यास चांगलें आणि हें कर्म जर " सर्वेषां अविरोधेन " होत असेल तर मग सर्वोत्तम !

कर्नाटकाच्या सरहद्दीवरील अमुक तालुके कर्नाटकांत मोडावे कीं मोडूं नये याविषयीं शेजारच्या प्रांतांत मतभेद असतील, परंतु कर्नाटकाच्या एकीकरणाविषयीं कोठेंच मतभेद नाहीं, कोणाचाहि विरोध नाहीं.

मंगळूर आणि बल्लारी हे दोन जिल्हे सोपवून देण्यास मद्रास प्रांताला कांहींच दुःख होणार नाहीं. कर्नाटक जर महाराष्ट्रापासून वेगळा झाला तर महाराष्ट्रीयांना कांहींच दुःख वाटणार नाहीं. निजाम राज्यांतील कानडी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या वांटणीबद्दल थोडीशी अडचण भासेल खरी. म्हैसूर राज्यांत तर सगळे कन्नड भाषा बोलतात. त्यामुळें कर्नाटकाच्या एकीकरणापासून म्हैसूरच्या लोकांचें नुकसान तर होणार नाहीं उलट फायदाच होईल.

कुर्गसारखा लहानसा टापू कर्नाटकांत मिळावा हें योग्य आहे. परंतु हें जबरदस्तीनें होतां कामा नये. कुर्गच्या लोकांना जेव्हां वाटेल तेव्हां त्यांनीं मिसळून जावें अशी भूमिका तयार करून ठेवली पाहिजे. मुंबईवालें कर्नाटक, म्हैसुरी कर्नाटक, कुर्ग आणि निजाम राज्याचे कन्नड जिल्हे हे चार स्वतंत्र विभाग एक होणार नाहींत तोंपर्यंत कर्नाटकाचें एकीकरण झालें असें म्हणतां येणार नाहीं.

अनेक वेळां निरनिराळ्या कारणांमुळें जवळ जवळ सबंध कर्नाटक मी फिरलों आहें. आतां आतां धारवाड जिल्ह्यांत हिंडलों. त्यापूर्वी मंगळूर आणि कारकळच्या आसपासचा प्रदेश पाहिला. म्हैसुरांतहि घाईघाईनें तीन-चार वेळां गेलों आहें. बेळगांव-धारवाडांत तर माझें बालपण गेलें! बल्लारीकडे फारसा फिरलों नाहीं. तरी हॉस्पेट-हम्पीकडे जाऊन विजयनगरच्या साम्राज्याचे भग्नावशेष भग्न हृदयानें पाहिले आहेत. निजामी-कर्नाटक पाहिला आहे असें मात्र म्हणतां येणार नाहीं.

पूर्ण स्वराज्य स्थापन होईल आणि देशी संस्थानांचा प्रश्न सुटेल तेव्हांच कर्नाटकाचें संपूर्ण एकीकरण होईल. तोंपर्यंत कर्नाटकाला आंतरिक संघटना वाढविल्याशिवाय गत्यंतर नाहीं. भाषा आणि साहित्यविकासाच्या बाबतींत म्हैसूर राज्य आणि त्यांचें विश्वविद्यालय कर्नाटकाचें पुढारीपण करूं शकेल.

हे कर्नाटकाविषयींचे माझे सामान्य विचार झाले. परंतु मला हा लेख कांहीं राजकीय उद्देशानें लिहावयाचा नाहीं. मला तर म्हैसूर राज्यांतील प्रवासाचा अहवाल द्यावयाचा आहे.

अनुक्र. 392-39

आम्ही पुण्यावरून तारीख ४ जुलै १९३९ रोजीं रात्रीं निघालों. महाराष्ट्रांत झोंपलों आणि कर्नाटकांत जागा झालों. त्यामुळें आमचा खरा प्रवास ५ जुलै-पासून सुरू झाला असें म्हणतां येईल. बेळगांवला उतरावेंसें फार वाटत होतें. परंतु वेळेच्या अभावीं तसें करूं शकलों नाहीं. नऊ वाजतां धारवाडला पोहोंचलों आणि कर्नाटकाच्या वातावरणांत मिसळून गेल्याचा आनंद झाला. बिहारप्रमाणें कर्नाटकाचे लोक देखील दिसण्यांत सौम्य आहेत. जेथें मतभेद होईल तेथें चर्चेच्या आखाड्यांत उतरण्यापेक्षां आडवळणें घेऊन किंवा मोघम बोलून जर आपला मतभेद दर्शविण्याचें टाळतां येईल, तर तसा प्रयत्न ते जरूर करतील. पण याचा अर्थ असा नव्हे कीं, कर्नाटकाचे लोक भित्रे आहेत. त्यांचें सौजन्य किंवा त्यांची दूरदृष्टि आपला मतभेद स्पष्ट करण्यापासून त्यांना परावृत्त करते. पण मी तर कर्नाटकाचाच आहें. भाषेची थोडीशी अडचण वाटते, तरीहि मी त्या लोकांत सहज मिसळूं शकतों.

पुष्कळ वर्षांनीं धारवाडला आल्यामुळें लहानपणचीं संस्मरणें ताजीं झालीं. १८९९ चे दिवस असावे. धारवाडला आम्ही लाईन-बाजारांत रहात होतों. सरकारी हायस्कुलांत इंग्रजी चौथींत होतों. त्या वर्गाचे शिक्षक आणि तेथलें वातावरण यांच्या आठवणी फारशा चांगल्या नाहींत. पुढें माझा एक भाऊ थेथें प्लेगनें वारला. सरकारी नियमाप्रमाणें आम्हांला प्लेग कॅम्पमध्यें जाऊन रहावें लागलें. तेथील वातावरणाची तुलना तुरुंगांशीं देखील करतां येणार नाहीं. नरक उत्पन्न करण्याची जी शक्ति ईश्वरानें माणसाच्या हातीं दिली आहे, तिचा उपयोग येथें पुरेपूर करण्यांत आला होता. नंतर आम्ही शहराबाहेर झोंपडी बांधून राहिलों. त्या वेळी पाण्यासाठीं विहिरीविहिरीवर जें भटकावें लागत असे, त्याची आठवण येतांच आज देखील थोडक्यांत बचावलों असे भाव मनांत उठतात.

तरीहि धारवाडविषयींचें खोल प्रेम त्या वेळेपासूनच निर्माण झालें आहे. तेथली स्वच्छ, उंच-सखल जमीन, जेथें तेथें छाया पसरविणारे उंच उंच वृक्ष, कानाकोंपऱ्यांत चमकणारे लहान लहान तलाव, लाटांचें अनुकरण करणारी शहराबाहेरील उंचसखल भूमि, मोत्याच्या दाण्यासारखी ज्वारी, मलईदार दूध, हत्तीसारख्या म्हशी आणि राक्षसासारखें काम करणारे तेथले मजूर आणि वड्डर हे सारे त्या वेळेपासूनच माझे आवडते बनले आहेत.

या वेळीं धारवाडला आलों तो तेथल्या वर्धा योजनेची प्रगति पहाण्यासाठीं वर्धा योजनेचे शिक्षक तयार करण्यासाठीं मुंबई सरकारतर्फे धारवाडला एक केंद्र

चालतें. श्री. तट्टी त्याचे मुख्य संचालक आहेत. धारवाड म्युनिसिपालटीतर्फे शहराच्या हद्दींतील एका गांवांत एक प्राथमिक शाळा चालते. ती शाळाच नगर-पालिकेनें शिक्षणानुभव घेण्यासाठीं वर्धा केंद्राला सोंपविली आहे. हीं दोन्ही केंद्रें आम्हीं पाहून आलों. परंतु खास पहाण्यासारखें होतें नरेंद्र नांवाचें एक जुन्या खेड्यांतलें केंद्र. तेथें श्री. मुधोळकर आणि त्यांचे इतर मित्र एकत्र जमून त्यांनीं जवळ जवळ २५ शिक्षकांचें एक केंद्र तीन साडेतीन महिने चालविलें. तेथला उत्साह, तेथली प्रगति आणि राष्ट्रोद्धाराचें वातावरण पाहून आम्हांला खूप संतोष वाटला.

तसे बंगाल, महाराष्ट्र वगैरे प्रांत आपापल्या संगीताच्या बाबतींत प्रसिद्ध आहेतच; तसाच कर्नाटकहि कर्नाटकी संगीताविषयीं प्रसिद्ध आहे. परंतु सामान्य समारंभांतहि मुलें जेव्हां गातात तेव्हां कोणत्याहि प्रांतांपेक्षां कर्नाटकांत रागताल अधिक संभाळला जातो, असें मला वाटतें. त्यामुळें संगीत कर्णकटु होत नाहीं. धारवाडांत आढळांत आलेली आणखी विशेष गोष्ट म्हणजे कानडी वक्ते लांब लांब भाषणें करून वेळ घेत नाहींत.

धारवाडचें काम आटोपून आम्ही हुबळीला गेलों. रस्त्यांतलें सामान्य दृश्य रमणीय होतें. आसपासची जमीन सपाटहि नाहीं आणि डोंगराळहि नाहीं. त्यामुळें दूर दूरपर्यंत शेती आणि बगीचे, झाडें आणि तलाव स्वच्छ व सुंदर दिसतात आणि लाल दगड तर इतके मजेदार असतात कीं, पुन्हां लहान मूल बनून त्यांनीं खिसे भरावे आणि कोवळे कोवळे दगड तोंडांत टाकून चावावेत असें वाटतें. हे दगड आहेतच इतके नाजुक !

माझ्या लहानपणीं धारवाड-हुबळीच्या लोकांना फुलांचा फारसा छंद नव्हता. आज पहावें तर प्रत्येक बंगल्याच्या सभोंवार चांगलीं चांगलीं फुल झाडें दिसतात आणि सृष्टिदेवी देखील बिलकूल कार्पण्य न दाखवितां लोक मागतील तीं फुलें देत असते.

हुबळीहून बंगळूरचा रस्ता म्हणजे एक झोंप ताणण्याचा प्रवास. रस्त्यांत स्टेशनें येतात नि जातात. कानडीचे ,निरनिराळे शब्द कानावर पडतात. परंतु ते अर्धजागृति आणि स्वप्नसृष्टींत विलीन होऊन जातात. आल्मोऱ्याचें 'षष्टि-खात' असें एक प्राचीन नांव आहे. कारण त्या प्रदेशांत साठ तलाव आहेत. म्हैसूर आणि कर्नाटकाला 'लक्षखात' म्हणावें असें मला वाटतें. येथें जिकडे

पहाल तिकडे चांकडी तिकडी परंतु सज्जनांच्या हृदयासारखीं पारदर्शक तळीं सांपडायचींच. पाऊस पडला कीं पाणी इतकें कांहीं लाल होतें कीं, साऱ्या हिंदुस्थाननें संन्यासदीक्षा घेण्याचा निर्णय घेतला तर येथें त्यांचीं वस्त्रें भगवीं बनवितां यावींत !

धारवाड-हुबळीप्रमाणें बंगळूरची माती देखील लाल आहे. त्यामुळें तेथील पुष्कळशा लहानमोठ्या घरांना लाल रंग देतात. पांढरा रंग दिला तर त्याच्यावर लाल माती बसून तो बिघडायचा म्हणून उघड उघड लाल रंग देण्यांतच शहाणपण असल्याचें लोकांना सुचलें असावें.

सप्टेंबर १९३५

# बाहुबली

२

## १. ज्येष्ठ कीं श्रेष्ठ ?

बाहुबली अथवा गोमटेश्वराचें जीवनचरित्र एखाद्या महाकाव्याचा विषय होण्याजोगें आहे. वाल्मीकीचा रावण, व्यासाचा दुर्योधन, मिल्टनचा सैतान — तिन्हीहि भव्य विभूति आहेत. आपल्या दुष्टपणांतहि औदार्य दाखविल्याशिवाय त्या राहूं शकत नाहींत. तिघेहि आपला रजोगुण सोडीत नाहींत. बाहुबली यांच्याहून अगदीं वेगळ्या कोटीचा वीरपुरुष आहे. आपल्या सामाजिक आणि मानसिक शक्तीचा रजोगुणी उत्कर्ष दाखविल्यानंतर तो त्याहिपेक्षां उंच उड्डाण करून सत्त्वगुणांत प्रवेश करतो व आपलें कल्याण करून घेऊन मानव जातीच्या आदरासहि पात्र होतो.

महाराजा ऋषभदेवाला शंभर पुत्र होते. भावाभावांत भांडणें होऊन, त्याचे परिणाम प्रजेला भोगावे लागूं नयेत म्हणून अशी व्यवस्था सुचविण्यांत आली कीं, वडील मुलानें गादीवर बसावें आणि बाकीच्या सगळ्या भावांनीं गृहसंसाराचा त्याग करून परलोकप्राप्तीची साधना करावी.

या व्यवस्थेप्रमाणें अठ्याण्णव भावांनीं दीक्षा घेतली आणि इहलोकांतील महत्त्वाकांक्षा सोडून दिल्या. ज्येष्ठ पुत्र भरत गादीवर बसला. पण त्याचा धाकटा भाऊ बाहुबली हा ठरलेल्या योजनेप्रमाणें वागायला तयारच होईना. त्यानें असा प्रश्न उपस्थित केला कीं, जो ज्येष्ठ व श्रेष्ठ असेल त्यानेंच गादीवर बसावें हें खरें, परंतु ज्येष्ठ जर श्रेष्ठ नसेल तर केवळ वयाला महत्त्व न देतां योग्यता पाहिली पाहिजे. कारण राज्य हें प्रजेच्या हितासाठीं असतें, सुखोपभोगासाठीं नव्हे. भरत ज्येष्ठ असेल पण आपण त्याच्यापेक्षां प्रत्येक गोष्टींत श्रेष्ठ आहों. राज्यगादी आपणांलाच मिळाली पाहिजे.

तंटा सुरू झाला तेव्हां प्रत्येकाला आपली योग्यता सिद्ध करणें भाग पडलें. राजांत कणखरपणा असणें हें सर्व दृष्टींनीं आवश्यक म्हणून या बाबतींत दोघांची कसोटी पहाण्यांत आली. त्यांत बाहुबली श्रेष्ठ ठरला. आपल्या वाक्पटुतेनें जनतेची आराधना करण्याची शक्ति राजाच्या ठिकाणीं असणें आवश्यक आहे. या परीक्षेंतहि बाहुबली श्रेष्ठ ठरला. बुद्धिशक्ति आणि सूचकशक्ति हे गुण राजांत असले पाहिजेत. या चढाओढींत देखील बाहुबलीच जिंकला. सामंतांना अनुकूल करून घेऊन आपलें 'चक्र' स्थापन करणें हें चक्रवर्तीचें खास लक्षण होय. यांतहि चक्रवर्ती भरतापेक्षां बाहुबलीच वरचढ ठरला. राजांत दीर्घ दृष्टि असली पाहिजे. या गुणाच्या बाबतींत देखील बाहुबलीनें आपली योग्यता सिद्ध करून दाखविली. नंतर पाळी आली युद्धाची. राजाराजांतील ईर्ष्येमुळें प्रजेला मरावें लागणें हें न्यायसंगत नाहीं असें सांगून सगळ्या मुत्सद्द्यांनीं सेनायुद्ध करण्यास नकार दिला. दोन भावांचे पक्ष बनून प्रजेंत जेव्हां दोन तट पडतात तेव्हां सबंध जातीचा संहार होतो, हें समजण्याइतकी बुद्धि त्या काळच्या सगळ्याच लोकांत होती. म्हणून द्वंद्वयुद्ध करून निर्णय करावा असें ठरलें. मग काय ! बाहुयुद्ध, दंडयुद्ध, मल्लयुद्ध इ. अनेक प्रकारचीं युद्धें झालीं. बाहुबलीला सहज विजय प्राप्त झाला. सर्व प्रकारें बाहुबलीची श्रेष्ठता सिद्ध झाली. लोक त्याचा जयजयकार करूं लागले. त्यामुळें भरत चिडला आणि त्यानें स्वच्छ अहंश्रेयस् टाकून देऊन भावाला ठार करण्याचा बेत केला. आणि अचानक बाहुबलीवर जिव्हारीं प्रहार केला. भरताचा राज्यलोभ या कोटीला पोहोंचेल ही कोणाला कल्पना नव्हती. तेजस्वी बाहुबली याचा प्रत्याघात केल्याशिवाय कसा राहील ? त्यानें आपली मूठ आवळली आणि एकाच प्रहारांत भरताला खतम करण्यासाठीं हात उगारला. लोकांच्या हृदयांत हाहाकार माजला. आतां भरत मरणार, असें सर्वांना वाटलें. बाहुबलीला तर खात्रीच होती. पण विजयाच्या या क्षणीं बाहुबलीनें तोल जाऊं दिला नाहीं. त्याच्यांत दुर्बलता असती तर तो क्रोधानें आंधळा झाला असता. पण आपल्या शक्तीची पूर्ण जाणीव असल्यामुळें त्यानें तत्क्षणीं क्रोधावर विजय मिळविला. त्यानें असा विचार केला कीं, आपली योग्यता तर सिद्ध होऊन चुकली आहे. केवळ राज्यलोभानें माझा भाऊ पामर बनला आहे. या पामरतेच्या चढाओढींत मीं काय म्हणून भाग घ्यावा ? भावाला मारून राज्य चालविण्यांत मी प्रजेपुढें कोणता आदर्श ठेवूं शकेन ? जाऊं दे तें राज्य आणि जाऊं दे ती बंधुहत्या !

ज्या जोरानें त्यानें मूठ आवळली होती तोच जोर वापरून त्यानें आपलें केशलुंचन केलें आणि त्यागाची दीक्षा घेतली. अकुतोभय होऊन भरत राज्य चालवूं लागला. बाहुबलीनें वैराग्याचा मार्ग पत्करला. रजोगुणांतून सत्त्वगुण प्रकट झाला. महत्त्वाकांक्षेपेक्षां बंधुप्रेम, स्वजनवात्सल्य आणि विरक्ति श्रेष्ठ ठरली.

भरत निर्भय होऊन राज्य करूं लागला आणि बाहुबलीनें परम पुरुषार्थाचा मार्ग धरला !

आध्यात्मिक मार्गांत गुरूला शरण गेल्यानें मार्ग सोपा होतो. अठ्याण्णव भावांनीं जो मार्ग धरला तो मार्ग धरणें आणि भगवान् ऋषभदेवांना शरण जाणें हाच स्वाभाविक मार्ग होता. परंतु मानधन बाहुबलीला त्यांत अडचण भासली. धाकट्या भावांनीं आधीं दीक्षा घेतली असल्यामुळें दीक्षामार्गांत ते वडील होते. आपण उशीरा दीक्षा घ्यावयाची म्हणजे अठ्याण्णव भावांना वंदन हें करावें लागणारच. हें कसें व्हावें ? श्रेष्ठत्व फुकट गेलें आणि ज्येष्ठत्वहि घालवून बसणार. हें कसें सहन व्हावयाचें ? त्यापेक्षां आपल्याच तपाच्या जोरावर ज्ञान प्राप्त करून घेणें अधिक चांगलें असें बाहुबलीनें ठरविलें. अशा प्रकारें साधनेच्या मुळांतच दर्प आणि अहंकार आला. या पायावर बाहुबलीनें घोर तपश्चर्या उभारली. स्वतः जेथें उभा होता तेथें वारुळें निघालीं. त्यांत मोठमोठे नाग आणि कृष्णसर्प येऊन राहिले. माधवीलतेनें या वारुळांना भरून टाकलें आणि बाहुबलीचे पाय व बाहू यांवर ती चढली. चराचर जगत् हें अतुल तप पाहून चकित झालें. परंतु बाहुबलीला केवल-ज्ञानाची प्राप्ति झाली नाहीं. तो इरेस पेटला व आपलें तप वाढवीत गेला. अखेर त्या शंभर भावांच्या दोन लाडक्या बहिणी ब्राह्मी आणि सुंदरी ( त्यांनींहि त्यागदीक्षेचा स्वीकार केला होता. ) तेथें येऊन पोहोंचल्या. परिस्थितीचें हार्द स्त्रीहृदय चटकन् ओळखूं शकतें. बहिणींनें भावाला गोड संकेत केला, " बंधुराया, हत्तीवरून खालीं उतरा. " बाहुबलीला आश्चर्य वाटलें कीं आपण उभ्यानें किती तरी काळ तप करीत आहोंत आणि बहिणी आपणाला हत्तीवरून खालीं उतरायला सांगतात हें कसें ? क्षणार्धांत बाहुबलीला भान झालें कीं, आपण अभिमान-अहंकाराच्या हत्तीवर बसलों आहोंत. सगळेच संस्कार नष्ट करण्याचा संकल्प आपण करीत आहोंत, तेथें हा श्रेष्ठ कीं ज्येष्ठ होण्याचा अभिमान कसला !

सबंध विश्वाशीं जेथें ऐक्य साधायचें आहे तेथें अठ्याण्णव भावांशीं ईर्षा काय कामाची ? बाहुबलीला बहिणीच गुरुसमान बनल्या. बाहुबलीचा अहंकार नष्ट झाला. आणि धाकट्या भावांना वंदन करायला तो निघाला. ज्या ठिकाणीं तो उभा होता तेथून पाऊल उचलण्यापूर्वीच केवळ संकल्पामुळें त्याला केवल-ज्ञान झालें आणि तो वीर पुरुष सर्व प्रकारें कृतार्थ झाला ! !

मानवोचित रजोगुणांचें संपूर्ण बल दाखवून आणि आपलें तेज प्रकट करून त्यांतील आपली उणीव ओळखून बाहुबलीनें सात्त्विकतेचें अत्युच्च शिखर गांठलें.

अगदीं खालच्या पायरीपासून सुरुवात करण्यांत कमीपणा नाहीं. परंतु शिखराची यात्रा करतां करतां मध्येंच थांबणें हें दुर्दैव होय. प्रत्येक प्रतापी मनुष्य बाहुबलीच्या जीवनाकडे आकर्षिला हा जाणारच. करणी करून नराचा नारायण बनल्याचें हें उदाहरण प्रत्येक मनुष्याला उच्च स्थितीप्रत नेणारें आहे. मोठमोठ्या कारागिरांनीं बाहुबलीच्या विशाल मूर्ति बनविण्याची महत्त्वाकांक्षा धरली. बाहुबलीच्या जीवनांतला एकूण एक प्रसंग खोदून काढण्यांत कारागिरांनीं आपली सर्व शक्ति ओतली आहे. ह्या नमुन्याचे परम उद्बोधक असे दोन प्रकार दक्षिण भारतांत आहेत. ह्या मूर्तींच्या सौंदर्यावरून त्याचें नांव 'गोमटेश्वर' असें पडलें आहे.

१९२५ मध्यें मी कारकळला गेलों होतों. तेथील टेकडीवर बाहुबलीची पंचेचाळीस फूट उंच मूर्ति पाहिली. यंदा जुलै महिन्यांत श्रवण-बेळगोळ येथील साठ फूट उंचीची मूर्ति पाहून आलों आहे. पश्चिम किनाऱ्यावर मंगळूर आणि उडपीमालपेच्या काटकोनांत कारकळ वसलें आहे. तर श्रवण-बेळगोळ म्हैसूर संस्थानांतील हसन जिल्ह्यांत चंद्रगिरी आणि विंध्यगिरीच्या मध्यें आहे. श्रवण-बेळगोळ्याची मूर्ति विंध्यगिरीच्या शिखरांतूनच कोरून काढलेली आहे, तर कारकलची मूर्ति टेकडीच्या दगडाहून भिन्न प्रकारच्या दगडाची दुरून बनवून आणून टेकडीवर उभी करण्यांत आली आहे. हें सर्व कसें केलें गेलें असेल ह्याचा विचार करणेंहि आज कठीण आहे. श्रवण-बेळगोळच्या दर्शनाचा आनंद ताजा आहे. तेव्हां तो शब्दबद्ध करून मित्रांपुढें ठेवण्याचा विचार आहे.

## २. श्रवण-बेळगोळ

हिंदुस्थानांत म्हैसूर संस्थानला एका विशिष्ट अर्थानें सुवर्णभूमि म्हणतां येईल. उरगाम कोलारच्या सोन्याच्या खाणींतून दरवर्षी कोट्यवधि रुपयांचें

सोनें निघतें. यावरून ती सुवर्णभूमि आहे, असें म्हणतां येईलच. पण तेथील उत्तम सुपीक जमीन, ठिकठिकाणचे चमकणारे तलाव, मध्यें मध्यें पावसाला पकडून आणणारे मोठमोठे डोंगर आणि त्यांतलें अमृतजल पाजणाऱ्या नद्या, सांजसकाळ अनेक रंग आणि आकार धारण करणारे ढग आणि सुदृढ शरीरें असलेले व आतिथ्यशील हृदयाचे तिथले शेतकरी, या सर्वांना पाहून म्हैसूर संस्थानाला सुवर्णभूमि हेंच नांव यथार्थ वाटतें. म्हैसूर संस्थानाचे दोन मोठे विभाग आहेत. पश्चिमेकडील भागाला मालनाड म्हणजे डोंगरी मुलूख असें म्हणतात आणि पूर्वभागाला मैदानाचें नांव देण्यांत आलेलें आहे. दोन्ही भागांत लहानमोठीं सुंदर मंदिरें आणि तीर्थस्थानें विखुरलेलीं आहेत. प्राचीन काळची समृद्धि, सुव्यवस्था, सात्विक पुरुषांची भक्ति आणि जनतेचे धार्मिक उत्सव या सर्वांचीं साक्षी बनलेलीं हीं ठिकाणें म्हैसूर प्रदेशाचें इतिहासधन आहेत. परंतु त्यांतहि हासन जिल्ह्यांतील तीन ठिकाणें म्हैसूरला भारतविख्यातच काय पण जगद्विख्यातहि बनविणारीं झालीं आहेत. उत्कल प्रांतांत पुरी, भुवनेश्वर, कोनार्क इत्यादि ठिकाणें, अबू पर्वतावरील देलवाड्याचीं मंदिरें, नर्मदाकांठचीं असंख्य देवालयें, तामीलनाडमधील आजहि भरभराटींत असलेलीं भव्य मंदिरें – या सर्व हिंदुस्थानच्या स्थापत्यसमृद्धीमुळें जगाचें लक्ष आपल्या देशाकडे अधिकाधिक आकर्षिलें जात आहे. अजिंठ्याची चित्रकला आणि बेलूर हळेबीडचें मूर्तिविधान संबंध जगांत अजोड आहे असें कलारसिक म्हणूं लागले आहेत. बेलूर व हळेबीड हासन शहराच्या उत्तरेस एकमेकांपासून दहा-बारा मैलांच्या अंतरावर आहेत. एका काळीं हीं दोन्हीं ठिकाणें राजधानी म्हणून प्रसिद्ध होतीं. आज तीं मोडकळीस आलीं असलीं तरी भारतवर्षाची कलाधानी म्हणून वर्धमान ख्याति मिळवूं लागलीं आहेत. दोन्ही ठिकाणच्या आसपास जैन मंदिरें आहेत. त्यांना तेथें 'बस्ती' असें म्हणण्यांत येतें. सगळ्या बस्ती दिगंबर संप्रदायाच्या आहेत. आणि त्यांतील कारागिरी उच्च कोटीची आहे. या प्रदेशांतील गांवोगांव पडलेल्या मूर्ति आणि कारागिरीचे खंडित झालेले दगड जर एकत्र करून ठेवण्यांत येतील, तर राष्ट्राला अभिमान वाटण्यासारखें एक अद्‌भुत संग्रहालय तयार होईल. परंतु हें काम इतकें दुर्घट आणि खर्चाचें आहे कीं, साध्यासुध्या संस्थानाला तें झेपणें शक्य नाहीं. बेलूरच्या मंदिरांत म्हैसूर संस्थानातर्फे विजेची सोय झाल्यामुळें तेथील कारागिरी डोळे भरून पहाण्याची सोय झाली

आहे. या मंदिराविषयीं थोडक्यांत लिहितांच येणार नाहीं. आज हासनच्या पश्चिमेला चार तासांच्या मोटारच्या रस्त्यावर श्रवण-बेळगोळ म्हणून जें गांव आहे त्याविषयीं मला लिहावयाचें आहे. आणि विशेषतः विंध्यगिरीवरील श्रीगोमटेश्वराच्या प्रचंड मूर्तीविषयीं !

महिषमंडळ किंवा म्हैसूरचा उल्लेख अशोकाच्या शिलालेखांत आहे. असें म्हणतात कीं, अशोकाचे आजोबा चंद्रगुप्त आपले गुरु भद्रबाहु यांना बरोबर घेऊन आपल्या आयुष्याचे अखेरचे दिवस घालविण्यासाठीं येथें आले होते. आपल्या राज्यांत पडलेल्या बारा वर्षांच्या दुष्काळांतून आपण आपल्या प्रजेला वांचविण्यास असमर्थ आहोंत असें पाहून त्यांनीं राज्यत्याग केला आणि आपल्या मुलास गादीवर बसवून आपल्या गुरूसह जैनांच्या या तपोभूमींत रहाण्याचें ठरविलें. गुरूनें आपला वृद्धापकाळ आलेला पाहून संलेखना करून चंद्रागिरीवर देहत्याग केला. चंद्रगुप्तानें आपल्या गुरूच्या पादुकांची बारा वर्षें पूजा केली आणि शेवटीं आपणहि संलेखना करून इहलोकींचें कार्य संपविलें !

कांहीं असें म्हणतात कीं, येथें आलेला चंद्रगुप्त अशोकाचा आजा मौर्य-वंशी चंद्रगुप्त नसून समुद्रगुप्ताचा मुलगा दुसरा चंद्रगुप्त होता. या समजुती-मागें सबळ ऐतिहासिक पुरावा असला तरीहि चंद्रगिरीवरील शिलालेखावरून वाटतें कीं, तो मौर्यच होता. हें खरें असल्यास अशोकाच्या शिलालेखांत आपल्या आजोबाचा उल्लेख कां नसावा असा एक मोठा प्रश्न निर्माण होतो. चंद्रगुप्तानें जैन धर्माची दीक्षा घेतली असावी. यामुळें अशोकानें त्याची उपेक्षा केली असेल किंवा मौर्य चंद्रगुप्त तेथें आलाच नसेल हें कोणी सांगावें ?

चंद्रगिरि आणि विंध्यगिरि या दोन टेकड्या इतक्या जवळ जवळ आहेत आणि त्यांच्या आसमंतांतला प्रदेश इतका रमणीय आहे कीं, कवींना येथें येऊन बसल्याशिवाय कसें रहावेल ? परंतु या जगाला कंटाळून विरक्त बनून संलेखना करण्यासाठीं बैरागी साधूंनीं असें रमणीय स्थान पसंत करावें हें एक आश्चर्यच आहे. आत्महत्या करण्यासाठीं ज्याप्रमाणें भैरवघाटी निवडतात त्याचप्रमाणें असंख्य जैनांनीं संलेखनेसाठीं चंद्रगिरि पसंत केलें होतें. आज देखील किती तरी दिगंबर साधु या गिरीवर येऊन आपले अखेरचे दिवस पुरे करतात.

१२२१२

या दोन टेकड्यांमध्यें एक सुंदर, स्वच्छ व चौरस तलाव आहे. त्याचेंच नांव 'वेळगोळ' किंवा 'धवल सरोवर.' श्रमण येथें येऊन रहात असल्यामुळें त्याचें नांव श्रमण-बेळगोळ पडलें असावें. आणि पुढें पुढें लोकांनीं त्याचें श्रवण-बेळगोळ असें रूपांतर केलें असावें. बेळगोळ म्हणजे सफेत वांगें असाहि अर्थ होतो. गोमटेश्वराच्या अभिषेकाशीं संबंध असलेल्या एका भक्त म्हातारीच्या नांवाशीं वांग्याचा संबंध आहे. कांहींहि असो; श्रवण-बेळगोळ जैनांचें एक मोठें तीर्थस्थान आहे.

हासनहून आम्ही दुपारीं निघालों. पांच-सहा जणांना बरोबर घ्यावयाचें होतें. त्यामुळें निघतां निघतां बराच वेळ फुकट गेला. तेवीस मैलांची दौड मारून आमची बस चन्नरायपट्टणाला आली. तेथून आठ मैल अंतर कापून आम्ही विंध्यगिरीच्या पायथ्याशीं येऊन पोहोंचलों.

गोमटेश्वराच्या प्रचंड मूर्तीविषयीं पूर्वीच ऐकलेलें असल्यामुळें माझे डोळे तर हासनपासूनच विंध्यगिरीच्या शोधांत होते. चौदा मैल बाकी राहिले असतील तों चंद्रगिरि, विंध्यगिरि दिसूं लागले आणि उंच विंध्यगिरीच्या शिखरावर एखाद्या लहानश्या ठिपक्यासारखा किंवा निशाणाच्या काठीसारखा एक दगड दिसूं लागला. मी खात्री करून घेतली आणि दोन्ही हात जोडून तत्क्षणीं गोमटेश्वराला प्रणाम केला.

कारकळ येथें देखील बाहुबलीची मूर्ति आहे. तिची उंची सत्तेचाळीस फुटांपेक्षां कांहीं कमी नाहीं. तिच्या आसपास कोणतेंच बांधकाम नसल्यामुळें ती मूर्ति खूप दुरूनहि दिसते. श्रवण-बेळगोळच्या जवळपास पहाण्यालायक पुष्कळ ठिकाणें आहेत. आमच्यापाशीं भरपूर वेळ असता तर तीं पाहिल्याशिवाय आम्ही राहिलों नसतों. परंतु सूर्यनारायण विश्रांतीची तयारी करीत होता. सगळेंच पहाण्याचा लोभ धरला तर कांहींच लक्षपूर्वक पहातां येणार नाहीं असा विचार करून आम्ही फक्त गोमटेश्वराचें दर्शन घेऊन परत फिरावें असा निघतांना निश्चय केला होता. सहाशें पायऱ्यांच्या मदतीनें चारशेंसत्तर फूट उंचीची सोपी चढण चढून आम्ही वर पोहोंचलों. पायऱ्यांच्या सुरुवातीलाच एक सुंदर महाद्वार आहे. त्याचें नांव 'गुल्लकायजी बागलु' कानडीत बागलु म्हणजे दरवाजा आणि गुल्लकायजी म्हणजे वांगेंताई अथवा आई.

या गरीब वृद्ध वांगेताईचा थोडासा इतिहास आहे. चामुंडरायानें गोमटेश्वराची मूर्ति खोदविली आणि १०२८ च्या मार्च महिन्याच्या ३ तारखेस रविवारीं त्या मूर्तीला अभिषेक करण्याचें ठरवलें. त्या वेळीं गुल्लकायजी नांवाची एक वृद्धा एका फळाच्या कवचींत अभिषेकासाठीं गायीचें थोडेंसें दूध घेऊन आली. आणि जाणाऱ्या येणाऱ्यांना विनवूं लागली कीं, अभिषेकासाठीं मला एवढें दूध नेऊं द्या. त्या बिचाऱ्या म्हातारीकडे कोण लक्ष देणार ? तिनें रोज सकाळीं गायीचें दूध घेऊन यावें आणि सायंकाळीं अंधार पडल्यावर निराश होऊन परत जावें. असे कित्येक महिने लोटले. अभिषेकाचा दिवस उगवला. लांकडें आणि बांबूचा उंच माचा बांधण्यांत आला. चामुंडराय तर राजाचा आवडता सेनापति, लोकांच्या कृतज्ञतेचें केन्द्र ! स्वतः भक्तीची मूर्ति. त्याला दुधाचा तोटा कसा पडेल ? परंतु दुधाचे घडेच्या घडे ओतले गेले तरीहि दूध आणि पंचामृत मूर्तीच्या कमरेपर्यंतहि पोहोंचूं शकलें नाहीं. सगळे घाबरले कीं, कांहीं तरी चूक झाली आहे, कोठें तरी दैव आडवें आलें आहे. अखेर ज्ञात्यांनीं चूक शोधून काढली. वांगेताईला आपलें दूध घेऊन येण्याचें फर्मान निघालें. त्या कवचींत दूध मूर्तीच्या डोक्यावर ओतण्यांत आलें. आणि किती आश्चर्याची गोष्ट ! १० तोळे दूध असेल नसेल, पण तें डोक्यावरून पायापर्यंत पोहोंचलें. इतकेंच काय, पण तें खालीं वाहूंहि लागलें. लोक म्हणूं लागले, “या गुल्लताईचें हृदय खरें भक्तहृदय आहे.” मानसन्मानाची भावना तिला शिवली देखील नाहीं. चामुंडरायानेंहि जाणलें कीं, अखेर इतकी मेहनत, एवढा खर्च आणि हें वैभव एका शिंपलीभर भक्तीसमोर कांहींच नाहीं. त्यानें गुल्लकायजीची एक मूर्ति त्याच टेकडीवर स्थापिली आणि अशा प्रकारें आपली नम्रता जगजाहीर केली. अर्धाअधिक रस्ता आम्ही चढून गेलों आणि ‘अखंड बागलु’ दरवाजा आला.

हा दरवाजा एका अखंड दगडांतून कोरून काढलेला आहे कीं एखादा अवाढव्य दगड ह्या पायऱ्यांच्या मार्गांत व्यत्ययरूप झाल्यामुळें त्याचें तेथून उच्चाटन करण्यापेक्षां त्याला खोदून त्यांतूनच दरवाजा तयार करण्यांत आला आहे ? ह्या बागलुवर गजान्तलक्ष्मी कोरलेली आहे. पद्मासनावर बसलेली लक्ष्मी आणि तिच्या दोहों बाजुंना पाण्याचे घडे भरभरून तिच्यावर अभिषेक करणारे दोन हत्ती. दुसऱ्या एका ठिकाणीं लक्ष्मीच्या एका बाजूला हत्ती आणि दुसऱ्या

बाजूला सवत्स धेनु काढलेली आहे. ह्यांतलें पौराणिक रहस्य समजावून घेणें जरूर आहे.

आम्ही पायऱ्या चढून गेलों आणि भिंतीपाशीं येऊन पोहोंचलों. आतां झटकन् आंत जाऊन बाहुबलीच्या दिगंबर मूर्तीचें दर्शन घ्यायला आम्ही अगदीं उतावीळ झालों होतों. तरीहि वरून मागल्या तलावाचें आणि समोरच्या चंद्रगिरीचें दर्शन घेण्याची इच्छा आम्हांला दाबतां आली नाहीं. वारा अगदीं सोसाट्याचा सुटला होता. आम्हांला स्थानभ्रष्ट करण्याची संधि मिळाली असती तर तसें करण्यास त्यानें मागेंपुढें पाहिलें नसतें. सूर्याजी भास्कर ढगांच्या आडून आपले हात लांबवून आम्हांला गोंजरतां येईल कीं नाहीं तें अजमावीत होते. आणि खुद्द पर्जन्याची स्वारी समोर उभी राहून स्वमुखानें आश्वासन देत होती कीं, " घाबरूं नका, तुम्ही दर्शन घेऊन परत आपल्या मोटारींत बसेपर्यंत मी कांहीं कोसळत नाहीं. "

आम्ही पुन्हां वर चढूं लागलों, तों गुल्लकाय बागलू ( दरवाजा ) नें आम्हांला बजावलें, " केवळ दर्शक म्हणून, टूरिस्ट म्हणून वर जाऊं नका; हिंदु आहांत, आत्मार्थी आहांत, श्रद्धावान् आहांत, भक्त आहांत ! यात्रेकरू म्हणून जा, मूर्तींत व्यक्त होणाऱ्या चैतन्याचें दर्शन घ्यायला जा ! "

अर्ध्या रस्त्यावर पोहोंचलों तों ' अखंड बागलू ' म्हणतो, " शैव आणि वैष्णव, शाक्त आणि जैन सगळे भेद नांवाचेच आहेत. व्यर्थ आहेत. भारताची संस्कृतिलक्ष्मी एक आहे, अखंड आहे, बलशाली आहे. त्या एकत्वाचा जेव्हां साक्षात्कार होईल तेव्हां भरतपुत्र बाहुबली बनतील आणि आत्मविजयाच्या द्वारें विश्वविजय मिळवून विश्वकल्याणाची मुहूर्तमेढ रोवतील. "

हा संदेश मिळाल्यावर प्रेरणेचे पंख लावून आम्ही वर चढूं लागलों आणि त्यामुळेंच कठीण चढावाचा आम्हांला शीण वाटला नाहीं.

## ३. चामुंडरायाचा शोध

एका राजपुरुषाची माता धर्मनिष्ठ होती. तिनें बाहुबलीची कथा ऐकली. रजोगुणांतून सत्त्वगुणाचा उदय कसा झाला, अभिमानाच्या फत्तरांतून आत्म-परिचयाची अभिव्यक्ति कशी झाली ह्याची कथा ऐकून तिच्या हृदयांत श्रद्धेचा झरा फुटला. तिला वाटलें, बाहुबलीचें दर्शन घडलें नाहीं तर हें जीवन व्यर्थ

आहे. कोणीं तरी तिला सांगितलें कीं, कोठें तरी बाहुबलीची हजार हात उंच आणि सुवर्णमयी अशी मूर्ति आहे. तिनें त्या मूर्तीच्या दर्शनाचा ध्यास घेतला. मुलाला समजून चुकलें कीं, जर आई आपणाला जिवंत रहायला हवी असेल तर बाहुबलीच्या मूर्तीचा शोध लावल्याशिवाय गत्यंतर नाहीं. राजपुरुष क्षत्रिय होता; चतुरंग सेना घेऊन निघाला. चारी दिशा पालथ्या घालायचें त्यानें ठरवलें. ' माझे लाखों सैनिक आहेत. चारी दिशांना व्यापून टाकतील. मग हजार हात उंच मूर्ति कोठें दडी मारून बसणार ? केव्हां तरी ती सांपडणारच ! माझ्या मातेचे डोळे कृतार्थ होतील. आणि मी सुपुत्र म्हणविला जाईन. '

सैन्यासह फिरत फिरत तो दक्षिण दिशेस आला. तेथें एका जैन मुनीनें त्याला हटकलें, " हे शूरवीर, इतकी सेना घेऊन तूं कशासाठीं निघाला आहेस ? कोणता देश पादाक्रान्त करावयाचा आहे ? किती घरांत हाहाकार माजवाव-याचा आहे ? करभाराबरोबरच किती हृदयांचे शाप वसूल करायचे आहेत ? "

राजपुरुष उत्तरला, " मला यांपैकीं कांहींहि करावयाचें नाहीं. मी गोमटे-श्वराचें दर्शन घ्यायला निघालों आहें. माझ्या मातेला त्याच्या दर्शनाचा ध्यास लागला आहे. "

साधु म्हणाला, " ती मूर्ति आहे खरी, पण इहलोकांत नाहीं. लाख लाख यक्ष तिचें रक्षण करीत आहेत. कोणत्याच मानवाला तिचें दर्शन घडूं शकलेलें नाहीं. परंतु बाहुबली तुला गोमटेश्वराचें दर्शन करवील. ह्या चंद्रगिरींत बरेच जैन साधु तप करीत आहेत. त्यांच्यासमोर तो विंध्यगिरि आहे. त्याच्या शिखरावर बाहुबली उभा राहून तप करीत आहे. दुनियेंतील दुःख पाहून तो कारुण्यपूर्ण नजरेनें म्हणत आहे,

' कामये दुःखतप्तानां प्राणिनामार्तिनाशनम् '

ह्या चंद्रगिरीच्या शिखरावरून जर तूं सोन्याचा एक बाण सोडशील तर बाहुबलीची मूर्ति तेथें दृग्गोचर होईल. "

राजपुरुषानें रत्नखचित धनुष्य हातीं घेतलं. तीन हात लांब सोन्याचा बाण धनुष्यावर चढविला. सुंसूं करीत बाण हवा कांपीत निघाला. विंध्य-गिरीचें शिखर हाललें. दगडाचे पट गळून पडले. आणि मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा यांचा ब्रह्मविहार दर्शविणारें गोमटेश्वराचें मस्तक प्रकट झालें. राज-पुरुष आनंदानें देहभान विसरला. त्याच्या मातेच्या डोळ्यांतून घळघळ अश्रु

वाहूं लागले. लगेच असंख्य मूर्तिकार तेथें येऊन पोहोंचले. प्रत्येकाच्या हातांत हिऱ्याची छिनी होती. तें बाहुबलीच्या मस्तकाचें दर्शन करीत आणि आजू-बाजूंचे दगड फोडीत जात. खांदे उघडे झाले; छाती उघडी पडली; बाहूंवर, विशाल बाहूंवर लपेटलेली माधवीलता स्पष्ट दिसूं लागली. ते पायांपर्यंत येऊन पोहोंचले. तेथें प्राचीन वल्मीक ( वारूळ ) होतें. त्यांतून महाभुजंग बाहेर पडूं लागले. परंतु अगदीं अहिंसक. मूर्तिकार अगदीं पावलापर्यंत आले. पावलांचीं नखें चमकूं लागलीं. त्यांच्याखालीं एक कमळ उगवलें. तें पाहून सेनेसकट सगळ्यांचीं वदनकमळेंहि विकसित झालीं. भक्तमातेचें हृदयकमळ प्रफुल्लित झालें. आतां तिला अधिक जगण्याची लालसा उरली नाहीं. तिनें कृतार्थ होऊन आपलें जीवनकमल तेथल्या तेथेंच प्रभूच्या चरणकमलीं अर्पण केलें.

आकाशांतून पुष्पवृष्टि झाली. सगळेच धन्य धन्य म्हणूं लागले. काय त्या मूर्तीची अंगकांति ! दिगंबर आणि पवित्र, मोहक आणि पावक, तारक आणि उद्धारक ! ! जितक्यांनीं त्या मूर्तीचें दर्शन घेतलें, जणुं त्या साऱ्यांचा पुनर्जन्मच झाला. ते नव्या नजरेनें – बाहुबलीच्या कारुणिक नजरेनें – जगाकडे पाहूं लागले. त्यांचे राग-द्वेष जणुं वितळून गेले. त्यांच्या हृदयांत नव्या सात्त्विक आनंदाचा झरा फुटला. आणि ते सारे ' जय गोमटेश्वर, जय गोमटेश्वर 'चा जयध्वनि करूं लागले !

## ४. गोमटेश्वर

आम्ही जेव्हां बाहुबलीच्या दर्शनाला गेलों तेव्हां शास्त्रमर्यादा ध्यानांत धरून मूर्तीचें आपादमस्तक पुनः पुन्हा दर्शन घेतलें. मूर्तीच्या चरणांच्या दोन बाजूंना दोन लेख कोरलेले आहेत. एकीकडे जुन्या नागरी लिपींत आणि दुसरीकडे कानडी लिपींत. परंतु दोन्ही ठिकाणी एकच मराठी वाक्य आहे. ' चामुंडरायें करवियलें '. मराठी भाषेचे इतिहासकार म्हणतात कीं, मराठी भाषेत लिहिलेल्या ग्रंथांत आणि शिलालेखांत हें वाक्य जुन्यांत जुनें आहे. आजच्या माहितीप्रमाणें मराठीचा प्रारंभ झाला तो याच वाक्यानें. चामुंडरायांचे वडील देवीभक्त असावेत. कारण आपल्या मुलाचें नांव त्यांनीं चामुंडा देवीवरून ठेवलें. एका शाक्ताचा मुलगा अहिंसामार्गी जैन धर्माचा उपासक झाला, असेंहि त्या काळचा इतिहास सांगतो. मराठी भाषेच्या बालपणीं दोन लिप्यांचा

आहे. कोणीं तरी तिला सांगितलें कीं, कोठें तरी बाहुबलीची हजार हात उंच आणि सुवर्णमयी अशी मूर्ति आहे. तिनें त्या मूर्तीच्या दर्शनाचा ध्यास घेतला. मुलाला समजून चुकलें कीं, जर आई आपणाला जिवंत रहायला हवी असेल तर बाहुबलीच्या मूर्तीचा शोध लावल्याशिवाय गत्यंतर नाहीं. राजपुरुष क्षत्रिय होता; चतुरंग सेना घेऊन निघाला. चारी दिशा पालथ्या घालायचें त्यानें ठरवलें. ‘ माझे लाखों सैनिक आहेत. चारी दिशांना व्यापून टाकतील. मग हजार हात उंच मूर्ति कोठें दडी मारून बसणार ? केव्हां तरी ती सांपडणारच ! माझ्या मातेचे डोळे कृतार्थ होतील. आणि मी सुपुत्र म्हणविला जाईन. ’

सैन्यासह फिरत फिरत तो दक्षिण दिशेस आला. तेथें एका जैन मुनीनें त्याला हटकलें, “ हे शूरवीर, इतकी सेना घेऊन तूं कशासाठीं निघाला आहेस ? कोणता देश पादाक्रान्त करावयाचा आहे ? किती घरांत हाहाकार माजवावयाचा आहे ? करभाराबरोबरच किती हृदयांचे शाप वसूल करायचे आहेत ? ”

राजपुरुष उत्तरला, “ मला यांपैकीं कांहींहि करावयाचें नाहीं. मी गोमटेश्वराचें दर्शन घ्यायला निघालों आहें. माझ्या मातेला त्याच्या दर्शनाचा ध्यास लागला आहे. ”

साधु म्हणाला, “ ती मूर्ति आहे खरी, पण इहलोकांत नाहीं. लाख लाख यक्ष तिचें रक्षण करीत आहेत. कोणत्याच मानवाला तिचें दर्शन घडूं शकलेलें नाहीं. परंतु बाहुबली तुला गोमटेश्वराचें दर्शन करवील. ह्या चंद्रगिरींत बरेच जैन साधु तप करीत आहेत. त्यांच्यासमोर तो विंध्यगिरि आहे. त्याच्या शिखरावर बाहुबली उभा राहून तप करीत आहे. दुनियेंतील दुःख पाहून तो कारुण्यपूर्ण नजरेनें म्हणत आहे,

‘ कामये दुःखतप्तानां प्राणिनामार्तिनाशनम् ’

ह्या चंद्रगिरीच्या शिखरावरून जर तूं सोन्याचा एक बाण सोडशील तर बाहुबलीची मूर्ति तेथें दृग्गोचर होईल. ”

राजपुरुषानें रत्नखचित धनुष्य हातीं घेतलें. तीन हात लांब सोन्याचा बाण धनुष्यावर चढविला. सुंसूं करीत बाण हवा कांपीत निघाला. विंध्यगिरीचें शिखर हाललें. दगडाचे पट गळून पडले. आणि मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा यांचा ब्रह्मविहार दर्शविणारें गोमटेश्वराचें मस्तक प्रकट झालें. राजपुरुष आनंदानें देहभान विसरला. त्याच्या मातेच्या डोळ्यांतून घळघळ अश्रु

वाहूं लागले. लगेच असंख्य मूर्तिकार तेथें येऊन पोहोंचले. प्रत्येकाच्या हातांत हिऱ्याची छिनी होती. तें बाहुबलीच्या मस्तकाचें दर्शन करीत आणि आजूबाजूंचे दगड फोडीत जात. खांदे उघडे झाले; छाती उघडी पडली; बाहूंवर, विशाल बाहूंवर लपेटलेली माधवीलता स्पष्ट दिसूं लागली. ते पायांपर्यंत येऊन पोहोंचले. तेथें प्राचीन वल्मीक ( वारूळ ) होतें. त्यांतून महाभुजंग बाहेर पडूं लागले. परंतु अगदीं अहिंसक. मूर्तिकार अगदीं पावलापर्यंत आले. पावलांचीं नखें चमकूं लागलीं. त्यांच्याखालीं एक कमळ उगवलें. तें पाहून सेनेसकट सगळ्यांचीं वदनकमळेंहि विकसित झालीं. भक्तमातेचें हृदयकमळ प्रफुल्लित झालें. आतां तिला अधिक जगण्याची लालसा उरली नाहीं. तिनें कृतार्थ होऊन आपलें जीवनकमल तेथल्या तेथेंच प्रभूच्या चरणकमलीं अर्पण केलें.

आकाशांतून पुष्पवृष्टि झाली. सगळेच धन्य धन्य म्हणूं लागले. काय त्या मूर्तीची अंगकांति ! दिगंबर आणि पवित्र, मोहक आणि पावक, तारक आणि उद्धारक ! ! जितक्यांनीं त्या मूर्तीचें दर्शन घेतलें, जणुं त्या साऱ्यांचा पुनर्जन्मच झाला. ते नव्या नजरेनें – बाहुबलीच्या कारुणिक नजरेनें – जगाकडे पाहूं लागले. त्यांचे राग-द्वेष जणुं वितळून गेले. त्यांच्या हृदयांत नव्या सात्त्विक आनंदाचा झरा फुटला. आणि ते सारे ' जय गोमटेश्वर, जय गोमटेश्वर 'चा जयध्वनि करुं लागले !

## ४. गोमटेश्वर

आम्ही जेव्हां बाहुबलीच्या दर्शनाला गेलों तेव्हां शास्त्रमर्यादा ध्यानांत धरून मूर्तीचें आपादमस्तक पुनः पुन्हा दर्शन घेतलें. मूर्तीच्या चरणांच्या दोन बाजूंना दोन लेख कोरलेले आहेत. एकीकडे जुन्या नागरी लिपींत आणि दुसरीकडे कानडी लिपींत. परंतु दोन्ही ठिकाणीं एकच मराठी वाक्य आहे. ' चामुंडरायें करवियलें '. मराठी भाषेचे इतिहासकार म्हणतात कीं, मराठी भाषेंत लिहिलेल्या ग्रंथांत आणि शिलालेखांत हें वाक्य जुन्यांत जुनें आहे. आजच्या माहितीप्रमाणें मराठीचा प्रारंभ झाला तो याच वाक्यानें. चामुंडरायांचे वडील देवीभक्त असावेत. कारण आपल्या मुलाचें नांव त्यांनीं चामुंडा देवीवरून ठेवलें. एका शाक्ताचा मुलगा अहिंसामार्गी जैन धर्माचा उपासक झाला, असेंहि त्या काळचा इतिहास सांगतो. मराठी भाषेच्या बालपणीं दोन लिप्यांचा

उपयोग होत असावा. मराठी आणि कन्नड, ज्या काळीं सख्ख्या बहिणींप्रमाणें रहात होत्या त्या काळींच हा शिलालेख तयार करण्यांत आला असावा.

चामुंडराय राजपुरुष होता. त्याची भाषा मराठी असून देखील प्रजेंतील दोन्ही लिप्यांचा तो पुरस्कर्ता होता. माझ्या मधुर, भोळ्या 'मऱ्हाठी' भाषियेचें हें द्विविध दर्शन घेऊन मी सद्‌गदित झालों. आणि मराठी भाषेचा उगम येथें झाला या विचारानेंच महाराष्ट्री गिरेच्या या गंगोत्रींत न्हाऊन मी पावनहि झालों.

मग माझें लक्ष वारुळांतून निघणाऱ्या मोठमोठ्या नागांकडे गेलें. पोलादी तलवारीला पारसमण्याचा स्पर्श झाल्यावर बनलेल्या सोन्याची तलवार आकारानें तलवारच रहाते. पण कोणाची हत्या करण्याची शक्ति तिच्यांत रहात नाहीं. उलट कोणावर प्रहार करूं गेल्यास स्वतःच खंडित होऊन आपलें सुवर्णपण जाहीर करते. तसें कारुण्यमूर्ति अहिंसाधर्मी बाहुबलीच्या चरणाशीं स्थान पावलेले ते महाव्याळ अगदीं अहिंसक बनले आहेत. आणि आपली फणा पसरून जणुं साऱ्या जगाला अभयदान देत आहेत.

नजर थोडी वर वळली तों दोन्हीकडून दोन माधवीलता महापराक्रमी बाहुबलीच्या आधारानें आपली उन्नति साधत असलेल्या दिसल्या. एखाद्या धीरोदात्त नायकाला लतेसारख्या नायिकेनें आलिंगन द्यावें तसें या माधवीलतेनें त्या साधनवीराला वेढून टाकलें आहे. त्या लतेनें म्हटलें असावें, "ह्या तपोवीराची मी काय सेवा करूं शकेन! माझें काम केवळ त्याची कठोर तपस्या झांकून टाकून त्यांतून जगाप्रीत्यर्थ प्रकट होणारी कोमलता व प्रसन्नता व्यक्त करणें हेंच आहे. बाहुबलीला मीं वेढून टाकलें आहे खरें, परंतु मी त्याचें बंधन नाहीं. बंधमुक्त झालेल्या ह्या मुक्तात्म्याचें हृदय किती कोमल आहे याचा अंगुली-निर्देश करण्यासाठी मी त्याच्या पायापासून हृदयापर्यंत चढलें आहें."

लौकिक शिष्टाचारांत गुरफटलेल्या आपणांला ह्या मूर्तीकडे पहातांच विचार येतो कीं ही मूर्ति नग्न आहे. आपल्या मनांत आणि समाजांत आपण अनेक प्रकारच्या घाणेरड्या गोष्टींचा संग्रह करीत असतों. परंतु आपणांला त्याची चीडहि येत नाहीं किंवा लाजहि वाटत नाहीं. परंतु नग्नतेचें दर्शन घडलें

कीं आपला जीव घाबरतो आणि आपणांस वाटूं लागतें कीं, नग्नतेंत अश्लीलता आहे, त्यांत सदाचाराचा द्रोह आहे, ती लाज वाटण्यासारखी गोष्ट आहे. आपली नग्नता टाळण्यासाठीं कांहीं लोकांनीं आत्महत्याहि केलेली आहे. पण नग्नता खरोखरच इतकी अभद्र आहे काय ? खरोखरीच कुरूप आहे काय ? तसें असतें तर निसर्गालाच त्याची लाज वाटली असती. फुलें नग्न असतात, पशुपक्षीहि नग्न रहातात. निसर्गाशीं असलेलें आपलें एकत्व ज्यांनीं गमावलेलें नाहीं अशीं बालकेंहि उघडीनागडीं हिंडतात. त्यांना त्याची शरम वाटत नाहीं. आणि त्यांच्या निर्व्याजतेमुळें आपणांलाहि त्यांत कांहीं लाज वाटण्यासारखें वाटत नाहीं. लज्जेचें एक वेळ राहूं द्या; पण त्यांत कांहीं अश्लील, बीभत्स, जुगुप्सित, कुरूप, अशोभनीय आहे असा कोणाचाच अनुभव नाहीं. याचें कारण काय ? कारण हेंच कीं, नग्नता प्राकृतिक स्थिति असल्यामुळें स्वभावसुंदर आहे. माणसानें विकृत ध्यान करकरून आपल्या मनाचे विकार ह्या स्थितीला नेऊन पोहोंचविले आहेत आणि त्यांना उलट्या मार्गानें वळविलें आहे; म्हणून स्वभावसुंदर नग्नता त्याला सहन होत नाहीं. दोष नग्नतेचा नसून आपल्या कृत्रिम जीवनाचा आहे. आजारी माणसापुढें परिपक्व फळें, पौष्टिक मेवा आणि सात्त्विक आहार ठेवतां येत नाहींत यांत दोष खाद्यपदार्थांचा नसून मनुष्याच्या आजाराचा आहे. नग्नतेवर आपण पांघरूण घालतों तें नग्नतेच्या दोषामुळें नव्हे तर माणसाच्या मानसिक रोगामुळें. नग्नता लपविण्यांत तिच्याविषयीं वाटणारी शरम नसून त्याच्या मुळाशीं विकारी माणसाविषयींचा दयाभाव आहे – रक्षणवृत्ति आहे. तसें करण्यांतहि जेथें अशी आर्यवृत्ति नसेल तर तेथें केवळ दंभच भरलेला असतो.

परंतु ज्याप्रमाणें नराधमहि बालकांपुढें सौम्य आणि निर्मळ बनतो त्याप्रमाणें पुण्यपुरुषांसमोर, वीतराग विभूतींसमोर तो शमान्वित बनतो. जेथें भव्यता आहे, दिव्यता आहे, तेथें मनुष्यहि विशुद्ध बनत असतो. मूर्तिकारांनीं मनांत आणलें असतें तर माधवीलतेची एक शाखा कमरेपर्यंत नेऊन नग्नता झांकून टाकणें कांहीं त्यांना अशक्य नव्हतें. पण असें कांहीं करणें म्हणजे आपल्या सर्व तत्त्वज्ञानाचा इन्कार करण्यासारखें त्यांना झालें असतें. नग्न मुलें जेव्हां तुमच्यासमोर येऊन उभीं रहातात तेव्हां कात्यायनी व्रत करणाऱ्या मूर्तींप्रमाणें हातांनीं तीं आपली नग्नता झांकून घेत नाहींत. त्यांचा निःसंकोचच त्यांच्या नग्नतेला पवित्र बनवितो. दुसरीं आवरणें त्यांना काय कामाचीं ?

जेव्हां मी गोमटेश्वराची मूर्ति पाह्यला गेलों होतों त्या वेळीं माझ्याबरोबर स्त्रीपुरुष, मुलें, वृद्ध सर्व होते. त्या मूर्तीचें दर्शन घेतांना आम्हांपैकीं कोणालाहि अस्वस्थता वाटली नाहीं. अनुचित वाटण्याचा प्रश्नच नव्हता. मी अनेक नग्न मूर्ति पाहिल्या आहेत. परंतु त्यामुळें मन विकारी बनण्याऐवजीं त्या दर्शनामुळेंच तें निर्विकारी झाल्याचा अनुभव मला आला आहे. आणि मीं अशाहि मूर्ति आणि चित्रें पाहिलीं आहेत की, तीं वस्त्राभूषणांकित असूनहि केवळ विकारप्रेरक आणि उन्मादक वाटलीं आहेत. औपचारिक म्हणून फक्त एखादी लंगोटी नेसणार साधू आपल्याभोंवतीं वैराग्याचें वातावरण निर्माण करूं शकतात. उलट नखशिखान्त वस्त्राच्छादित एखादी व्यक्ति डोळ्यांच्या एका कटाक्षानें किंवा एखाद्या हाव-भावानें माणसाला अस्वस्थ करून सोडते व पतित बनविते.

आपली नग्नतेविषयींची दृष्टि आणि विकाराबाबतचें धोरण हीं दोन्ही बदललीं पाहिजेत. आपण एकीकडे विकारांचें संवर्धन करीत असतों तर दुसरी-कडे शिष्टाचाराचें रक्षण करूं पहात असतों.

बाहुबली बाहुबली आहे; परंतु त्याचें शरीर एखाद्या मल्लाप्रमाणें कसलेलें दाखविलेलें नाहीं. तशी हौस यावनी मूर्तिकारांत होती. आपले मूर्तिकार जडाद्वारें चैतन्य प्रकट करूं इच्छित असत. माणसाच्या पाशवी शक्ति व्यक्त करण्याऐवजीं त्यांच्यावर विजय मिळविणाऱ्या वैराग्याची आणि प्रशमाची प्रसन्नता व्यक्त करून दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न असे. बाहु-बलीच्या कमरेंत दृढता आहे. त्याची छाती विशाल आहे; त्याचे खांदे रुंद आहेत. सबंध जगाचा भार वाहणें त्याला पोरखेळ आहे. तो कंबुग्रीव असता, गूढ-जत्रु असता तर सबंध मूर्तीचें सौंदर्य अधिक खुललें असतें ही गोष्ट जरी खरी आहे तरीहि रुंद आणि पुष्ट कंठ अनायासें कॉलरची शोभा उत्पन्न करतो. आणि त्याच्यावर विराजमान झालेल्या मस्तकाचें कौमार्य अधिक चांगल्या रीतीनें व्यक्त करून दाखवितो.

मूर्तीचें सबंध शरीर बांधेसूद, यौवनपूर्ण, नाजूक आणि कांतिमान आहे. एवढ्या मोठ्या मूर्तीत प्रमाणबद्धता राखणें फारच कठीण. एकाच दगडांतून कोरून काढलेली एवढी भव्य मूर्ति सबंध जगांत कोठेंच नाहीं. मिसर देशांत मोठमोठ्या मूर्ति आहेत. पण त्या इतक्या भावनाशून्य दिसतात कीं, राजत्वाचीं सगळीं लक्षणें आणि चिन्हें त्यांच्यावर असलीं तरी

कोठून तरी पकडून आणून बळेंच बसविलेल्या आणि नाइलाजानें बसावयास तयार झालेल्या भासतात. तसें येथें नाहीं. एवढी मोठी मूर्ति इतकी सुकोमल आहे कीं, भक्तीबरोबर ती कांहींशा प्रेमाचीहि अधिकारी बनली आहे.

पुष्कळ वेळां असेंहि होतें कीं, मूर्तिकार मूर्ति प्रमाणबद्ध बनवितात. परंतु ज्यामुळें व्यक्तित्व उठून दिसतें ती मुखमुद्रा बनविण्यांत असमर्थ ठरतात. त्यामुळें कोणत्याहि मूर्तीकडे पहातांना मी तिच्या चेहऱ्याकडे निराशेच्या अपेक्षेनें भीत भीत नजर टाकतों. चांगल्या मूर्तींत देखील कोठें ना कोठें दोष राहूनच जातो; आणि दूधसाखरेंत एखादा मिठाचा खडा पडतो. या मूर्तीचा थोडासा पुढें आलेला अधरोष्ठ पाहून आपला उत्साहभंग होतो कीं काय अशी मला भीति वाटूं लागली. म्हणून अधिक लक्षपूर्वक पाहूं लागलों. समोरून पाहिलें, बाजूला जाऊन पाहिलें. चिकित्सेच्या नजरेनें पाहिलें. भक्तिभावानें पाहिलें. कोणत्या तरी निश्चयावर पोहोंचण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. जोंपर्यंत मी मूर्तीचें सौंदर्य न्याहाळीत होतो तोंपर्यंत मला कांहींच निर्णय करतां येईना. चित्तांत अनिश्चिततेची अस्वस्थताच पसरूं लागली. परंतु लागलीच मी भानावर आलों. वेड्या मनाला मी म्हटलें, "सौंदर्य तर येथें भरपूर आहे. पण सौंदर्य शोधत बसण्याचें हें स्थळ नव्हे. मुखमंडलावर जर नुसतेंच रूपलावण्य असेल, भाव नसतील तर ती पूजामूर्ति बनूंच शकत नाहीं. तिच्यापासून कोणतीच प्रेरणा मिळूं शकणार नाहीं. ती स्वतःच तुला सारें कांहीं निवेदन करील."

दृष्टि बदलली आणि त्या मूर्तीच्या भावांकडे ध्यान वेधलें. मग काय विचारावें ! क्षणांत वैराग्य आणि कारुण्याचा भाव जागृत झाला. छेः ! वैराग्य आणि कारुण्याची गंगा दुथडी वाहूं लागली. आणि चित्त त्यांत पावन होऊन क्षणाक्षणाला त्या भव्यतेच्या उच्चतेप्रत चढूं लागलें. एका आचार्यांनीं अशाच एखाद्या भव्य मूर्तीचें वर्णन करतांना म्हटलें असेल —

यत्कारुण्यकटाक्षकान्तिलहरी प्रक्षालयत्याशयम् ।*

या वर्णनाच्या यथार्थतेचा आम्हांला येथें अगदीं पुरापुरा अनुभव येऊं लागला. मूर्तीच्या तोंडावर थोडासा विषाद आहे. मनुष्याची दुर्बलता, त्याची

* जिच्या कारुण्यपूर्ण कृपादृष्टीच्या जल-प्रवाहानें हृदयाचे भाव धुवून जाऊन शुद्ध होतात.

आसक्ति आणि दीर्घकाल पहात राहिल्यानें दिसणारें मनुष्यजातिविषयींचें पारावार दुःख त्या डोळ्यांत आणि त्या ओठांत सामावलेलें आहे. आणि इतकें असूनहि जरा देखील निराशा किंवा चीड नाहीं. दुनिया तर अशीच आहे आणि अशी आहे म्हणूनच तिच्या उद्धाराचा प्रश्न उत्पन्न होतो. मानवाची पापप्रवणता अधिक बलवान आहे कीं महापुरुषांची, बोधिसत्त्वाची, तीर्थंकरांची आणि अवतारांची क्षमावृत्ति व कारुण्यवृत्ति अधिक बलवान आहे या प्रश्नाचें उत्तर माणसाला सदा एकाच रीतीनें मिळालें आहे. आणि तेंच उत्तर या मूर्तीच्या मुखमुद्रेवरून आपणांस मिळतें.

खालीं उतरणारे कान जरी शरीररचनेशीं प्रमाणबद्ध नसले तरी ते मूर्तीची प्रतिष्ठा वाढवायला कारणीभूत झाले आहेत. इतकेंच नव्हे तर सौंदर्यसिद्धीचें प्रमाण ते आपणांला शिकवितात. मला तर या मूर्तीचे डोळे, तिचे ओठ, तिची हनुवटी, भुंवया, तिच्या ओठावरचें कारुण्य — सगळेंच कांहीं असाधारण सुंदर वाटलें! ज्याप्रमाणें आकाशांतील तारे लाखों वर्षें चमकत आहेत तरीहि त्यांच्यांतली 'नित्यनूतनता' नष्ट झालेली नाहीं; ज्याप्रमाणें उषा वेदकालापासून आजतागायत आपलें लावण्य आणि आपलें तारुण्य संभाळीत आली आहे; तशी ही मूर्तिहि आज जवळ जवळ एक हजार वर्षें येथें उभी असूनहि जशीच्या तशी ताजीतवानी, तितकीच द्युतिमान आणि सुभग आहे. ऊन, हवा आणि पाण्याच्या प्रभावामुळें मागील बाजूचे थोडेसे लहान लहान पोपडे निघाले आहेत खरे; परंतु तेवढ्यानें तिचें लावण्य खंडित झालेलें नाहीं. असें म्हणतात कीं, अमेरिकेंतील एका फंडाच्या ट्रस्टींनीं या मूर्तीचा दगड अधिक जीर्ण होऊं नये म्हणून त्याच्यावर कांहीं औषधि पुटें चढविण्याचा प्रयत्न चालविला होता. परंतु जैन लोकांनीं तसें करण्याचें साफ नाकारलें. हजार वर्षें जी मूर्ति जशीच्या तशीच आहे ती ईश्वराची इच्छा असेल तर आणखी हजार वर्षें जशीच्या तशीच राहील आणि तशी राहिली नाहीं तर ती ज्या स्थितींत राहील त्या स्थितींत आम्ही तिची पूजा करूं, असें त्यांचें म्हणणें आहे.

विरुद्ध पक्षाचे रक्षणवादी लोक म्हणतात कीं, 'ह्या मूर्तीची मालकी जैन लोकांची का असेना परंतु तें साऱ्या जगाचें अलौकिक धन आहे; शिल्पकलेचें अतुल रत्न आहे. अशेष मानवजातीचा अमूल्य वारसा आहे. हजार वर्षें तो टिकला ही ईश्वराची कृपा. परंतु निसर्गापासून त्याचें रक्षण करून

हजारच काय, लाखों वर्षें तो संभाळला पाहिजे. आणि भविष्यकालीन अगणित कोटि मानवांना त्यापासून प्रेरणा मिळूं शकेल अशा स्थितींत तो राखणें हा आमचा धर्म आहे. तिच्यावर वॉर्निश चढवून तिला बिघडविण्याचें निंद्य कर्म आम्हांस करावयाचें नाहीं. मूर्ति आहे तशीच दिसावी, तिच्या प्रभावांत थोडी सुद्धां उणीव येऊं नये, तिच्यांत थोडें देखील परिवर्तन न व्हावें ह्या सर्व गोष्टी संभाळून आम्ही तिचें आयुष्य वाढवूं इच्छितों. विज्ञानाचे शोध ज्या मर्यादेपर्यंत जाऊं शकतात तेथपर्यंत जाऊन आपण अशा अलौकिक मूर्तींचें रक्षण केलें पाहिजे. बुद्धिदात्या जगत्प्रभूनें आपणांस जें विज्ञान दिलें त्याचा उपयोग काय ? एक वेळ तरी विज्ञानाचा सदुपयोग होऊं द्या ! '

दोन्ही पक्षांच्या वतीनें अनेक गोष्टी सांगतां येण्यासारख्या आहेत. दोन्हीकडचे मुद्दे मनांत घोळत असतां दृष्टि पुनः एकदां गोमटेश्वराकडे लागली. आणि पहातों तों मूर्ति मूर्तिरूप राहिलीच नाहीं. गोमटेश्वर स्वतःच मूकवाणींत म्हणूं लागले :

" किती पामर आहेत हे मानव ! मीं वैराग्याचें तप सुरू केलें आहे. आणि तुम्ही माझ्या या मूर्तीकडे कृपेच्या नजरेनें पहातां ? तिच्या लावण्यावर मोहित होतां ? अलम दुनियेचें चक्रवर्तित्व मीं एका क्षणांत फेंकून दिलें आणि तुम्ही या दगडाच्या दौलतीचा वारसा भविष्यकालीन पिढ्यांसाठीं जपून ठेवूं पहातां. तुम्ही जडवादी आधुनिक लोक ह्या फत्तरांच्या रूपलावण्याची उपासना करतां आणि ते सनातनी जैन माझ्या जीवनकथेच्या अद्भुततेवरच मोहित झाले आहेत आणि त्यांच्यासाठीं रचल्या गेलेल्या शास्त्रवचनांच्या शब्दार्थांना चिकटून रहात आहेत ! माझ्या जीवनाचा बोध त्यांना आपल्या आवाक्याबाहेरचा वाटतो म्हणून पूजेची लालूच दाखवून मलाच आपल्या पातळीवर आणूं पहातात. दोघेहि एकाच माळेचे मणि ! तुमची ती चर्चा राहूं दे. वैराग्याचा संदेश देत, प्रशमाचा बोध करीत नऊशेंएकवीस वर्षें मी येथें तपश्चर्या करीत उभा आहें, त्याचा तुमच्यावर कांहींच परिणाम कसा होत नाहीं ? दिवसेंदिवस तुम्ही कल्याणमार्गापासून दूर दूर जात चालला आहांत. त्यामुळें माझ्या चर्येवर विषादाचा जो भाव उठत चालला आहे तो तुम्हांला दिसत नाहीं काय ? थंडी, ऊन, हवा आणि पाऊस यांपासून तुम्ही माझें रक्षण करूं पहातां आहांत. परंतु तुमच्या मूढतेची आणि वेडेपणाची वाढती मात्रा पाहून माझ्या मुखकांतीवर जें

दुःख, जी ग्लानि आणि जो विशाद अधिकाधिक पसरत चालला आहे त्यापासून माझें रक्षण करण्यासाठीं तुम्ही काय करायला तयार आहांत ? या गोष्टींची चर्चा करा; मनन करा. दगडाचा एक ना एक दिवस चुरा होणारच आहे. जी मूर्ति आहे ती कधीं तरी अमूर्ति होणारच आहे. परंतु तुम्हांला आजपर्यंत जी संधि मिळाली तिचा तुम्ही काय उपयोग केलात ? या दगडाच्या मूर्तीचें जतन करावयाचें असेल तर खुशाल करा; ती तयार करणाऱ्या प्राचीन कलाकारांच्या बाबतींत तो तुमचा धर्म आहे. परंतु तुमचाहि मुख्य धर्म हा आहे कीं, जो बोध मला मिळाला आणि ज्यामुळें माझें जीवन सफल झालें त्या बोधाची परंपरा तुम्ही अबाधित राखा आणि हजारों नि लाखों वर्षेंपर्यंत जर तुमच्या मानवी जीवनाची परंपरा चालली तर त्या सर्वांना – अशेष सत्त्वांना – कल्याणप्रद बोध आणि कल्याणप्रद साधना प्राप्त होईल अशी परंपरा राखा ! ”

असें झालें तर प्रत्येकाचें जीवन कलामय, लावण्यमय आणि आशीर्वादरूप बनेल यांत संशय नाहीं ! ! !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थापना
अनुक्रम ३१२.३१ वि: ५०१.२
क्रमांक २८४६० नों: दि: ६.६.६१

# जोगचा धबधबा

३

अगदीं लहानपणापासून, कारवारला प्रथम होतों त्या वेळेपासून, गिरसप्पाविषयीं ऐकलें होतें. त्या वेळीं ऐकलें होतें कीं, कावेरी नदी पहाडावरून खालीं पडते आणि त्याचा इतका मोठा आवाज होतो कीं, दोन मैलांवर रचून ठेवलेली घागरींची उतरंड देखील त्या हवेच्या धबक्यानें कोसळून पडेल. मग त्या धबधब्याचा आवाज कुठवर पोहोंचत असेल कल्पना करा! मागाहून जेव्हां भूगोल शिकलों त्या वेळीं मनांत शंका आली कीं, कावेरी तर थेट कुर्गमध्यें उगम पावून पूर्वसमुद्राला जाऊन मिळते. ती पश्चिम घाटाच्या पहाडावरून खालीं पडणें शक्यच नाहीं. तर मग गिरसप्प्याच्या रूपानें पडते ती नदी दुसरीच असली पाहिजे. तिला शक्य तितक्या त्वरेनें होन्नावरजवळच पश्चिम समुद्राची भेट घ्यायची होती. म्हणूनच तर सव्वाशें दीडशें पुरुष उंचीवरून तिनें धाडकन् उडी टाकली आहे. त्या नदीचें नांव काय?

नायगऱ्याच्या धबधब्याचीं किती तरी वर्णनें माझ्या वाचनांत आलीं होतीं. प्रकृतिमातेनें अमेरिकेला बहाल केलेला तो एक अद्भुत अलंकार आहे. साऱ्या दुनियेभरचे लोक त्याची यात्रा करण्यासाठीं जातात, मोठ्या मजबूत पिपांत बसून त्या धबधब्यांतून पार होण्याचे कित्येक लोकांनीं प्रयत्न केले आहेत, वगैरे वर्णनें जसजशीं अधिक वाचावीं तसतसें कुतूहल वाढतच जाई. निरनिराळ्या बाजूंनीं घेतलेलीं चित्रें आणि अक्षिपट ( Bioscopes ) नायगऱ्याला डोळ्यांसमोर मूर्तिमंत करूं लागले. जसजसें नायगऱ्याचें अप्रत्यक्ष दर्शन याप्रमाणें वाढूं लागलें तसतशी लहानपणीं ऐकलेल्या त्या गिरसप्प्याच्या धबधब्याची मानसपूजाहि वाढूं लागली. पुढें जेव्हां कळलें कीं, नायगरा तर फक्त १६४ फूट उंचीवरून खालीं पडतो आणि गिरसप्प्याची उंची आहे ९६० फूट, तेव्हां तर माझ्या अभिमानाला पारावार उरला नाहीं. सर्वांत मुख्य

आणि जगांतील सर्वांत उंच पर्वत हिंदुस्थानांत आहे. सिंधु, गंगा आणि ब्रह्मपुत्रा यांच्यासारख्या नद्यांचा कोठल्याहि देशाला अभिमान वाटावा. सर्वांत लांब नदी आपल्याच येथें आहे हें सिद्ध करण्यासाठीं अमेरिकेला दोन नद्यांच्या लांबीची बेरीज करावी लागली आहे. मिसोरी आणि मिसिसिपी यांची वेगवेगळी गणना केली तर त्यांची लांबी कितीशी होईल? ज्याप्रमाणें हिंदुस्थानचा इतिहास पृथ्वीतलावरील जुन्यांतला जुना इतिहास होय त्याचप्रमाणें हिंदुस्थानची भूरचना देखील साऱ्या जगांत अद्भुत आहे.

मग हिंदुस्थान काय एका धबधब्याच्या बाबतींतच हार खाईल? साऱ्या जगानें मान्य केलें आहे कीं, अशोकासारखा दुसरा सम्राट् इतिहास-कालात झाला नाहीं. भूगोलांतहि लोकांनीं कबूल केलें पाहिजे कीं, भव्यतेंत गिरसप्प्याच्या (त्याचें खरें नांव जोग आहे.) पंक्तीला बसूं शकेल असा एकहि धबधबा नाहीं.

कारकळ राजकीय परिषदेसाठीं दक्षिण कर्नाटकांत गेलों होतों त्या वेळीं आशा वाटली होती कीं, अगुम्बा घाट चढून शिमोग्याहून गिरसप्पा पहाण्यास जाईन. पण त्या वेळीं तसें होऊं शकलें नाहीं.

**मनसा चिन्तितं कार्यं दैवेनान्यत्र नीयते।**

निराशेच्या भरांत मीं मानून घेतलें कीं, ती चिरसंचित आशा शेवटीं कायमची वंचित झाली आणि आतां गिरसप्प्याचें दर्शन करायचें झालें तर तें ध्यानाच्या द्वारांच करणें भाग आहे.

पण एवढें मात्र जाणून घेतलें होतें कीं, जोग म्हैसूर संस्थानाच्या सरहद्दीवर आहे. तेथें जाण्याचे दोन रस्ते आहेत. वरचा रस्ता शिमोगा, सागरवरून आणि दुसरा मुखाकडचा. त्यासाठीं होन्नावर बंदरावरून होडींत बसून जंगलें पार करून गिरसप्पा गांवापर्यंत जावयाचें आणि तेथून घाट चढावयाचा. दोन्ही रस्त्यांनीं जाऊन आलेल्या लोकांचें सांगणें आहे कीं, एका बाजूची शोभा दुसरी-कडे मिळायची नाहीं. एकीपेक्षां दुसरी उतरती आहे असें तर मुळींच म्हणतां येणार नाहीं. एका रस्त्यानें जाऊन आलों आणि दुसऱ्या बाजूचा मात्र साक्षात् अनुभव घेतला नाहीं तोंपर्यंत मला कबूल करणें भाग आहे कीं, 'जोगा'चें मीं अर्धेंच दर्शन घेतलें आहे.

गुजराथ महापुराच्या संकटांत सांपडला होता त्याच सुमारास गांधीजी आपले आजारपणाचे दिवस बंगलोरमध्यें घालवीत होते. मी त्यांना भेटायला

गेलों होतों. तेथन फिरत फिरत गांधीजी सागरपर्यंत पोहोंचले. बरोबर श्री. गंगाधरराव आणि राजगोपालाचारी होते. सागरला गेल्यानंतर गिरसप्पा बघायला न जाणें मला तर अगदीं अशक्य होतें. मोटारीनें एकाच तासाचा रस्ता. शिमोग्याला तुंगेच्या तीरावर फिरावयास गेलों असतां मीं गांधीजींना आग्रह केला होता कीं, ' आपण गिरसप्पा पहाण्यास कां चलत नाहीं ? लॉर्ड कर्झन केवळ गिरसप्पा पहाण्यासाठीं म्हणून खास या बाजूस आले होते. यां बाजूला येणें पुनः सहजासहजीं थोडेंच होणार आहे ? ' गांधीजी म्हणाले, ' मला तेवढा सुद्धां स्वछंद करतां येणार नाहीं. तुम्ही अवश्य जा. तुम्ही बघून याल तर विद्यार्थ्यांना भूगोलाचा एखादा धडा तरी शिकवाल. ' मीं पुन्हां युक्तिवाद केला, ' पण या जगांतील हें एक अद्भुत दृश्य आहे. नायगऱ्यापेक्षां 'जोग' सहा-पट उंच आहे. ९६० फुटांवरून पाणी खालीं पडतें. आपण एकदां तरी तो पाहिलाच पाहिजे. '

' पावसाचें पाणी आकाशांतून पडतें, तें किती उंचीवरून पडतें ? ' मी हरलों. मनांत म्हटलें,

' स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् । ' !

मला ठाऊक होतें कीं, गांधीजींना संगीताप्रमाणें सृष्टिसौंदर्याचीहि अतिशय आवड आहे. फिरायला गेलों असतां सूर्यास्ताच्या शोभेकडे किंवा ढगांमधून डोकावणाऱ्या एखाद्या एकाकी चांदणीच्या शोभेकडे त्यांनीं कधींच माझें लक्ष वेधलें नव्हतें असें नाहीं. पण जनतेच्या सेवेसाठीं म्हणून निघालेले गांधीजींसारखे सेवक महात्मे स्वच्छंद कसा करतील ?

कुलशिखरिणः क्षुद्रा नैते न वा जलराशयः ।

ही एक गोष्ट अशी निकालांत निघाल्यावर मीं दुसरी गोष्ट पुढें केली. ' आपण येत नाहीं म्हटल्यावर महादेवभाई देखील येत नाहींत. आपण त्यांना सांगाल तरच ते येतील. '

' महादेवाची इच्छा असेल तर त्यानें खुशाल तुमच्याबरोबर जावें; माझी ना नाहीं. पण तो येणार नाहीं. मीच त्याचा गिरसप्पा आहें. '

बाकीचे आम्ही पडलों लौकिक आदर्शाला भजणारे. चर्मचक्षूंनीं पहाडा-वरून पडणारा धबधबा पाहिल्याशिवाय आमचें समाधान होण्यासारखें नव्हतें.

म्हणून जेवणापूर्वींच आम्ही सागरहून निघालों आणि मोटारीच्या मदतीनें अरण्याचा मार्ग कांपीत सुटलों. डोंगर पोखरून रेल्वेवाले जेव्हां बोगदा तयार करतात तेव्हां आपल्याला फार आश्चर्य वाटतें. पण मुंबईच्या वस्तीहूनहि अधिक भरगच्च अशा सह्याद्रीच्या जंगलामधून रस्ता तयार करणें हें त्यापेक्षांहि अधिक अवघड काम आहे. येथें तुमचा डायनामाइट ( सुरुंग ) उपयोगाचा नाहीं. बुंधा कापल्यानंतर सुद्धां एक एक झाड फांद्यांच्या जाळ्यांतून मोकळें करण्याचें काम हिंदु-मुसलमानांचीं भांडणें मिटविण्याइतकेंच कठीण आहे. खंडाळ्याच्या घाटांतील खोल बोगद्यांत मध्यभागी पोहोंचल्यावर जी एक भयानक रमणीयता मनुष्याच्या अनुभवास येते तशीच नेमकी या जंगलांतहि अनुभवतां येते. अशा जंगलांत शोभतील असे प्राणी म्हणजे हत्ती, वाघ आणि अजगर. त्यांत माणूस इतका कांहीं क्षुद्र प्राणी भासतो कीं, हा येथें कसा काय आला असेंच वाटावें.

असो. जंगल पार करून आम्ही शरावतीच्या किनारीं आलों. या बाजूस तिला भारंगी असेंहि म्हणतात. भारंगी म्हणजे बारगंगे. गंगानदीपेक्षां या नदीचें माहात्म्य बारापट आहे असें येथले लोक मानीत असतील तर आपण त्यांच्याशीं हुज्जत घालीत बसणार नाहीं. प्रत्येक मुलाला आपली आईच सर्वश्रेष्ठ वाटणार !

पाऊस झिमझिम पडत होता. येथें गगनभेदी महावृक्षहि होते आणि लहानमोठीं झाडेंझुडपें देखील होतीं; अमर गवतहि होतें आणि जमिनीवर तसेंच झाडांच्या जून सालींवर उगवणारें शेवाळ देखील होतें. पैलतीरावर लहान-मोठीं झाडें नदीचें पाणी कितीसें गार आहे किंवा खोल आहे तें अजमावण्या-साठीं आपले पानाळ हात पाण्यांत बुडवीत होतीं आणि धुक्याचे कित्येक ढग वसू सोडलेल्या आळशी पोळाप्रमाणें इकडे तिकडे रेंगाळत होते.

नदी पाहिली रे पाहिली कीं मनांत प्रश्नचिन्ह उगवतें कीं, ही नदी आली कोठून आणि जाते कोठें ? माझ्या मनांत तर नेहमीं नदी आली कोठून हा सवालच प्रथम उठतो. पुष्कळांचें देखील असेंच होत असेल. याचें कारण काय ? नदी कोठें जाते हें शोधून काढणें सोपें आहे. नदीच्या हवालीं स्वतःला केलें कीं, ती आपल्याला अनायासें आपल्या सोबत घेऊन जाते. इतकी हिंमत होत नसेल तर एखादें झाडाचें खोड पोखरून त्या नावेंत बसलें कीं पुरे. पण नदी कोठून आली हें शोधून काढण्यासाठीं उलट दिशेनें जावें लागतें.

तें काम ऋषीच करूं शकतात. भारंगीचें अथवा शरावतीचें पाणी पहाडां-तून येत आहे कीं ढगांतून अशी शंका उत्पन्न होण्यासारखें त्या दिवशींचें दृश्य होतें.

होडींत बसून आम्ही पैलतीरीं गेलों. कांठावरच्या जमिनींतून किती तरी बालनिर्झर उड्या मारीत मारीत नदींत पडत होते. त्यावरून आम्ही सहजच अनुमान काढूं शकलों कीं, आदल्या दिवशीं चांगलाच पाऊस पडून नदीचें पाणी खूप वाढलें होतें. आज तें जवळ जवळ पांच फूट उतरलें होतें. होडी आम्हांला खालीं उतरवून उरलेल्या लोकांना आणण्यासाठीं परत गेली. शांत पाण्यावर वल्ह्यांचा डबूडब् आवाज करीत होडीची ये-जा चालते, ती पहातांना किती मौज वाटते! आणि आपल्या प्रियजनांना स्वतःच्या पोटांत स्थान देऊन होडी जेव्हां खोल पाण्याच्या पृष्ठभागावरून त्यांना वाहून आणीत असते, तेव्हां चिंतेचें कांही कारण नसतांहि मनाला भीति वाटल्यावांचून रहात नाहीं. राजगोपालाचार्य आपल्या मुलाला व मुलीला घेऊन होडींत बसत होते, तेव्हां मी म्हणालों कीं, एका कुटुंबांतील सर्वच लोक एकाच वेळीं एका होडींत बसणें योग्य नाहीं असें आपल्या पूर्वजांनीं सांगितलें आहे. एक तर पित्यानें आमच्या-बरोबर यावें नाहीं तर मुलानें; दोघांनीं एकदम येऊं नये. सोबतचे लोक या चालीची चर्चा करूं लागले. कुणाला यांत प्रातिष्ठेचा दर्प आला तर कुणाला दुसरेंच कांहीं सुचलें. सर्वनाशाचा संभव टाळण्यासाठी हा नियम आहे इतकी साधी गोष्टहि कुणाच्या ध्यानांत आली नाहीं. तो अर्थ स्पष्ट करून वातावरण विषण्ण करण्याची माझी इच्छा नव्हती. म्हणून पूर्वजांची निंदा ऐकत ऐकत मी पैलतीराला पोहोंचलों. होडी 'मंझधार' ( प्रवाहाच्या मध्यावर ) पोहोंचली तेव्हां मंत्र उच्चारून आचमन करण्याचें मी विसरलों नाहीं. नदीच्या दर्शनाबरोबर स्नान, पान आणि दान हे विधि झालेच पाहिजेत. तरच नदीचा संपूर्ण साक्षात्कार करून घेतला असें म्हणतां येईल.

दुसरी तुकडी येऊन पोहोंचली आणि उजवीकडील रस्त्यानें आम्ही निघालों. नदीचा तो डावा कांठ होता. रस्त्यावरील झाडें मशिदीच्या खांबांप्रमाणें सरळ उंच जात असलेलीं पाहून आम्हांला आनंद वाटला. आमची टोळी इतकी मोठी होती कीं, त्या निर्जन अरण्यांत बघतां बघतां आमचा गप्पा-विनोद आणि सात-मजली हंसणें यांनी वातावरण गजबजून गेलें. पण तें देखील किती वेळ!

आम्ही थोडें दूर गेलों आणि नदीनें आपला गंभीर ध्वनि सुरू केला. त्या आवाजाला कशाची उपमा द्यावी ? इतका गंभीर आवाज दुसरा ऐकला असेल तर ना ? मेघगर्जना गंभीर असते खरी आणि ती सारें आकाश व्यापून टाकते हेंहि खरें; पण ती सतत टिकत नाहीं. येथें तुम्ही ऐकून ऐकून थकलांत तरी आवाज कांहीं थांबायचा नाहीं. येथें काय ढग कोसळत आहेत; तोफा उडत आहेत; पहाडावरील मोठमोठ्या शिळांच्या लाह्या फुटत आहेत कीं नदी आपलें ध्यान मौन सोडून महारुद्राचा स्तवराज गात आहे ?

'आतां कसला देखावा दिसेल ?', 'आतां कसले दृश्य नजरेसमोर येईल ?' अशा कुतूहलानें डोळे फाडून चहूंकडे पहात पहात आम्ही मुसाफरखान्या-पर्यंत पोहोंचलों. जेथून धबधब्याचें दर्शन सर्वांत उत्तम प्रकारें करतां येतें त्याच ठिकाणीं म्हैसूर सरकारकडून ही अतिथिशाळा बांधण्यांत आली आहे. जेथून निरीक्षण करावयाचें त्या चवुतऱ्यावर आम्ही जाऊन पोहोंचलों.

पण काय ! सर्वव्यापी धुक्याशिवाय कांहींच दिसेना; आणि धबधबा तर आपल्या गंभीर आवाजानें सारी दरी दणाणून टाकीत होता. भर दुपारीं सुद्धां सूर्याचें दर्शन होत नव्हतें. जिकडे पहावें तिकडे धुकें, धुकें आणि धुकें. धुक्याचे लोटावर लोट जणुं काय कुरुक्षेत्रावरली महायुद्धाची दंगल माजवीत आहेत आणि जोग त्याला आपल्या तालाचा 'जोग' ( योग = साथ ) देत आहे. इतक्या आशेनें येऊन अशा प्रकारची फजिती पूर्वी कधींहि आमच्या वांट्याला आली नव्हती. मिनिटांमागून मिनिटें धांवत होतीं आणि आमच्या निराशे-बरोबर धुकेंहि वाढतच होतें. शेवटीं मौन सोडून आम्ही आपापसांत गोष्टी करूं लागलों. गोष्टीसाठीं कांहीं खास विषय होता असें नाहीं, पण निराशेची पोकळी भरून काढण्यासाठीं कांहीं तरी हवें होतें इतकेंच.

इंद्रदेव कोपला आहे कीं वरुणदेव रुसला आहे याचा मी विचार करीत होतों इतक्यांत वायुदेव मदतीस धांवून आला आणि एका क्षणासाठीं – फक्त एकाच क्षणासाठीं – धुक्याचा तो जाड पडदा दूर झाला आणि जन्मभर ज्याची तळमळ लागून राहिली होती तें अद्भुत दृश्य एकदांचें आणि तेंहि एकाएकीं नजरेस पडलें ! महादेवाच्या मस्तकावर गंगा अवतरावी तसा एक मोठा धबधबा, खालच्या कड्यांतून बाहेर पडलेल्या हत्तीसारख्या खडकावर पडून पाण्याचा चक्काचूर करीत दशदिशांना त्याचे सर उधळीत होता.

छेः, त्या दृश्याचें वर्णनच करतां येणार नाहीं. आश्चर्यमुग्ध होऊन मी उद्गारलों :

नमः पुरस्तात्, अथ पृष्ठतस् ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ।
अनन्त-वीर्यामित-विक्रमस् त्वं सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥

लगेच समोरचा हत्तीएवढा दगड डोक्यावरील धबधब्याच्या जटा उडवीत म्हणाला :

सुदुर्दर्शम् इदं रूपं दृष्टवान् असि यन् मम ।
देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शन-काङ्क्षिणः ॥

धुक्याचा पडदा पुनः पहिल्याप्रमाणेंच पसरला आणि मग आम्हीं पाहिलें, तें स्वप्न होतें कीं माया होती कीं मतिभ्रम होता अशी आमची स्थिति होऊन गेली ! एवढी विस्तीर्ण दरी, तें रुंद पात्र, ती भयानक खोली आणि त्याच्यामध्यें पाण्याचा नव्हे तर पिठाचा – छे, मैद्याचा – तो अद्भुत धबधबा : सारें दृश्य कल्पनातीत होतें. आपण साध्या डोळ्यांनीं पहात आहोंत तें सारें खरोखरीचें आहे अशी प्रतीति दृढ होण्यापूर्वींच धुक्याचा क्षीरसागर पुनः पसरला आणि समोरच्या काव्यासमवेत आम्हीहि त्यांत बुडून गेलों.

आतां कुणी कुणाशीं बोलत नव्हतें. जें पाहिलें त्याच्याच विचारांत सारे गढून गेले. कांहींच नव्हतें त्यांतून एवढी उंच व खोल सृष्टि कोठून अस्तित्वांत आली आणि पहातां पहातां पुनः कोठें अदृश्य झाली याच आश्चर्यानें आम्हांला वेढून टाकलें.

मनांत आलें कीं एक क्षण तर एक क्षण, पण पहाण्यास आलों तें पाहिलें, विलक्षण रीतीनें पाहिलें. त्या क्षणजीवी दर्शनाचें स्मरण व ध्यान करण्यांत वाटेल तेव्हां घटकामागून घटका घालवितां येतील.

इतक्यांत तो शुभ्र जटाधारी खडक पुन्हां निनादला :

व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं तदेव मे रूपम् इदं प्रपश्य ॥

धुक्याचें पडळ पुन्हां दूर झालें आणि आतां या टोंकापासून त्या टोंका-पर्यंत सगळेंच स्पष्ट दिसूं लागलें. समोरून थेट डाव्या टोंकाला राजा धबधबा अर्धचंद्राकार शिळेवरून खालीं उडी घेत होता. त्याचें पाणी पावसाळ्याच्या

चिखलामुळें कॉफीच्या रंगाचें बनलें होतें. जास्तींत जास्त पाणी या राजालाच मिळतें. छाती फुलवीत फुलवीत जेव्हां तो तीरासारखा सरळ खालीं पडतो तेव्हां निसर्गाची शक्ति किती अपरिमित आहे याची कल्पना येते. राजा धबधब्याचा विस्तारहि कांहीं लहानसहान नाहीं; आणि त्याच्या दोन्ही अंगांस मोठमोठ्या मोत्यांचे किती तरी सर लटकत धांवत असतात. खरोखरच हा धबधबा राजा या नांवाला पात्र आहे.

सर्वप्रथम ज्याचें दर्शन मला झालें होतें तो त्याच्या बाजूचा धबधबा खरें पहातां तिसरा होता. त्याचें नांव वीरभद्र. मधला एक धबधबा रुद्र या बाजूनें स्पष्ट दिसतच नाहीं. तो पायरी पायरीवर गर्जना करीत शेवटीं राजांत येऊन मिसळून जातो.

थेट उजव्या बाजूस एक लहानसा धबधबा आहे. त्याची कंबर कांहींशी बारीक आहे. म्हणून त्याचें नांव मीं पार्वती ठेवलें. डोळे भरभरून पाहिल्यानंतर आमच्या गोष्टी पुन्हां सुरू झाल्या. आपण जें पाहिलें तें दुसऱ्याला दाखविण्याची ज्याला हौस नाहीं तो मनुष्य, मनुष्यच नव्हे. मनुष्य संचारशील आहे, संवादशील आहे. आपण जें अनुभवलें, तेंच दुसरे देखील अनुभवतात — अनुभवूं शकतात — याची खात्री करून घेतल्यावांचून त्याला परम संतोष होत नाहीं. राजाजींनीं लक्ष वेधलें, ‘ इकडे खालीं तर पहा ! या थंड वाफेचे लोळच्या लोळ कसे वर उसळून येत आहेत ! ’ देवदास म्हणाला, ‘ ते पक्षी पहा ! कसे निर्भयपणें उडत आहेत ! ’ मणिबेननीं अशीच कांहीं तरी पुस्ती जोडली. आणि लक्ष्मीनें आपल्या अण्णाला तामिळ भाषेंत बरेच कांहीं तरी समजावून आपला आनंद व्यक्त केला. आमच्याबरोबर,एक गृहस्थ होते ते वाटेंत विनाकारण चिडले होते. आम्ही जेव्हां या स्वर्गीय दृश्याच्या आनंदानें अगदीं वेडावून गेलों होतों तेव्हां त्या गृहस्थांना आपल्या मानून घेतलेल्या अपमानाचेंच रवंथ करीत बसायचें होतें. चंद्रशंकरनें त्यांच्या या अवस्थेकडे माझें लक्ष वेधलें. मी मनांत म्हणालों :

पत्रं नैव यदा करीर-विटपे दोषो वसंतस्य किम् ?
नोलूकोप्यवलोकते यदि दिवा सूर्यस्य किं दूषणम् ?

निराशा, गैरसमज, अप्रतिष्ठा किंवा वियोग हीं या जगांतलीं खरीं दुःखें नाहींत. अहंकार हेंच खरें मोठ्यांतलें मोठें दुःख आहे. अहंकाराच्या विकृती-पुढें मोठ्या धन्वंतऱ्यालाहि हात टेकावे लागतील.

त्या गृहस्थाच्या अनेक प्रकारच्या मानसिक अढी व विकृति मला ठाऊक होत्या. म्हणून गिरसप्प्याच्या धबधब्यासमोर सुद्धां त्याच्याशीं चार क्षण बोलल्याशिवाय माझ्यानें रहावलें नाहीं. मीं त्याला गिरसप्प्याची थोडी माहिती दिली आणि त्याला प्रसन्न करण्याचा प्रयत्न केला.

राजा धबधब्याच्या मागल्या पोकळींत असंख्य पक्षी रहातात आणि दूरदूरच्या शेतांतून टिपून आणलेल्या 'उच्छिष्ट' आणि उत्कृष्ट दाण्यांचा संग्रह करतात. तो संग्रह इतका मोठा असतो कीं, सरकारकडून त्याचा लिलाव करण्यांत येतो, असें एकदां कुणाकडून तरी ऐकलें होतें. मधमाशांचा मध लुटणारा मनुष्य-प्राणी पक्ष्यांचाहि धान्यसंग्रह लुटतो यांत आश्चर्य तें काय ? जो संग्रह करतो तो लुटला जावा अशी सृष्टीचीच व्यवस्था दिसते. **परिग्रहो भयायैव ।**

पुन्हां पडळ पसरलें आणि मला अंतर्मुख होऊन विचारांत बुडी मारण्याची संधि मिळाली. अशा भव्य देखाव्याचें रहस्य काय असावें ? भूगोलवेत्ते आणि भूस्तरशास्त्री चटकन् सांगतील कीं, येथील पहाड निस् जातीच्या दगडांच्या थराचा बनला आहे. दरींतून एक कपार तुटून आसपासची माती धुऊन गेली असावी. एकदां धबधबा सुरू झाला कीं, खालच्या जमिनीला तो अधिकाधिक खोल खोदीत जाणार आणि जेथून धबधबा सुरू होतो त्या कोंपऱ्याला सारखा घाशीत जाणार. वरचें कपाळ जर कठीण दगडाचें असेल तर उंची हजारों वर्षें टिकेल. धबधब्यापासून समुद्र फार दूर नसल्यामुळें नदीचा पुढला भाग साफ झाला आहे आणि धबधब्याची उंची टिकून राहिली आहे. हें झालें धबधब्याचें जड रहस्य. एखाद्या आधुनिक यांत्रिकाला विचाराल तर तो म्हणेल, एकट्या गिरसप्प्याच्या धबधब्यांत इतकें प्रचंड सामर्थ्य आहे कीं, म्हैसूर आणि दोन्ही कानडा जिल्ह्यांना हवी तेवढी शक्ति तो पुरी पाडूं शकेल. मग तुम्ही त्यांतून वीज उत्पन्न करा. प्रत्येक शहराला आणि गांवाला प्रकाशित करा, कारखाने चालवा आणि तुमच्या मुलखांतील वाटेल तितक्या माणसांची मजुरी छिनवून घेऊन त्यांना बेकार बनवा.

निसर्गापासून जो कांहीं लाभ होईल तो भूमातेच्या साऱ्याच लेकरांनीं आपआपसांत सलोख्यानें वांटून घ्यावा आणि जीवयात्रेचा भार हलका करावा अशी बुद्धि माणसाला सुचेल तेव्हांची गोष्ट वेगळी. पण आज तर माणसाच्या हातीं कोणत्याहि प्रकारची शक्ति आली रे आली कीं, लगेच तो दुसऱ्या माणसावर .कुरघोडी करण्याचाच प्रयत्न करतो. मग ती कुरघोडी दुसऱ्या माणसाला मारून मिळो, गुलाम बनवून मिळो किंवा त्याला अर्धपोटीं राबवून मिळो.

म्हैसूर राज्य सुधारलेलें आहे.: मोठमोठ्या इंजिनियरांनीं दिवाणपद शोभवून येथली समृद्धि वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. साऱ्या जगाला लागणारें चंदनाचें तेल एकटें म्हैसूर राज्यच पुरवीत आहे, असें म्हटल्यास विशेष अतिशयोक्ति होणार नाहीं. हिंदुस्थानांतील सर्वांत मोठ्या सोन्याच्या खाणी म्हैसूरमध्येंच आहेत. भद्रावती येथील लोखंडाच्या कारखान्याची कीर्ति वाढतच चालली आहे आणि कृष्णसागर तलाव हा मानवी पराक्रमाचा एक सुंदर नमुना आहे. अशा म्हैसूर राज्याला गिरसप्प्याच्या धबधब्याला वेठीस धरण्याचें सुचलें नसेल हें शक्यच नाहीं. पण अजून तें अमलांत आलें नाहीं इतकेंच. एवढ्या शक्तीचा उपयोग कसा करायचा तें सुचलें नाहीं कीं, सरहद्दीचें भांडण आडवें येतें कीं तिसरेंच कांहीं कारण आहे तें मी आतां विसरून गेलों आहें. एवढें मात्र खरें कीं, गिरसप्प्याची शोभा अजून पूर्वीच्याइतकीच प्राकृतिक, उदात्त आणि अक्षुण्ण राहिली आहे.

भगिनी निवेदिता यांनीं केलेल्या प्रख्यात तुलनेचें येथें स्मरण होतें. कोणत्याहि स्थानाच्या रमणीयतेनें हिंदवासियाला आकर्षित केलें कीं, त्यानें लागलीच त्याला धार्मिक स्वरूप दिलेंच म्हणून समजावें. कोणतेंहि अद्भुत, रमणीय किंवा भव्य दृश्य पहातांक्षणींच हिंदी हृदयाला वाटतें कीं, हा तर गाईनें वासराला बोलवावें त्याप्रमाणें परमात्मा जीवात्म्याला बोलावीत आहे. नायगऱ्याचा धबधबा जर हिंदुस्थानांत गंगामाईच्या प्रवाहानें झाला असता तर येथल्या जनतेनें त्याच्याभोंवतीं कशा प्रकारचें वातावरण निर्माण केलें असतें? आमोद-प्रमोद व वनभोजनें करणाऱ्या टोळ्या किंवा आगगाडीचे प्रवासी यांच्याऐवजीं धबधब्याची पूजा करण्यासाठीं वार्षिक अथवा मासिक यात्रेकरूंचे थवेच्या थवे येथें गोळा झाले असते. भोगविलासाचीं सगळीं साधनें

पुरविणाऱ्या हॉटेलांच्याऐवजीं धबधब्याच्या कांठीं, किंवा त्यांच्यां मधोमध सुद्धां, उचंबळून येणाऱ्या हृदयांतील भक्तिभाव ओतण्यासाठीं मंदिरें उभारलीं गेलीं असती. सृष्टीचें वैभव पाहून भपकेदार ऐषआराम किंवा मौजमजा यांच्या-ऐवजी लोकांनीं येथें तपश्चर्या केली असती. आणि इतक्या प्रचंड शक्तीला माणसाच्या फायद्यासाठीं किंवा सुखसोयींसाठीं बंदिस्त करून ठेवण्याचें डोक्यांत येण्याऐवजीं निसर्गाशीं एकरूप होऊन जाण्याच्या मस्तींत भैरव-झेंप घेऊन पाण्याच्या प्रवाहांत आपला जीवनप्रवाह मिसळून देण्याचेंच त्यांना सुचलें असतें. स्वभाव-भिन्नतेंत आतां कांहीं बाकी राहिलें ?

पण निसर्गाची भव्यता पाहून त्यांत आपला देह सोडून देणें यांत खरोखर आध्यात्मिकता आहे का ? छेः, देहाचीं सारीं बंधनें गळून पडावींत, 'वाटेल तें होवो येनकेन प्रकारेण जगेनच' अशी पामर जीवनाशा मनुष्यानें टाकून द्यावी यांत आध्यात्मिक प्रगति आहे हें निःसंशय. पण ही वृत्ति स्थायी असली पाहिजे. क्षणिक उन्मादाला कांहींच अर्थ नाहीं. फन्ना होण्याची इच्छा प्रत्येक मनुष्यांत कधीं कधीं उत्पन्न होतेच. इष्काची ती एक विकृति आहे. तिच्यांत अमुक आध्यात्मिक तत्त्वांचे आभास पाहून तिच्यावर फिदा होणें मनुष्यजीवना-च्या महत्तेला शोभत नाहीं. भगवान् बुद्धानें आपल्या अचूक नजरेनें तिला विभवतृष्णा हें नांव देऊन तिचा धिक्कार केला आहे. विभव म्हणजे नाश. भगवान् मनूनीं सुद्धां हीच गोष्ट स्पष्ट शब्दांत सांगितली आहे :

**नाभिनन्देत मरणं नाभिनन्देत जीवितम् ॥**

गिरसप्प्याच्या धबधब्यासारख्या रोमहर्षण दृश्याच्या सहवासांत यंत्रें, अश्वशक्ति ( हॉर्सपॉवर ), विद्युत्प्रकाश आणि कारखाने यांचा विचार करणें म्हणजे आत्म्याला विसरून बाह्य वैभवाचें ध्यान करण्यासारखें आहे यांत शंका नाहीं. पण आसपासचा प्रदेश दुष्काळानें पीडित असेल, लोक अनेक रोगांना बळी पडत असतील आणि प्रजेचें हें दुःख दूर करण्यासाठीं या धबधब्याच्या पाण्याचा अन्य रीतीनें उपयोग करणें हाच एक उपाय असेल तर अशा वेळीं आपला काय आग्रह राहील ? सृष्टिसौंदर्यानें वेडावून जाणाऱ्या आपल्या सौंदर्य-रसिक चित्ताच्या आल्हादाचें साधन – हा जो धबधबा – त्याला तसेंच ठेवावें कीं आपद्ग्रस्त अशा आपल्या बांधवांना दुःखमुक्त करण्यासाठीं त्याचा बळी

द्यावा ? पुरेसें धान्य मिळत नाहीं अशा वेळीं आणि जागीं धान्याची शेती सोडून आपण गुलाबाची शेती केली तर आपला हृदयविकास होईल का ? गुलाबांत काव्य आहे, धान्यांत कारुण्य आहे. दोहोंतून कोणतें पसंत करावें ? इंग्लंडच्या एका प्राचीन राजानें अनेक खेडीं उजाड उद्ध्वस्त करून मृगयेसाठीं त्यांचें एक महान् उपवन तयार केलें. राजा मर्दानी खेळांचा भोक्ता होता याविषयीं शंका नाहीं. पण प्रश्न आहे तो त्याला प्रजासेवक मानतां येईल कीं नाही याचा. कलेविरुद्ध सेवेचा प्रश्न येऊन उभा राहिला, काव्य व कारुण्य यांतील कोणत्या वृत्तीचा परिपोष करावा हें नक्की करायची पाळी आली तर कोणत्या निकषावर घासून निर्णय द्यावा ? रोम जळत आहे व नीरो फिडल वाजवीत बसला आहे आणि मिथिला जळत आहे नि जनक राजा आध्यात्मिक चर्चा करीत बसला आहे यांत बरेंच अंतर आहे. प्रजेच्या सेवेसाठी जितकें म्हणून करणें शक्य आहे तितकें सर्व केल्यावर व्यर्थ चिंता करीत हृदय जाळण्यापेक्षां हृदयांतील अंतर्यामीचें स्मरण दृढ करण्याचा प्रयत्न करणें आर्यवृत्तीचें द्योतक आहे. मूठभर लोकांच्या विलासासाठीं किंवा ऐश्वर्यासाठीं निसर्गाच्या शक्तीचा उपयोग करणें आणि प्राकृतिक सौंदर्याचा नाश करणें निवळ अधर्म होय; पण प्राणिमात्राच्या आर्तिनाशनाच्या साधनेमधून होणारा हृदयविकास सोडून प्रकृतीच्या विभूतिदर्शनांतून तो शोधण्याची इच्छा बाळगणें कितपत इष्ट आहे हें विचार करण्याजोगें आहे.

ते रुसलेले गृहस्थ आपल्या काल्पनिक अपमानाच्या जळफळाटांत समोरच्या दृश्याला विसरून गेले होते; आणि मी माझ्या तात्त्विक कल्पनाविहारांत शून्य दृष्टीनें समोर पहात होतों. दोघेहि अभागी होतों, कारण कल्पना किंवा जळफळाट चालवण्यासाठीं मागाहून वाटेल तितका वेळ मिळता. धुक्याचें पडळ पुन्हां दाटून आलें. आतां धबधबा पुन्हां थोडाच दिसणार ? राजाजींनीं सांगितलें, ‘ उन्हाळ्यांत जेव्हां धबधबा पडतो तेव्हां पाण्याच्या तुषारांवर नाना तऱ्हेचीं इंद्रधनुष्यें दिसतात. त्या वेळची शोभा सर्वस्वीं वेगळीच असते. ’ आणि चांदण्या रात्रीं देखील धनुष्यें दिसत नाहींत असें नाहीं. म्हैसूरच्या सर्वसंग्रहांत ( गॅझेटियरमध्यें ) लिहिलें आहे कीं, गवताचे मोठमोठे भारे पेटवून धबधब्यांत सोडून दिल्यानें अंधाऱ्या रात्रीं साऱ्या दरीनें पेट घेतला आहे असा भास होतो. कित्येक लोकांनीं रात्रीं दारूकामाचे अनेक बाण सोडूनहि

येथें अद्भुत आनंद मिळविला आहे. उत्पाती मनुष्यप्राणी जें कांहीं करील तेवढें थोडेंच! मला मात्र असलें कांहींच रुचत नाहीं. अशा ठिकाणीं निसर्ग जो खुराक चारतो त्याची स्वाभाविक रुचि अनुभवण्यांतच खरी रसिकता आहे. मानवी मसाला मिळाल्यानें स्वाद आणि पचनशक्ति दोन्ही बिघडतात.

आतां आम्ही बंगल्यांत येऊन पोहोंचलों. बरोबर आणलेलें खाणें उदरस्थ केलें. येथलें पाणी तर पिण्याची सोय नाहीं. लगेच हिंवताप लागतो. बहुतेकांनीं गरम गरम कॉफी पिऊनच तहान भागवली. मीं मात्र त्या दिवशीं चातकाप्रमाणें पावसाचे थोडे थेंब मिळवूनच संतोष मानला.

धबधब्याचें पुन्हां एकदां दर्शन घेऊन आम्ही परत फिरलों. आतां पुरतें कळून आलें कीं, धबधबे तीन नसून चार आहेत. डाव्या हातचा पहिला मोठा धबधबा तो राजा. त्याच्या बाजूच्या दरींतून आक्रोश करीत त्याला येऊन मिळणारा 'रोअरर' (Roarer). तो माझा रुद्र. माथ्यावरची कारंज्यांची पांढरी जटा फुलवून दाखविणारा तो 'रॉकेट.' त्याला आतां वीरभद्र म्हटल्यावांचून गत्यंतर नव्हतें. आणि शेवटीं येणाऱ्या बाजूच्या धबधब्याचें तन्वंगी पार्वती हेंच नांव मीं कायम केलें. इंग्रजांनीं रुद्राला Roarer नांव दिलें आहे, वीरभद्राला Rocket आणि पार्वतीचें नांव ठेवलें आहे Lady.

आतां आम्ही परत निघालों. पायांना जळवा डसण्याची भीति होती. येथल्या लोकांनीं आम्हां सर्वांना सावध तर केलेंच होतें कीं, सांभाळून चाला. जळवा डसल्या तर कळणार सुद्धां नाहीं आणि रक्त शोषलें जाईल. मीं म्हटलें, त्याची चिंता नका करूं. इंग्रजांना चांगले ओळखूं लागलों आहोंत ते काय जळवांना थोडेच बधणार आहोंत ! तरीहि जवळ जवळ प्रत्येकाच्या पायाला एक एक जळू डसलीच. माझ्या शरिरांतील रक्ताचें फारसें आकर्षण नसल्यामुळें म्हणा, किंवा माझें रक्तच कडू असल्यामुळें म्हणा अथवा काकदृष्टीनें मी बघून बघून चालत होतों म्हणून म्हणा, मी मात्र बचावलों होतों. आम्ही थोडे पुढें गेलों, पण मणिबेनच्यानें रहावलें नाहीं. 'जरा थांबा, पुनः एकदां जमल्यास या बाजूनें धबधब्याचें दर्शन घेऊन येतें.' 'पण धुकें विरलेंच नाहीं तर?' 'नाही विरलें तर कांहीं नाहीं, परत येऊं. एकदां पाहूं तर द्या.'

परत फिरतांना रस्त्याला एक फाटा फुटला होता, त्या वाटेनें जाऊन कित्येकांनीं पार्वतीचें जवळून दर्शन घेतलें आणि तेथें जमीन निसरडी असल्या-मुळें 'वंदे मातरम्' म्हणून पार्वतीला साष्टांग नमस्कार सुद्धां घातला!

जाते वेळीं ज्या रस्त्यावर अज्ञात आणि अननुभूत अवस्थेचें काव्य अनु-भवलें होतें त्याच रस्त्यानें परततांना संस्मरणांचें स्मृति-काव्य आम्ही अनुभवूं लागलों. अर्थात् तींच तींच दृश्यें उलट्या दिशेनें पहाण्यांत कांहीं कमी नावीन्य नव्हतें. ज्या झाडांबद्दल जातांना आम्ही बोललों होतों तींच झाडें परततांना देखील लक्ष वेधून घेणारच. अर्थात् या परिचित मित्रांना 'कसें काय?' म्हणून कुशल विचारल्यावांचून पुढें कसें जाववेल?

आणि झाडाझाडांमध्यें प्रेमाचा पूल बांधणाऱ्या वेली? त्यांच्या नम्रतेला नमन केल्यावांचून पुढें जाईल तो अरसिकच म्हटला पाहिजे. आम्ही हळूं हळूं नदीतीरापर्यंत येऊन पोहोंचलों. आतां त्याच शांत प्रवाहावरून परत जावयाचें होतें. धुक्याचे ढग आतां विखुरले होते. नदीचें शांत पाणी हळूं हळूं धबधब्याकडे जात असलेलें पाहून माझ्या मनांत बलिदानासाठीं चाललेल्या मेंढरांच्या कळपाचें चित्र उभें राहिलें. मी त्या पाण्याला म्हणालों, 'केवढा मोठा अधःपात पुढें वाढून ठेवला आहे ह्याची थोडी देखील कल्पना तुम्हांला नाहीं. म्हणूनच इतक्या स्वस्थ चित्तानें तुम्ही पुढें चाललां आहांत.'

'अथवा नाहीं, मीच चुकत आहें. तुम्ही जीवनधर्मी आहांत. तुम्हांला विनाशाचे भय कसलें?

प्रायः कन्दुकपातेन पतत्यार्यः पतन्नपि।

'जितक्या उंचावरून पडाल तितकेच उंच वर उसळाल. तुमची कींव करणारा मी कोण?' शरावतीच्या पवित्र पाण्याला स्पर्श करण्यासाठीं मीं हात लांबवला, तों पाणी खळखळ हंसून म्हणालें: 'न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात! गच्छति'. होडी या कांठावर येऊन पोहोंचली आणि आमच्या मनांत विचार आला कीं, मोटर या अंगानें जरा खालीं घेतली तर त्याच धबधब्याची फिरून उजवी यात्रा देखील होईल. आम्ही जाऊन आलों होतों त्या बाजूला म्हैसूर-बाजू म्हणतात आणि ज्या उजव्या बाजूनें जाण्यास निघालों ती

मुंबई-बाजू म्हणून ओळखली जाते. कारण जोग या दोन राज्यांच्या सरहद्दीवर आहे.

येथें तर आम्ही अगदीं जवळ येऊन ठेपलों. मोठमोठ्या खडकांमधून वाट काढीत मी धावूं लागलों. दोन वर्षांचा दुखणेकरी म्हणून माझी चांगलीच ख्याति पसरलेली होती. त्यामुळें मला धांवतांना बघून राजाजींना आश्चर्य वाटलें. ' हे तर महाराष्ट्राचे मावळे आहेत. शिवाय हिमालयाचे यात्रेकरू देखील आहेतच. माशांना पाणी तसा मराठ्यांना डोंगर. ' पण मला कुठें असलीं बोलणीं ऐकायला थांबायचें होतें ? मी आपला धांवत धांवत राजा धबधब्यांच्या शेजारीं जी प्रसिद्ध दरड आहे तेथें जाऊन पोहोंचलों. येथें उभ्या उभ्या खालीं पहाण्याची सोयच नाहीं. घेरी येऊन मनुष्य खालींच पडायचा. चारहि धबधब्याच्या आवाजानें कान इतके कांहीं भरून गेले होते कीं, दुसरें कांहीं ऐकण्याइतकी जागाच त्यांत उरली नव्हती. धबधब्याचें पाणी ज्याप्रमाणें वरून खालीं दरींत पडून पुन्हां वर उसळत होतें त्याचप्रमाणें कानांतून देखील आवाज पुन्हां उसळत असले पाहिजेत. प्रथम माझें लक्ष वेधलें राजाच्या गंडस्थळावरून रुळणाऱ्या मोत्यांच्या सरांनीं आणि जलप्रलयांतून लोकांना वांचविण्यासाठीं जसे पट्टीचे पोहणारे वीर-बहादर उड्या घेतात त्याप्रमाणें या बाजूच्या धबधब्यांतून युक्तीनें पार होणाऱ्या पक्ष्यांनीं. या पक्ष्यांना या धबधब्याच्या भीषण भव्यतेची कल्पनाच येत नाहीं कीं ईश्वरानें त्यांच्या हृदयांत इतकी हिंमत प्रेरली आहे ? मला वाटतें कीं, आगंतुक पक्षी कांहीं इतकी हिंमत करणार नाहींत. हे जोगनिवासी येथेंच जन्मलेले, धबधब्याच्या पडळाच्या सुरक्षितेंत वाढलेले. सिंहाचे छावे सिंहिणीला भीत नसतात. समुद्रांतील मासे लाटांत स्वच्छंद क्रीडा करतात, त्याचप्रमाणें हे जोगपुत्र जोगशीं खेळत असावेत.

राजा धबधबा म्हैसूर-बाजूनें दुरून पाहिला होता तेव्हां तो कांहीं वेगळाच दिसत होता. येथें तर जणुं काय हत्तीच्या गंडस्थळावरच पहुडलों आहोंत इतक्या जवळ आम्ही होतों. वरचें पाणी धबधब्याकडे असें कांहीं खेंचलें जात होतें कीं, जणुं काय एखादा महान् जनसमाज कळत नकळत, इच्छा असो नसो, महान् क्रांतीकडे धांवत आहे! मोठा जनसमाज जेव्हां सामाजिक आणि राजकीय सुधारणांच्या वेगांत वहात जातो तेव्हां पुढें काय वाढून ठेवलें आहे याची त्याला कल्पना नसते. आणि कल्पना असली तरी ' आपल्या बाबतींत तें

खरें ठरणार नाहीं; आपण कसे तरी निभावून जाऊं ' अशी आंधळी आशा तो बाळगतो. मध्यंतरीं सुधारणेचा कफ वाढतच जातो. शेवटीं जहाल लोक संयम सुचवितात, तर मवाळ लोक आंधळे होऊन बेजबाबदार लोकांशीं हातमिळवणी करतात आणि मग इच्छा असली तरी मागें फिरूं शकत नाहींत ! अथवा ते स्वतः मागें फिरले तरी काय ? धनुष्यांतून सुटलेला बाण कधीं काळीं मागें खेंचतां आला आहे ? जी अटळ नाहीं ती क्रांति कसली ?

धबधब्याचें पाणी खालीं किती खोलवर जातें तें पहाणें किंवा जाणून घेणें अशक्य होतें. कारण उसळत्या पाण्याचीं मोठमोठीं अभ्रें धबधब्याच्या पायाला विळखा घालून डोलत होतीं. काय तो पाण्याचा आवेशयुक्त उत्सव ! जणुं काय महादेव संहारकारी तांडवनृत्यच करीत आहे आणि समोरचा रुद्र त्याला ताल देत आहे. पण रोमांचकारक शोभेचा परम उत्कर्ष तर समोरचा वीरभद्रच दाखवितो. तुम्हांला वाटणारच नाहीं कीं, येथें पाणी पडतें आहे, येथें पाणी उडतें आहे. मोठमोठ्या तोफांतून गोळ्याच्या वेगानें कोरड्या पिठाचे फवारे उडत असावेत तसाच तो देखावा होता. त्या देखाव्याचें वर्णन शब्दांनीं करतांच येणार नाहीं. कारण शब्द हे ' शांति आणि व्यवस्था ' यांच्या पठडींत वाढलेले असतात.

आम्ही पडल्या पडल्या येथून तें दृश्य डोळे भरून पाहिलें अथवा खरें सांगावयाचें म्हणजे वाटेल तितकें पडून राहिलों तरी तृप्ति होणें अशक्य आहे अशी खात्री होईपर्यंत पाहिलें. आम्ही उठून परत फिरलों; पण मागें फिरणें सोपें नव्हतें. कुणी तरी एकजण उठायचाच नाही. त्याला खेंचून आणण्यासाठीं दुसरा जाई तो स्वतःच त्या नयनोत्सवाला खिळून राही. पहिला पस्तावून उठला तरी बोलवायला परत गेलेला कांहीं उठायचा नाहीं. आणि दोघेहि कसाबसा संयम करून मागें परतताहेत, तों त्या दोघांवर चिडून त्यांची कान-उघाडणी करण्यासाठीं आलेला तिसरा क्षणभर डोळे तृप्त करण्यासाठीं तेथें उभा राही आणि त्या दोघांच्या संयमाला थोडें ढिलें करी. त्या दोघांना वाटे, इतका चिडलेला हा समाजनियंता गृहस्थ जितकी सूट घेत आहे तितकी आपणहि घेतली तर त्यांत कांहीं बिघडत नाहीं. आपण कुठें त्याच्याहून अधिक संयमी असल्याचा दावा करीत आहोंत ? मला वाटलें कीं, थोडेंसें त्या पुढच्या खडका-वर गेलें तर राजाच्या पाण्यांत पाय बुडवितां येईल. पण नदीचें पाणी थोडें

थोडें वाढत होतें; त्यांत तो खडक लहानसें बेटच बनला होता, म्हणून राजाजींनीं मला जाऊं दिलें नाहीं. मलाहि वाटलें कीं, त्यांचें न ऐकलें तर दुहेरी उद्धटपणा होईल. राजाजींच्या सूचनेचें उल्लंघन कसें करावें ! आणि 'राजा'च्या डोक्यावर पाय कसा ठेवावा ?

आम्ही परत फिरलों. भक्ति, विस्मय, मानवी जीवनाची क्षणभंगुरता, दृश्याची भव्यता, या क्षणांची धन्यता, अशा किती तरी वृत्तींचे ढग हृदयांत दाटून आले होते. आणि तेथून त्या वीरभद्राप्रमाणें मस्तकांत आपले बाण सोडीत होते. विचारांचें हें दारूकाम अद्भुत असतें. हृदयांतून बाण सुटतो तो तडक मस्तकापर्यंत जाऊन तेथें फुटतो. अशा वेळीं स्वस्थ शरीर कसें अस्वस्थ होऊन जातें, याचा ज्यानें अनुभव घेतला आहे त्यालाच त्याचा चमत्कार कळून येईल.

अशा या ठिकाणीं मंदिर कसें नाहीं ? आपल्या लोकांचीं मंदिरें म्हणजे जन्मभूमींतील काव्यमय स्थानें. पर्वताचें अमुक शिखर उत्तुंग आहे ? मग तेथें एखादा ऋषि ध्यानधारणेसाठीं जाऊन बसलाच आणि भक्तांनीं तेथें एक मंदिर बांधलेंच म्हणून समजावें. मग तें पुण्याजवळील पर्वती असो, चंपानगरी-जवळील पावागढ असो, जुनागढजवळील गिरनार असो कीं हिमालयाच्या 'उसपार'चे कैलास शिखर असो. दक्षिणेकडे धांवणारी नदी अमुक ठिकाणीं उत्तरवाहिनी झाली आहे ? चला वसवा तेथें एक तीर्थ ! कोट्यवधि लोकांनीं यावें आणि पावन होऊन जावें. दोन मोठमोठ्या नद्या एकमेकींना मिळताहेत ! मग त्या प्रयागावर आपल्या संतांनीं तिसरी आपली सरस्वती वाहती केलीच आहे. सगळ्या यात्रा पूर्ण होऊन मनुष्य समुद्रापर्यंत येऊन पोहोंचला ? तेथें भक्तांनीं जगन्नाथ किंवा सेतुबंध महादेव आणून बसविलाच आहे. जेथें जमिनीचा शेवट दिसला तेथें एकतर कन्याकुमारी असेल अथवा देवेन्द्र असेल. दूरवर पसरलेल्या, लांबलचक वाळवंटांत एखादें सरोवर दिसलें तर तें नारायणाचेंच सरोवर आहे, त्याची पूजा झालीच पाहिजे. आणि काश्मीरची क्षीरभवानी ?

आपल्या संतकवींनीं तीर्थस्थानें कोठें कोठें बसविलीं आहेत याचा शोध करूं लागलों तर हिंदुस्थानचा सारा भूगोल पालथा घालावा लागेल. मुसलमान संतांनीं आणि रोमन कॅथालिक पाद्र्यांनीं देखील आपल्या देशांत अशाच प्रकारें

अद्भुत काव्यमय स्थानें निवडलीं आहेत आणि तेथें पूजा-प्रार्थनेची सोय करून ठेवली आहे. मग या धबधब्यापाशींच मंदिर कां नाहीं? काय जीवनराशीचा एवढा मोठा अधःपात पाहून मुनिजन खिन्न झाले असतील? भैरवघाटीप्रमाणें येथेंहि देह विसर्जन करण्याचा कैफ चढण्याचा संभव आहे असें वाटून लोकसंग्रहकार मुनींनीं लोकयात्रेसाठीं हें स्थान नापसंत केलें असेल? अथवा डोकें भणाणून टाकणारी अखंड व भीषण गर्जना ध्यानाला अनुकूल नाहीं असें समजून उपासक येथून विमुख झाले असतील? किंवा हा धबधबा स्वतःच अभय ब्रह्माची मूर्ति आहे, त्याच्या शेजारीं ध्यान खेचून घेऊं शकेल अशी कोणती मूर्ति उभी करावी, म्हणून गोंधळांत पडून ते येथून निवृत्त झाले असतील? कोणी सांगावें? आपल्या पूर्वजांनीं येथें देऊळ बांधलें नाहीं याचें मला यत्किंचितहि दुःख नाहीं. पण हें स्थान पाहून स्फुरलेल्या भावांचें एखादें तांडवस्तोत्र तर त्यांनीं अवश्य लिहावयास पाहिजे होतें. पार्थिव मूर्ति जेथें कामीं येत नाहीं तेथें वाङ्मयी मूर्ति अवश्य स्फूर्तिदायक होऊं शकती.

ही सगळी शोभा आम्ही धबधब्याच्या माथ्यावरून पहात होतों. होन्नावरकडून येणारे लोक उत्तर कानडा जिल्ह्याच्या घोर अरण्यांतून येत असतील तेव्हां त्यांना या धबधब्याचें आपादमस्तक दर्शन होत असेल. कोणतें अधिक सुंदर हें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय कोण सांगूं शकेल? आणि प्रत्यक्ष पाहूनहि काय?. निसर्गाच्या वेगवेगळ्या विभूतींची कधीं तुलना होऊं शकली आहे? हिमालयाची भव्यता, सागराची विशाल गंभीरता, वाळवंटाची भीषणता आणि आकाशाची नम्र अनंतता यांच्यामध्यें तुलना किंवा निवड कोण करूं शकेल? म्हणून एकदां होन्नावरच्या मार्गानें जोगच्या दर्शनास आलेंच पाहिजे.

आरमाराचा अनुभव घेऊन कुशल बनलेले कित्येक लष्करी अधिकारी धबधब्याचें मोजमाप घेण्यास आले होते आणि पाळण्यांतून लटकत धबधब्याच्या मागील अंगास गेले होते, त्यांना कसा काय अनुभव आला असेल? जोगनिवासी पक्ष्यांनीं त्यांचें कसें स्वागत केलें असेल? धबधब्याच्या पडद्यांतून आंत पसरणारा बाहेरचा प्रकाश त्यांना कसा दिसला असेल? आणि धबधब्यामागें गवत पेटवून जर मोठा उजेड केला तर साऱ्या दरींत कशी गंधर्वनगरी निर्माण होईल याची कुणाला कल्पना आहे का? जेव्हां येथें विजेचा कारखाना सुरू होईल तेव्हां कित्येक कल्पनावीर नक्कीच या धबधब्याच्या मागें विजेच्या दिव्यांच्या माळा

पेटवून लावतील आणि जगानें कधीं पाहिलें नाहीं असें इंद्रजाल पसरवतील. त्या वेळीं सगळ्या दरीला एका महान् रंगभूमीचें स्वरूप येईल आणि चारहि खंडांतील भूदेव ती पहाण्यासाठीं येथें अवतरतील. पण त्या वेळीं कुणाला ईश्वराचें स्मरण होईल का ? माणसानें आपली बुद्धिशक्ति ईश्वराला ओळखण्यासाठीं वापरायचें सोडून ईश्वराला विसरून जाण्याच्या युक्त्या आणि पद्धति शोधण्यांतच ती खर्चीं घातलेली दिसते.

कदाचित् असेंहि असेल कीं, सर्व बाजूंनीं परास्त झाल्यानंतरच बुद्धि ईश्वराला चांगल्या रीतीनें समजूं शकत असेल.

प्रत्येक गोष्टीला शेवट असतोच; अर्थात् आमच्या या जोग-यात्रेचाहि शेवट झाला. अत्यंत पवित्र आणि मधुर स्मृति घेऊन आम्ही परत फिरलों. पण पुन्हां एकदां येथें येऊन जाण्याची वासना उरलीच. म्हणून ‘ पुनरागमनाय च ’ अशा शास्त्रोक्त शब्दांनींच आम्हांला भारत-वैभवाच्या या असाधारण विभूतीचा निरोप घ्यावा लागला.

ग्रंथालय ठाणे
क्र. १२२९२

# गोकर्ण

४

लंकापति रावण सारा हिंदुस्थान ओलांडून उत्तरेकडे हिमालयाच्या शिखरावर बसून तपश्चर्या करूं लागला. त्याच्या मातेनें त्याला पाठविलें होतें. महान् सम्राट् शिवपूजक रावणाच्या मातेनें काय सामान्य पाषाणलिंगाची पूजा करावी ! तिनें आपल्या मुलाला सांगितलें, "वत्सा, कैलासाला जा आणि देवाधिदेव महादेवाकडून त्याचें आत्मलिंग मागून आण. आत्मलिंगावांचून माझी पूजाच होऊं शकणार नाहीं."

मातृभक्त रावण निघाला. हिमालयाच्या पलीकडे मानससरोवर आहे त्यांतून रोज एक सहस्र कमळें तोडून त्यानें कैलासनाथाची पूजा आरंभली. तपश्चर्या एक हजार वर्षे चालली.

एकदां काय झालें कुणास ठाऊक, हजारांत नऊ कमळें कमी पडलीं. पूजेंतून मधेंच उठतां येत नाहीं आणि कमळांच्या सहस्र संख्येंतून एक देखील कमळ कमी पडतां कामा नये ! आतां काय करावें ? आशुतोष महादेव शीघ्रकोपीहि आहे; सेवेंत जरा कमतरता पडली तर सर्वनाशच करावयाचा. रावणाची बुद्धि किंवा हिंमत कच्ची नव्हती. त्यानें एकेक शिरकमळ कलम करून महादेवाला वहायला सुरुवात केली. अशा भक्तीला अप्राप्य काय असणार ? नऊ शिरकमळें अर्पण होतांच भोलानाथ प्रसन्न झाले आणि म्हणाले, "वर माग, वर माग ! वरं ब्रूहि ! जितकें मागशील तितकें थोडें !" कृतार्थ झालेल्या रावणानें म्हटलें, "माझी माता पूजेला बसली आहे तिला तुझें आत्मलिंग हवें आहे." तोंडांतून एवढें वचन निघण्याचा अवकाश, शंभूनें स्वतःचें हृदय चिरून त्यांतून आत्मलिंग काढून दिलें.

त्रिभुवनांत हाहाकार उडाला. देवाधिदेवानें आत्मलिंग काढून दिलें ! आणि तें पण कुणाला ? सुरासुरांचा काळ बनलेल्या रावणाला ! आतां त्रैलोक्याचें

कसें होईल? ब्रह्मदेवानें विष्णूकडे धांव घेतली. लक्ष्मी सरस्वतीकडे जाऊन विचारूं लागली. इंद्र मूर्च्छित झाला. यमधर्म थरथरा कांपूं लागला. शेवटीं सर्वांनीं विघ्नविनाशक गणपतीची आराधना केली आणि त्याला गळ घालून ते त्याला म्हणाले, " बाबा, कसेंहि कर, पण हें शिवलिंग लंकेला पोहोंचणार नाहीं असें कर ! "

महादेवानें रावणाला सांगून ठेवलें होतें, " हें लिंग घेऊन जा. पण लक्षांत ठेव कीं जिथें जमिनीवर ठेवशील तिथेंच स्थिर होईल. " महादेवाचें लिंग तें ! पाऱ्याहूनहि जड. रावण लिंग हातीं घेऊन पश्चिम समुद्राच्या किनाऱ्याकिनाऱ्यानें लगबगीनें लंकेकडे जात होता. संध्याकाळ होण्याची तयारी होती. इतक्यांत रावणाला लघुशंका लागली. शिवलिंग हातांत धरून लघुशंका कशी करावी? आणि जमिनीवर तर तें ठेवतां येत नाहीं. अशा पेंचांत रावण पडला असतां देवांच्या संकेताप्रमाणें गणपति एका गुराख्याचें रूप धारण करून गाई चारीत आहे असा तेथें प्रगट झाला. रावणानें त्याला हांक मारून म्हटलें, " अरे पोरा, हें लिंग जरा हातांत धरून ठेव. जमिनीवर ठेवूं नको हो ! " गणपति म्हणाला, " लागतें तर फार जड बुवा ! पण मी प्रयत्न करीन. जर झेपलें नाहीं तर तुला मी तीन वेळां हांक मारीन. तेवढ्यांत जर तूं आला नाहींस तर आमच्य कानीं सात खडे ! "

प्रश्न फक्त लघुशंकेचाच होता. ती आटपायला लागून लागून किती वेळ लागणार? असा विचार करून रावण बसला. पण काय झालें होतें कुणास ठाऊक, आज त्याच्या पोटांत सात समुद्रच भरले असले पाहिजेत गणपतीनें एक हांक मारली पण बोलायचें कसें? जानवें कानावर आहे तोंपर्यंत बोलण्याची सोय नाहीं. गणपतीनें दुसरी हांक मारली तरीहि लघुशंका संपेना. तो अगदीं कावराबावरा झाला. कराराप्रमाणें सिद्धिविनायकानें तिसरी हांक मारली आणि ताबडतोब भार असह्य झाला असावा त्याप्रमाणें 'अरेरेरे' म्हणत त्यानें शिवलिंग जमिनीवर ठेवून दिलें. शिवलिंगच तें ! जमिनीवर ठेवलें मात्र, हां हां म्हणतां अगदीं पाताळापर्यंत जाऊन पोहोंचलें देखील. रावण रागानें आंधळा झाला. त्यानें गणपतीच्या कपाळावर जोरानें बुक्का मारला. गणपतीचें कपाळ रक्तबंबाळ झालें. एवढा पराक्रम करून रावण लिंग उपटून काढण्यासाठीं धांवला; पण तें आतां कसचें साधणार? रावण लिंग

उपटण्याचा जसजसा प्रयत्न करूं लागला, तसतशी सारी पृथ्वी हादरूं लागली, पण लिंग कांहीं बाहेर येईना. शेवटीं रावणानें तें लिंग जोरानें पिळवटलें. त्याचे तुकडे रावणाच्या हातीं आले. ते त्यानें चार बाजूला फेकून दिले.

रावण रागानें आणि निराशेनें लंकेला परत गेला. जगांत नुसत्या तपश्चर्येनें काम भागत नसतें. धूर्त लोकांचा कावा ओळखण्याचीहि बुद्धि असावी लागते.

मुरडलेल्या लिंगाचा जो मुख्य भाग राहून गेला त्यालाच गोकर्ण महाबळेश्वर म्हणतात. कारण पिंडीचें वरचें टोक गाईच्या कानासारखें चपटें आहे. या पृथ्वीतलावर याच्याहून अधिक पवित्र असें तीर्थस्थान नाहीं.

गोकर्ण महाबळेश्वर हें स्थान कारवार आणि अंकोला या दोन बंदरांच्या मध्यें तदडी बंदराच्या उत्तरेला सहाएक मैलांवर समुद्रकांठीं आहे. दक्षिणेकडे गोकर्ण महाबळेश्वराचें महत्त्व काशीविश्वेश्वराहून अधिक मानलें जातें. लिंग जमिनीच्या आंतच आहे. लिंगाच्या साळुंकींत मध्येंच एक भोंक ठेवलेलें आहे. त्यांत अंगठा घातला असतां आंतील लिंगाचा स्पर्श होतो. दर्शन होण्याची आशाच नको! पुजारी म्हणतात कीं, लिंगाची शिळा इतकी कांहीं मऊ आहे कीं ती भक्तांच्या स्पर्शानें झिजून जाते. म्हणून जुन्या लोकांनीं तिच्याभोंवतीं वरपर्यंत जलाधारी बसवून केवळ अंगुष्ठ स्पर्शाची सोय ठेवली आहे. पुष्कळ वर्षांनीं शुभ-शकुन झाला म्हणजे वरची साळुंकी काढतात, आसपासची बांधणी उखडून काढून मूळ लिंग हात दोन हात उघडें राहील, इतकें खुलें करतात. या उघड्या लिंगाचें दर्शन करण्यासाठीं यात्रा लोटते. अमुक महिने पुरे झाले म्हणजे नंतर मोती वांटून तयार केलेल्या चुन्यानें आसपासची चुनेगची पूर्वी-प्रमाणें करून टाकतात. या सर्व प्रकाराला 'अष्टबंध' म्हणतात असें मला स्मरतें.

आम्ही कारवारला असतांना एकदां कपिला-षष्ठीप्रमाणें दुर्लभ अशा या अष्टबंधाचा योग आला. वडील, आई आणि मी तिघेहि यात्रेला निघालों. गोकर्ण आगबोटीचें बंदर नाहीं. बोटी तदडीलाच जाऊन थांबतात. तदडी बंदरावरून गोकर्णाला मला नेण्यासाठीं एक गडी करण्यांत आला. मी त्याच्या काळ्या कुळकुळीत खांद्यावर बसून गोकर्णाला गेलों. तेथें आम्हीं कोटितीर्थांत आंघोळ केली. गोकर्ण महाबळेश्वराचें दर्शन केलें. स्मशानाचें रक्षण करणारा हरिश्चंद्र पाहिला. त्याच्या खांद्यावर एक चाबूक कोरलेला होता. जवळच एक तीर्थ होतें. त्यांत म्हणे हाडें टाकलीं असतां हळूहळू विरघळून

जातात. परत येऊन आम्हीं अहिल्याबाईच्या अन्नछत्रांत जाऊन त्या साध्वीच्या मूर्तीचें दर्शन केलें. कपाळावर खोक पडलेला आणि दोनच हात असलेला गणपति पाहिला. ब्रह्मदेवाची एक मूर्ति पाहिली आणि विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे रावणाच्या त्या प्रख्यात लघुशंकेचें कुंड पाहिलें. आज देखील तें भरलेलें असतें आणि भणाणून जावें इतकी त्याची दुर्गंधी आहे. इतरहि पुष्कळ पाहिलें असेल पण आतां तें कोठून आठवणार?

हो, बरें आठवलें! या प्रदेशांतली एक विशेष गोष्ट सांगण्याची राहूनच जात होती. घर गरिबाचें असो कीं श्रीमंताचें, जमीन काळी कुळकुळीत लिंपलेली असावयाची. जणुं काय काळ्या संगमरवरी दगडाची बनवली आहे. इतकी कांहीं गुळगुळीत आणि चकचकीत कीं मी जमिनींत पाहूनच गंध लावीत असे. उन्हाळ्याच्या दिवसांत जमिनीवर कांहींहि अंथरल्यावांचून सुखानें निजावें. वेळोवेळीं शेणांत काजळ मिसळून ही जमीन सारवली जाते. पण हें सारवणें हातानें होत नसतें. सुपारीच्या झावळ्यांच्या मुळाशीं पुठ्ठ्याप्रमाणें एक भाग असतो; त्याचा एक तुकडा घेऊन त्याच्या उभ्या कांठानें घासून घासून जमिनीला ओप काढलेली असते. कोंकणी भाषेंत त्या पुठ्ठ्याला पोवली असें म्हणतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ....39239.... विः ....
क्रमांक ........ नोंः दिः ....

# आंध्रची सौन्दर्यधानी

५

बेझवाडा अथवा बीझवाडा या नांवाचा वीज या शब्दाशीं संबंध असला पाहिजे असें मला कशामुळें वाटलें कुणास ठाऊक. जसें विजापूर तसेंच बीझवाडा अशी कांहींशी कल्पना झाली असावी. तपास केल्यावर आढळून आलें कीं, प्राचीन ग्रंथांत याचा विजयवाडा या नांवानें उल्लेख आहे. तेव्हां लगेच डोक्यांत एक नवा विचार आला आणि तुलना सुरू झाली कीं, आंध्र आणि कर्नाटक या दोघांनाहि ज्याच्याविषयीं आत्मीयता वाटावी असें आपापलें विजयनगर होतेंच. त्यासारखेंच हें विजयवाडा असलें पाहिजे. आज सुद्धां विजयवाडा हेंच आंध्रचें मुख्य शहर आहे. एखादा विजय मिळाल्यानंतर त्याचें स्मरण कायम टिकविण्यासाठीं विजयवाड्याची स्थापना झाली असावी. परंतु श्री. काळेश्वर राव म्हणाले, ( त्यांच्याच आमंत्रणावरून मी आज बेझवाड्याला आलों आहें ) "अर्जुनाचें एक नांव विजयच आहे ना ? त्यावरून हें नांव पडलें आहे. याच ठिकाणीं अर्जुनानें तपश्चर्या केली होती आणि किरात महादेवाशीं युद्ध करून पाशुपत अस्त्र प्राप्त केलें होतें." तेव्हां माझें मन उद्गारलें, "बरोबर, बरोबर ! येथल्या महादेवाला मल्लिकार्जुन म्हणतात त्यांत अर्जुन नांव येतें खरें."

तसें पाहूं गेल्यास अर्जुन हें एका झाडाचें नांव आहे. त्याच्या शेजारीं नाजूक फुलें देणारी मल्लिका किती शोभून दिसेल ! परंतु जेथें नांवाचा अर्थ लावण्यासाठीं जुन्या इतिहासाचा शोध करण्यांत येतो तेथें केवळ निसर्ग-काव्यानें कुणाचें कसें समाधान होणार ? पाटलिपुत्र अथवा कुसुमपूर या शहरामागें केवळ फुलांचें सौंदर्य आहे असें म्हटलें तर झाडाचेंच नांव धारण करणाऱ्या बिहारी सम्राट् अशोकाचें तरी समाधान होईल का ?

सह्याद्रीवरून एकच उडी घेऊन शरावतीप्रमाणें पश्चिम सागराला जाऊन मिळण्याऐवजीं कृष्णा नदी महाबळेश्वराहून पूर्वेस वळली आणि अनेक नद्यांपासून खंडणी वसूल करीत करीत पूर्व समुद्राला जाऊन मिळाली. आपल्या साऱ्या वैभवासकट समुद्राला जाऊन मिळण्याची तयारी करतांना तिचा उडणारा गोंधळ अथवा तिला होणारा हर्षोन्माद म्हणा हवें तर, डोळे भरून पहातां यावा या हेतूनें दोन शहरें मध्ययुगांत तिच्या कांठीं येऊन वसलीं. एका बाजूस विजयवाडा आणि दुसऱ्या बाजूस अमरावती. अमरावती हें एक जबरदस्त आणि समृद्ध विद्याधाम होतें आणि विजयवाडा एका महान् साम्राज्याचा कारभार चालवणारी राजधानी होती. हीं दोन शहरें विशाल कृष्णेच्या कांठीं समोरासमोर वसलेलीं होतीं. त्यामुळें विद्यापीठाला ( अमरावतीला ) स्वतःसाठीं आवश्यक अशी अलिप्तताहि लाभत होती आणि राजधानीच्या सान्निध्याचा लाभहि मिळत होता. राजधानीलाहि धर्म व विद्याकलेची उपासना करणारें धाम जवळच असल्यामुळें कर्तृत्वशाली लोकांची कधीं उणीव भासली नसावी. अमरावती म्हणजे इंद्रनगरी आणि विजयवाडा म्हणजे इंद्रपुत्र – अर्जुनाची तपोभूमि.

परंतु सौंदर्यधामाच्या वर्णनाच्या प्रारंभींच अभ्यासजड ऐतिहासिक संशोधन आणण्याची कांहीं आवश्यकता नाहीं.

मला बेझवाड्याचें सर्वप्रथम दर्शन झालें तें सन १९२१ च्या ऐतिहासिक महासमितीच्या बैठकीसाठीं मी बेझवाड्याला गेलों होतों तेव्हां. लोकमान्यांच्या पुण्यस्मृतीला साक्षी ठेवून राष्ट्रानें याच ठिकाणीं स्वराज्यसाधनेसाठी एक कोटि रुपयांचा निधि गोळा करण्याचा संकल्प केला होता. क्रांतिकारक चक्र ( चरखा ) चालवून साऱ्या देशाला खादीनें मढवून टाकण्याचा संकल्पहि येथेंच करण्यांत आला होता. कोठल्याहि महासभेच्या अधिवेशनांत पूर्वी कधींहि नसतील इतके आंध्रवासी दूरदूरच्या गांवांतून हातांत ध्वजपताका घेऊन भजनें गात गात येथें गोळा झाले होते.

सर्व प्रांतांचे प्रतिनिधि कृष्णेच्या पवित्र जलांत पहांटे स्नान करून सभेंत येत. भारताच्या तिरंगी झेंड्याच्या कल्पनेस मूर्त स्वरूप याच वेळीं व याच स्थळीं प्राप्त झालें होतें. लाल, हिरवा व पांढरा असे एकावर एक रंग निश्चित करून त्या सर्वांवर चरख्याची आकृति असली पाहिजे असें येथें गांधीजींनीं

सुचवलें होतें. हिंदूंच्या लाल रंगाच्या आधारावर मुसलमानांचा हिरवा रंग सुरक्षित आहे; आणि या दोन जमातींच्या अहिंसा वृत्तीच्या आधारावर बाकीच्या सर्व लघुमति वैरभावनेपासून मुक्त व भयरहित आहेत – अशी मूळ कल्पना होती आणि गरिबांचें एकमात्र आशास्थान असें अहिंसक उद्योगाचें चक्र ( चरखा ) त्यावर शोभत होतें

त्यानंतर महासभेनें एक समिति नेमली आणि नंतर तिच्या ठरावांतहि फेरफार करून पांढरा रंग मध्यें आणला. लाल रंगाऐवजीं केशरी रंग पसंत केला आणि केशरी रंग बलिदानाचा द्योतक आहे, हिरवा रंग फकिरीचा द्योतक आहे आणि सफेद रंग निर्वैर शांतीचा द्योतक आहे असें ठरवलें.

गेल्या पंचवीस वर्षांच्या काळांत मी कितीदां तरी बेझवाड्याला आलों आहे, कितीदां तरी भाषणें दिलीं आहेत, परंतु कोणत्याहि खेपेस कृष्णामातेचें दर्शन घेण्यास मी चुकलों नाही. कधीं सायंकाळीं, कधीं सूर्य माथ्यावर तळपत असतांना, तर कधी आकाश ढगांनीं घेरलेलें असल्यामुळें भीषण वाटणाऱ्या रात्रीं दहाच्या सुमारास मी कृष्णेच्या दर्शनासाठीं धांव घेतली आहे.

प्रत्येक ऋतूंत कृष्णेची आगळी शोभा येथें मला आढळली आहे. परंतु या खेपेस कृष्णेनें अद्भुत सौंदर्याचें दर्शन घडवलें तसें यापूर्वीं कधीं घडवल्याचें स्मरत नाहीं. कडक उन्हाळ्यांत जेव्हां बांधाखालचा प्रवाह एकदम क्षीण होऊन जातो, तेव्हां पाण्यापेक्षां खडकच डोळ्यांत अधिक भरतात. आणि वर्षा ऋतु ऐन भरांत येऊन जेव्हां 'सर्वतः संप्लुतोदके' अशी स्थिति होते तेव्हां येथें खास पहाण्यासारखें असें कांहींच उरत नाहीं.

या खेपेस हिंवाळ्यांतील धनुर्मास चालू आहे. थंडी बेताचीच आहे. आकाशांतील ढगांना तऱ्हेतऱ्हेचे नखरे करण्याचें सुचत आहे. नदीचें पात्र दोन्ही कांठापर्यंत तुडुंब भरलेलें आहे आणि सोडून देण्यासारखें इतकें कांहीं पाणी नदीजवळ फालतू पडलेलें आहे कीं, लोखंडी दरवाज्याखालून पडणारें पाणी व्यास आणि वाल्मीकींच्या प्रतिभेशीं स्पर्धा करूं पहात आहे असा आभास होत आहे. वरच्या बाजूस या कांठापासून त्या कांठापर्यंत भटजीच्या पोटाप्रमाणें फुगलेलें पाणी तऱ्हेतऱ्हेच्या होड्यांना आपल्या सपाटीवर खेळवीत आहे आणि खालीं नाना प्रकारचे बंध ( डिझाइन ) रचत रचत पाणी स्वतःच उन्मादक खेळ खेळत आहे. आनंदाचा, दुःखाचा, हर्षाचा किंवा उद्वेगाचा उमाळा जेव्हां

पोटांत मावेनासा होतो तेव्हां ज्याप्रमाणें मनुष्याच्या मुखावाटें एकसारखे उद्गार बाहेर पडतच रहातात आणि कितीहि उद्गार निघाले तरी त्याचें समाधान होत नाहीं, त्याचप्रमाणें येथल्या पाण्याला थंड बर्फासारखें उधाण येत होतें आणि फुटून गेलेल्या फेसाच्या वक्ररेखा साऱ्या पृष्ठभागाला संगमरवरी दगडा-प्रमाणें अभ्रकाची शोभा आणीत होत्या.

येथें पूर्वी या कांठापासून त्या कांठापर्यंत शेंकडों फूट उंच टेकड्यांच्या शिखरांना जोडणारा एक लोखंडाचा लांबलचक दोरखंड होता. इतका मोठा आणि इतका लांब दोरखंड इतक्या उंच ताणून बांधलेला क्वचितच पहावयास मिळतो. असें सांगतात कीं १९२५ मध्यें आकाशांत एक फार मोठी वावटळ उठली आणि वाऱ्याच्या भोंवऱ्याचा वेग सहन न झाल्यामुळें हा प्रचंड दोरखंड तुटून पडला ! आतां त्या दोरखंडाऐवजीं तारखात्यानें बांधाच्या खालच्या बाजूस तारेच्या खांबावर अनेक तारा बांधलेल्या आढळून येतात.

येथल्या साऱ्या दृश्याचें वर्णन कसें करावें ! माणसाच्या केवळ अस्थि-पंजरावरून ज्याप्रमाणें त्याच्या शरिराचें लावण्य आणि यौवन व्यक्त होऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें केवळ शाब्दिक विवरणाद्वारां येथल्या जलराशीचें आणि टेकड्यांमधून खेळणाऱ्या जलप्रवाहाचें सौंदर्य व्यक्त होऊं शकणार नाहीं. चहूंबाजूस पसरलेलें आकाश, आकाशांत जटायूच्या पिसांप्रमाणें विखुरलेले ढग आणि या सर्वांना नाना प्रकारें प्रतिबिंबित करणारे कृष्णेचे तरंग — हें सर्व डोळ्यांचा विषय आहे. तर शब्द बापडे कणशः आणि क्षणशः कल्पनेला जागृत करून कानावाटें मेंदूंत चित्र उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणारे ! या दोघांचा मेळ कसा साधायचा ?

उचंबळणाऱ्या पाण्याच्या नशांत डोळे भिजवूनच आम्ही जवळच्या टेकडीवर चढलों. एका बाजूस थोड्या पुढें आलेल्या जागेवर कब्जा करून श्रीमल्लिकार्जुन महादेव विजयवाड्याला आशीर्वाद देत आहेत आणि दुसऱ्या बाजूस टेकडीच्या खिंडींत बनलेल्या खबदाडापाशीं माता कनकदुर्गा कृष्णेच्या प्रवाहाच्या व विजयवाड्याच्या मानवसागराच्या सौंदर्यलहरी न्याहाळत आहे.

गेल्या पंचवीस वर्षांत बेझवाड्याची वस्ती कितीतरी वाढली आहे — बेहद्द वाढली आहे असेंच म्हणणार होतों — पण आंध्र जेव्हां स्वतंत्र 'राष्ट्र' होईल ( तेलगू भाषेत इतिहासाला 'चरित्र' आणि प्रांताला 'राष्ट्र' म्हणतात )

आणि बेझवाडा त्याची राजधानी होईल त्या वेळीं येथली लोकवस्ती चौपट वाढल्यास नवल नाहीं.

आसाम प्रांतांत दाखल होतांच कामाक्षीच्या टेकडीवरून ब्रह्मपुत्रेच्या विस्ताराचें व गौहाटी शहराचें जें अद्भुत दर्शन होतें त्यानें मुग्ध झालेल्या पाश्चात्त्य प्रवाश्यांनी म्हटलें आहे कीं, इतकें सुंदर दृश्य जगांत इतरत्र क्वचितच पहावयास मिळेल. मल्लिकार्जुन आणि कनकगौरीच्या मंदिरासमोरून कृष्णेचा बांध, रेल्वेचा पूल, टेकड्यांचें संमेलन, सुधाधवल हवेल्या आणि मंदिरांचे कळस पाहून मनांत आलें कीं, कामाक्षीलाच जाऊन विचारावें कीं, तुझ्या टेकडीवरून दिसणारें दृश्य भव्य आहे कीं कनकगौरी टेकडीवरून दिसणारें हें नयनमनोहर दृश्य अधिक मोहक आहे ?

पाणी, मग तें कुठेंहि असो, कितीहि कमी अथवा अधिक असो, तें जिवंत असतें आणि म्हणून आपला चमत्कार दाखविल्याशिवाय रहात नाहीं. नागमोडी वळणांनीं मार्ग काढीत धांवणारा डोंगरांतील लहानसा झरा का असेना, त्याला पहातांच चित्त प्रसन्न होतें; कल्पना शांत झऱ्याप्रमाणें वाहूं लागते आणि ज्याला मुळीच गातां येत नाहीं असा मनुष्य देखील कांहींना कांहीं गुणगुणूं लागतो. तर मग असे असंख्य झरे, प्रवाह, ओहळ, कालवे आणि नद्यांचे कांहीं प्रवाह मिळून बनलेली अफाट कृष्णा नदी जेव्हां सागराची भेट घ्यावयाला निघते, तेव्हां तिचें दर्शन सागरगंभीर बनलें तर त्यांत नवल तें कसलें ! आणि त्यांतच जर माणसानें बांध बांधल्यामुळें पाण्याला फुगवटा आला असेल तर तो देखावा पाहून नामदेवाच्या पुढील ओळी आठवायच्याच :

**सुंदरपणाचा अभिमान भारी,**
**त्यांतूनी गर्भिणी नामा म्हणे !**

गोदाकांठचें राजमहेन्द्री व कृष्णाकांठचें बेझवाडा या दोहोंच्या सौंदर्यापुढें हुगळी नदीच्या कांठीं वसलेलें कलकत्ता शहर देखील फिकेंच वाटतें; आणि गंगातीरीं वसलेली वाराणसी देखील आपल्या पौराणिक पवित्रतेमुळेंच स्वतःची प्रतिष्ठा सांभाळूं शकते. महीकांठीचें खंबात जर विमानांतून पाहिलें नसतें तर त्याचें स्मरणहि येथें झालें नसतें. जवळपास एखादी उंच टेकडी नसेल तर शहराचा विस्तार व त्याचा चेहरा चित्तावर ठसावा तरी कसा ?

उन्हाळ्यांत जेव्हां येथल्या टेकड्या तापतात तेव्हां बेझवाड्याची भट्टीच बनवून टाकतात. पण ती फक्त दोन महिन्यापुरतीच. एप्रिल महिन्यापर्यंत वारा वहात असतो आणि जूनच्या मध्यावर पावसाच्या सरी टेकड्यांना थंड करून सोडतात. पण बेझवाड्याची खरी शोभा पहावयाची असेल तर ती दिवाळीनंतरच.

नदीवर बांध बांधल्यामुळें इतकी कांहीं शक्ति निर्माण करणें शक्य आहे कीं अगदीं स्वस्त वीज उत्पन्न करून बेझवाड्याचें वीजवाडा बनवणें अगदीं सोपें आहे; आणि म्हैसूरजवळील चामुंडा टेकडीप्रमाणें जर येथल्या टेकड्यांवर विजेचे दिवे पेटवले गेले तर सप्तरंगी इंद्रधनुष्याची शोभा निर्माण करून येथेंच गंधर्वनगरी अथवा ऐन्द्रजालिक अमरापुरी निर्माण करणेंहि शक्य आहे. आणि तसें झालें तर या बांधावरील सरोवराला 'अच्छोद' नांव ठेवण्यास कुणी हरकत घेणार नाही.

खरोखरच, बेझवाडा भारतांतील एक आगळें सौंदर्यस्थळ आहे.

# दोन मद्रासी बहिणी

६

या दोन बहिणींबद्दल माझ्या मनांत अपार सहानुभूति आहे. मद्रास शहरानें जसें यांचें महत्त्व वाढवलें आहे, तशीच त्यांची उपेक्षाहि केली आहे.

तसें पाहिलें तर मद्रास शहराचें महत्त्व देखील कृत्रिमच आहे. त्याच्या-पाशीं नाहीं एखादा सुंदर पर्वत कीं नाहीं महानदीची खाडी. व्यापाराच्या दृष्टीनें किंवा लष्करी दृष्टीनें देखील मद्रासचें तसें कांहीं खास महत्त्व नाहीं. परंतु इतिहास-क्रमामुळें इंग्रजांना हेंच स्थान पसंत करावें लागलें. येथल्या स्थानिक लोकांचें या शहरावर कमी प्रेम होतें असें कुणीच म्हणूं शकणार नाहीं. या शहराच्या भाग्याची आधींपासून कल्पना असल्यामुळेंच का येथल्या भारती-यांनीं किंवा धीवर आदिवासींनीं या शहराचें नामकरण 'चन्नपट्टनम्' म्हणजे सुवर्णनगरी केलें असेल ?

कसेंहि असो, जेव्हांपासून इंग्रजांनीं येथें आपली कोठी स्थापन केली तेव्हां-पासून या शहराचें भाग्य व वैभव वाढतच गेलें आहे आणि अशा शहराची सेवा करणाऱ्या या दोन बहिणींचें भाग्य देखील बदलत गेलें आहे. एकीचें नांव आहे 'कूवम्' आणि दुसरीचें नांव आहे 'अड्यार'. या दोन्ही नद्या पूर्वगामी होऊन बंगालच्या उपसागराला म्हणजे पूर्व समुद्राला जाऊन मिळतात.

खुद्द मद्रास शहराची व त्याच्या आजूबाजूची जमीन एकदम सपाट आहे. येथें लहानमोठे अनेक तलाव व सरोवरें आहेत. परंतु आतां त्यांची शोभा नामशेष झालेली आहे.

तर्क-बुद्धि म्हणते कीं जमीन जर समतल असेल व पथराळ नसेल तर नदीला आपलें पात्र सरळ खोदीत जाण्यांत कसलीच अडचण वाटतां कामा नये. परंतु नद्यांची रीत वेगळीच असते. कांहीं मर्यादेपर्यंत नदी एकीकडे झुकेल,

मग तेथून कंटाळून वळण घेईल व दुसरीकडे पोहोंचेल. मग पुढें जातांना पुन्हां दिशा बदलेल आणि अशा प्रकारें नागमोडी गतीनें पुढें जाईल.

बिचाऱ्या पहाडी नद्यांचा नाइलाज असतो. पर्वत व टेकड्या यांच्यामधून जेथून वाट सांपडेल तेथून जाणें त्यांना भाग असतें. तीस्ता म्हणेल, "मी स्वभावतः नागीण नाहीं. वक्रगति माझा स्वभाव नाहीं, माझें भाग्यच तसें आहे." काश्मीरमध्यें वहाणारी वितस्ता किंवा झेलम आपला असा बचाव करूं शकणार नाहीं. जवळ जवळ चक्राकार वळसे घेत जाणें व तसें करतांना पुढें जाण्याविषयीं यत्किंचितहि उत्साह न बाळगणें, हा आहे काश्मीर-तल-वाहिनी वितस्तेचा स्वभाव. बिहारमध्यें वहाणाऱ्या असंख्य नद्यांविषयीं देखील असेंच म्हणतां येईल. एकदां मला बिहारमध्यें अनेक ठिकाणीं विमानानें प्रवास करावा लागला होता. कोण जाणे कितीदां बिहारच्या आकाशाला मीं अनेक दिशांनीं विंधलें असेल. विमानाच्या दूरदूरच्या दीर्घ प्रवासांत देखील बऱ्याच उंचावरून मीं बंगाल व बिहारच्या नद्या पाहिल्या आहेत आणि त्यांचें वक्र-मार्ग-नैपुण्य पाहून त्यांचा आदर केला आहे.

भारतभूमीचें एक मोठें मानचित्र बनवून त्यावर जर केवळ नद्यांचे मार्ग दाखविणाऱ्या रेघा काढल्या तर तो वक्र-रेखांचा महोत्सव मोठा चित्तवेधक होईल. नदीला उजवीकडे व डावीकडे वळण घेतल्यावांचून संतोषच होत नाहीं. एकीकडील उंच किनारा घासत जाणें व दुसरीकडील सखल किनारा दरवर्षी बुडवून तेथें कांहीं काळ जलप्रलयाचा देखावा निर्माण करणें ही नद्यांची वार्षिक क्रीडा असते.

परंतु जेव्हां नद्या मोठमोठ्या शहरांच्या वस्तींत अडकून पडतात किंवा दयाळू बनून आपल्या दोन्ही कांठावर माणसाला बसूं देतात, तेव्हां त्यांचा हा स्वच्छंद विहार कायमचा बंद होतो आणि तेव्हांपासून त्यांचें जीवन टांगा ओढणाऱ्या घोड्यासारखें बनतें. अशा स्थितींतहि नद्यांनीं आपलें वळण कायम ठेवलें तरी त्यांची शोभा नष्ट झाल्यावांचून रहात नाहीं.

लंडनमधील टेम्स नदी, पॅरिसमधील सीन नदी आणि लिस्बनमधील टेगस नदी या तिघींची बंधन-दुर्दशा पाहून माझ्या हृदयानें कितीदां तरी आक्रोश केला आहे. आणि जेव्हां मानिनी व स्वच्छंद-विहारिणी नील नदी लाचार

होऊन निमुटपणें अल्काहेरा ( कायरो ) शहराच्या मधून जाते, तेव्हां तर दुःखा-बरोबरच क्रोधहि जागृत होतो. आणि नदीचा अपमान करणाऱ्या मानवजातीला कशी काय अद्दल घडवावी असे विचारहि मनांत येऊं लागतात.

अड्यार व कूवम् या दोघींपैकीं कूवमूला बंधनाचें दुःख अधिक सोसावें लागलें आहे; कारण ती शहरामधून वाट काढीत असते. अड्यार नदी शहराच्या दक्षिण किनाऱ्यावर असल्यामुळें तिला थोडासा अवकाश मिळाला आहे.

परंतु—येथेंहि परंतु आडवें आलें—जेथें मनुष्यानें अपमान केला नाहीं, तेथें या सरितेचा सरित्पतीनें अपमान केला आहे. बिचारी मोठ्या उत्साहानें समुद्राला भेटायला जाते आणि बेपर्वा समुद्र उंच उंच लाटांबरोबर वाळू आणून आणून तिच्या समोर एक फार मोठा बांध किंवा सेतु उभा करतो!

देवी वासंतीचा ब्रह्मविद्या आश्रम जेव्हां मी सर्वप्रथम पहायला गेलों होतों, त्या वेळीं सागर-सरिता-संगमाची भव्यता पहाण्यासाठीं म्हणून नदीच्या मुखापर्यंत पोहोंचलों होतों. आणि पहातों तर काय – खंडिता अड्यार आपलें पाणी आण-आणून मार्गप्रतीक्षा करीत आहे आणि समुद्र आपण उभारलेल्या बांधाच्या पलीकडे लाटांचें विकट हास्य हंसत आहे. समुद्राचा तर मनांत राग आलाच. काय याच्यांत थोडें देखील दाक्षिण्य नाहीं ? थोडीशी तरी वाट देता! परंतु सरिता व सरित्पति यांच्यामध्यें पसरलेल्या सेतूवरून चालतां चालतां मनांत हाच विचार आला कीं, अड्यारच्या अपमानांत मी देखील सामील आहें. सेतूवरून पलीकडे गेल्यानंतर परतावें तर लागलेंच. त्यानंतर आजपर्यंत अनेकदां मद्रासला गेलों, भगवती अड्यारचें दर्शन सुद्धां अनेकवार घेतलें, परंतु पुन्हां त्या बांधावरून जाण्याची इच्छाच झाली नाहीं.

कूवमूच्या पाण्याहून अड्यारचें पाणी अधिक स्वच्छ वाटतें. तेथली हवा स्वच्छ असल्यामुळें पाणी चमकदारहि वाटतें. या नदीच्या मध्यें उत्तरेकडे एका लक्ष्मीपुत्राचा शुभ्र प्रासाद आहे. तो नदीची शोभा बिघडवीत नाहीं. उलट नदीमुळें तो अधिक उठावदार दिसतो.

जेव्हां जेव्हां मी अड्यार नदीवर गेलों, तेव्हां तेव्हां तिच्या कांठावरील शहाळ्यांचें गोड पाणी मी प्यालों आहें, आणि त्यालाच या लोकमातेचा प्रसाद मानलें आहे. अड्यारबरोबर कूवमूचें देखील दर्शन होतेंच. सेंट जॉर्ज फोर्टमुळें

तिची शोभा देखील कांहीं साधारण कोटीची नाहीं. पण तरी देखील आजवर नेहमीं तिच्याबद्दल कींवच वाटत आली आहे.

इंग्रजांनीं अड्यारपासून कूवमूपर्यंत एक छोटासा कालवा खेळवला आहे, ज्याला त्यांनीं 'बकिंगहॅम कॅनॉल' नांव दिलें आहे. या कालव्यामुळें काय फायदा झाला आहे मला ठाऊक नाहीं, पण त्यांचें नांव मात्र जितक्यांदा ऐकलें तितक्यांदां मला खटकलें आहे.

या नव्या मद्रास शहरामध्यें नसत्या तर कदाचित् मी त्यांना श्रद्धांजलि देऊं शकलों नसतों. परंतु त्यांचें माहात्म्य व सौंदर्य वाढविण्याचें काम मद्रास शहराच्या हातून झालेलें नाहीं. मद्रासनें त्यांची सेवा घेतली, पण त्यांची सेवा केली नाहीं, हा मद्रासविषयींचा विषाद मनांत उरतोच.

# दक्षिणेच्या टोंकास

७

धनुष्यकोटीला मी पहिल्या प्रथम वीस वर्षांपूर्वी आलों होतों. माझ्या आठवणी-प्रमाणें श्री. राजाजींनीं माझ्याबरोबर श्री. वरदाचारींना पाठविलें होतें. वरदाचारी रामायणाचे मोठे भक्त. प्रवासांत रामायणाच्याच रसिक गोष्टी चालल्या होत्या. आम्ही धनुष्यकोटीला पोहोंचलों आणि वरदाचारींचा सनातनी आत्मा श्राद्ध करण्यासाठीं व्याकुळ झाला. एक योग्य ब्राह्मण शोधून काढून ते श्राद्धविधींत गढून गेले आणि बाकीचे आम्ही समोर गर्जना करणाऱ्या रत्नाकराची व महोदधीची भव्य शोभा पहाण्यासाठीं मोकळे झालों.

दोन नद्यांचा संगम अथवा प्रयाग अनेक ठिकाणी पहावयास मिळतो. संगमाचें काव्य आर्यांच्या मेंदूपर्यंत किंवा हृदयापर्यंत पोहोंचलें कीं त्यांना तेथें यज्ञ-याग करण्याचें सुचायचेंच. यज्ञ-यागासाठींच्या अशा प्रकृष्ट अथवा प्रशस्त स्थानालाच प्र-याग म्हणतात.

दोन नद्या मिळतात तेव्हां बहुधा इंग्रजी Y सारखी आकृति होत असते. महाराष्ट्रांत कऱ्हाडपाशीं दोन नद्या समोरासमोर येऊन मिळतात आणि मग काटकोनांत एका बाजूनें वहातात. इंग्रजी T सारखी पांच कांठांची ती आकृति बनते. दोन नद्या समोरासमोर येऊन एकमेकीला मिठी मारतात म्हणून त्याला प्रीतिसंगम म्हणतात.

गंगेला जेथें यमुना येऊन मिळते तेथें देखील जवळ जवळ T सारखाच आकार होतो. मात्र तेथें गंगा सरळ जाते आणि यमुना कसल्याहि आग्रहा-वांचून आणि थोड्याशा संभ्रमानें गंगेला मिळते.

यमुना प्रथम प्रथम ' आत्मनि अप्रत्यय ' दिसते. पण एकदां का ती गंगेला मिळाली कीं, दोघींच्या उल्लासाला उन्मादाचें भरतें येतें आणि जर एक-मेकींत चटकन् मिसळून गेलों तर भेटण्याचा आनंद तेथेंच विराम पावेल या भयानें दूरदूरपर्यंत त्या दोघी थोड्या अधिक प्रमाणांत एकमेकींत मिसळतच

रहातात. धर्मकवींनीं या स्थानाला प्रयाग-राज हें गौरवास्पद नांव उगीच नाहीं दिलें.

पण जेव्हां एखादी नदी समुद्राला येऊन मिळते तेव्हां तो सागर-सरिता-संगमाचा उन्माद शिव-पार्वती-मीलनाइतकाच अद्भुतरम्य असतो. त्याचें वर्णन भक्तवृत्तीनें अथवा अपत्यसदृश भाषेंत होऊंच शकणार नाहीं. माणसाला आपण माणूस आहोंत हें विसरून जाऊन आपल्या शक्तीपेक्षांहि उंच उड्डाण करून सागर-सरितेच्या या अ-समान संगमाचें वर्णन करावें लागेल.

पण धनुष्कोटीमध्यें तर हरिहरांच्या मीलनाप्रमाणें दोन समुद्रांचा सागर-संगम आहे. रत्नाकर मानार ( Manar ) च्या बाजूनें येतो. महोदधि पाल्क ( Palk ) च्या सामुद्रधुनीचा प्रतिनिधि आहे. या दोघांना एकदम कसें काय भेटूं द्यायचें ? पृथ्वीनें जणुं काय रामधनुष्याची कमानदार 'कोटी' आडवी ठेवून त्या दोघांना एक कोसपर्यंत भेटूं दिलेलें नाहीं. या बाजूला रत्नाकर उसळत असतो व त्या बाजूस महोदधि गर्जना करीत असतो; आणि वारा सुचवील त्या-प्रमाणें दोघे आपापले प्रवाह दौडवीत असतात.

आणि काय त्या दोघांचा खाजगी संकेत ! महोदधीनें हिरवा रंग धारण केला तर रत्नाकर अगदीं निळाभोर बनतो. आणि जेव्हां रत्नाकरावर हिरवट रंग चढतो तेव्हां महोदधि आकाशाला सुद्धां दीक्षा देऊं शकेल अशा गडद निळ्या रंगाची रेलचेल करून टाकतो.

भेटण्याची इच्छा असूनहि भेटतां येत नाहीं असें जोंपर्यंत वाटतें, तोंपर्यंत दोघेजण बेफाम होतात. क्षणोक्षणीं नव्या नव्या तऱ्हेनें आपला अमर्ष व्यक्त कर-तात. पण एकदां का भेटण्याची मोकळीक मिळाली कीं जणुं काय कसलीच उत्सुकता नव्हती, भेटायचे होतें तें भेटून घेतलें, झालें, अशी शांति आणि सहजता भेटतांना त्यांच्या चेहऱ्यावर आढळून येते. सगळी अस्वस्थता जणुं काय दूर मागें ठेवली असावी त्याप्रमाणें. पाण्याच्या तळापासून पुढें सरलेल्या वाळूच्या बांधामुळें उसळणाऱ्या लाटांच्या दोन रांगा दूरवर दिसतात. एक रांग महोदधीच्या बाजूस पसरलेली आहे आणि दुसरी रत्नाकरामध्यें. परंतु जेथें मधल्या भागांत त्या दोघांचें प्रत्यक्ष मीलन होतें, तेथें तर सरोवराइतकी शांतिच पसरलेली असते. आणि त्यांत नवल तें काय ? अद्वैतांत आनंदाची पराकाष्ठा असूं शकते, पण तेथें उन्मादाला कोठून स्थान असणार ?

धनुष्कोटीच्या टोंकाला उभें राहून एकदां एक गिरकी घेऊन सर्व दिशांनीं पाहिलें पाहिजे. जेथून आपण चालून आलों ती जमिनीची जीभ सोडली तर सर्वत्र महासागराच्या विशाल पाण्याचें क्षितिजाशीं बनणारें वलयच पहावयास सांपडतें.

रंगून किंवा कराचीला जातांना भरसमुद्रांत चहूंकडे समुद्रवलय व क्षितिजवलय एकाकार झालेलें दिसतें, त्याचा कैफ कांहीं कमी नसतो. पाण्याच्या या क्षितिज-विस्तारावर आकाशाचें तितकेंच मोठं पण अनंतपटींनीं उंच, खोल असें झांकण ठेवलेलें आहे आणि या डबेश्वरांत एका लहान जहाजांत बसलेले 'कोटश्च कीटायते' – असे आपण मोत्यांप्रमाणें सांठवले गेलों आहोंत अशी कल्पना मनांत उठल्यावांचून रहात नाही. पण जसजसा अधिक विचार करावा तसतशी आपली क्षुद्रता मनावर अधिकाधिक ठसूं लागते.

धनुष्कोटीमध्यें असें होत नाहीं. पृथ्वीशीं आपण निगडित आहोंत, आपल्या पायतळीं मजबूत जमीन आहे आणि ती जमीन हळूहळू विस्तार पावत एका विशाल देशाकडे व खंडाकडे आपल्याला घेऊन जाऊं शकते असा विचार आपल्याला सांत्वना देतो, इतकेंच नव्हे तर प्रचंड आत्मविश्वासाचे अधिकारी बनवतो. जितक्यांदां म्हणून मी धनुष्कोटीला पोहोंचलों आहें तितक्यांदां मला माणूस म्हणून स्वतःविषयीं वाटणाऱ्या आत्मगौरवाचें भान विशेषत्वानें झालें आहे. आणि त्यामुळें तेथें मला माझ्या 'भूमिके'वर दृढ राहून सागराची उपासना करणें शक्य झालें आहे.

जेव्हां जेव्हां मंडपम् सोडून पुलावरून पामबनला पोहोंचलों, तेव्हां तेव्हां 'रघुवंशा'मधलें कालिदासाचें या प्रदेशाचें वर्णन आठवल्यावांचून राहिलें नाही. कालिदासाची वर्णनशक्ति जरी माझ्यापाशीं नसली, तरी मी त्याचा समानधर्मा आहें याविषयीं मनांत मुळीच शंका उरत नाहीं. मी कुठें 'कवियशःप्रार्थी' आहें कीं, कालिदासाशीं आपलें नांव जोडण्यांत मला संकोच वाटावा ? मला हंसणाऱ्या टीकाकारांना मी त्यांचेंच एक वचन ऐकवीन –

पर्वते परमाणौ च पदार्थत्वं प्रतिष्ठितम् ।

पण जेव्हां मी धनुष्कोटीपाशीं येतों तेव्हां कालिदासाला विसरून जातों आणि लंकेला कसें जातां येईल याच्या खटपटींत गुंतलेल्या हनुमानाच्या

नजरेनें दक्षिणेकडे पाहूं लागतों. ज्या ज्या वानर-यूथ-मुख्यांनीं सेतूची कल्पना काढली आणि अमलांत आणली त्यांच्या नजरेनें तलाईमानारच्या दिशेनें पाहूं लागतों. आणि अशा रीतीनें कल्पना-विहार करून थकल्यावर चार धामांची यात्रा पुरी करून रामेश्वराला येऊन पोहोंचलेल्या वृद्ध यात्रेकरूंचें हृदय धारण करून कल्पना करूं लागतों कीं, 'एक संपूर्ण आयुष्य जवळ जवळ पुरें करून भारतवर्षाइतक्याच विशाल जीवनप्रदेशाचें पर्यटन करून आलों. आतां येथून परतून काय करायचें आहे ? इहलोकींचें काम कसेंबसें पुरें झालें. त्यांत सफलता लाभली असो किंवा विफलता, पण पुन्हां तें अन् तेंच जीवन गिरवायचें नाहीं. आतां त्या सगळ्या जीवनाकडे पाठ फिरवलेलीच बरी. मागें वळून, सिंहावलोकन करून, त्यांच्याकडे पहाण्याचा स्मरण-रस देखील उरला नाहीं. आतां तर सांपरायाचा, पारलौकिक जीवनाचा पारमार्थिक दृष्टीनें विचार करणेंच श्रेयस्कर आहे.' अशी विचार-परंपरा मनांत उद्भवली. एका रीतीनें मन अस्वस्थ झालें होतें आणि दुसऱ्या रीतीनें परम शांति अनुभवीत होतें.

या खेपेस ज्या वेळीं धनुष्कोटीला आलों त्या वेळीं परंपरेला अनुसरून महोदधींत स्नान केलें. महासागराचें क्षमापन सुद्धां केलें. पण मनांत विचार उठला तो एकच कीं, आतां कांहीं पुन्हां या ठिकाणीं यावयाचें नाहीं. सिलोनला एकदां जावयाचें आहे, पण धनुष्कोटीचें आतां जें दर्शन घेतलें तें अखेरचेंच. असें कां वाटलें तें सांगणें कठीण आहे. पण मन अगदीं तृप्त झाल्याची भावना याच वेळीं मनांत आली खरी.

रामेश्वर-धनुष्कोटीनंतर येते कन्याकुमारी. एक स्थान भव्य तर दुसरें भव्यतर. येथें दोन नव्हे तर तीन सागरांचा संगम आहे. या संगमाचें वातावरण अभेदभक्तीच्या आनंदासारखें आहे. हा येथें हिंदी महासागर संपला, येथें मुंबईचा म्हणजेच पश्चिम समुद्र आणि येथें पूर्व समुद्र सुरू झाला असें सांगतांहि येत नाहीं व मानतांहि येत नाहीं. येथें भारतवर्षाचें दक्षिणेकडील टोंक आहे आणि तिन्ही सागरांनीं त्याला तिन्ही बाजूंनीं वेढलें आहे. संगम आपलें आपण म्हणायचें एवढेंच. सागराच्या गांवीं संगम नांवाची वस्तुच नाहीं. संगमाची कल्पना आपली आहे. सागरांना विचारलें तर ते म्हणतील कीं, जो भेद मुळांत अस्तित्वांतच नाहीं तो नाहींसा झाला असें म्हणावें तरी कसें ? 'संगमा'ची कल्पना अगदींच चुकीची आहे. त्याला नांवच द्यायचें असेल तर 'संभवन'

म्हणा. जेथें एकताच नांदत आहे तेथें वाटेल त्या भागाला तुम्ही वाटेल तें नांव देऊं शकतां. नाम आणि रूप यांचें द्वैत येथें फिकें पडतें, विरघळून जातें आणि मग केवळ अद्वैतच आपल्या अखंड मस्तींत गर्जना करूं लागतें.

कन्याकुमारीमध्यें जी भव्यता माझ्या अनुभवास आली, तशी भव्यता एक हिमालय सोडून व गांधीजींचें जीवन सोडून अन्यत्र कोठेंहि अनुभवास आली नाहीं.

कन्याकुमारीचें महत्त्व मीं सर्वांत प्रथम ऐकलें होतें गांधीजींच्या तोंडूनच. एखाद्या दृश्याचें वर्णन करीत बसणें त्यांचा स्वभाव नव्हे; पण कन्याकुमारीहून आश्रमांत परत आल्यानंतर त्यांनीं त्या स्थानाचें मोठ्या उत्साहानें माझ्यापुढें वर्णन केलें होतें.

जेव्हां – २७ सालीं, त्यांच्याबरोबर मीं दक्षिण हिंदुस्थानचा प्रवास केला, तेव्हां नागर-कोविल गांवीं येतांच त्यांनीं आपल्या यजमानाला खास शिफारस केली कीं, 'काकाला कन्याकुमारीला जायचें आहे. मोटरची व्यवस्था करा.' त्या दिवशीं त्यांनीं दोनदां चौकशी केली कीं, कन्याकुमारीला जाण्याची व्यवस्था नीट झाली आहे कीं नाहीं ?

पू. बांना उत्साहित करणें मला मुळींच जड गेलें नाहीं. दुसरेहि दोघे-जण बरोबर निघाले.

ज्या दृश्याची प्रशंसा पू. बापूजींच्या तोंडून ऐकली होती तें दृश्य पहाण्याची माझी उत्कंठा अगदीं शिगेला पोहोंचली होती. येथें आल्यानंतर तर तिचा कैफच चढला. त्यानंतर जितक्यांदां हणून आलों तितक्यांदां पुनः पुन्हां तो न् तोच कैफ मीं अनुभवला आहे.

आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, या कैफाबरोबरच ब्रह्मचर्याविषयींचे देखील गहन विचार मनांत उत्पन्न झाल्यावांचून रहात नाहींत. देवी कन्या-कुमारीचें हें स्थान आहे या जाणिवेनें असे विचार मनांत उत्पन्न होतात असें मला वाटत नाहीं; आतांपर्यंत कधीं वाटलें नाहीं. स्वामी विवेकानंदांनीं या स्थानीं येऊन असाच कैफ अनुभवला होता, या माहितीमुळें देखील कधींकाळीं मनांत येथें येतांक्षणींच ब्रह्मचर्याचे विचार उद्भवले नाहींत. गांधीजींच्या भव्यतेच्या भव्य साधनेशीं पण तो विचार संलग्न आहे असें नाहीं. स्वयंभूपणें तो विचार मनांत उत्पन्न होत असतो.

या वेळीं ( ५–१–१९४७ ) तिसऱ्यांदां मी येथें आलों आहें. आल्या-बरोबर सर्वांत आधीं समुद्राच्या लाटा, आकाशांतले ढग, पूर्व-पश्चिमेचें क्षितिज आणि पाठीमागचे डोंगर – या सगळ्या मित्रांना पाहून घेतलें.

आज पौष शुक्ल त्रयोदशी आहे. आज चंद्र रोहिणींत किंवा मृग नक्षत्रांत असला पाहिजे. आम्ही मोटारीच्या वेगानें मजल दरमजल करीत कन्याकुमारी-कडे धांवत होतों तेव्हांच चंद्र आकाशांत उंच चढून सूर्य मावळला की लगेच, वेळ न घालवतां, आकाशाचा ताबा घ्यावा म्हणून टपून बसला होता. संध्येला आपला वर्णविलास पसरविण्याला त्यानें विशेष अवकाश दिला नाहीं. तरी सुद्धां जितका वेळ मिळाला तितक्यांत रंगाचीं अनेक दृश्यें संध्येनें दाखविलींच.

सूर्यास्त पहाण्याची तीव्र इच्छा होती. पश्चिमेकडील ढगांनीं कांहींसें ठपका देत आम्हांला म्हटलें, ‘ कुणाचा अस्त पहाण्यासाठीं का कधीं कोणी असे व्याकुळ होतात ? खरें पाहिलें तर सूर्याचा अस्तच होत नाहीं. तुम्हां लोकांपुरता प्रकाशाचा अस्त असतो. त्याच्यासाठीं सूर्याला पहाण्यापेक्षां उदय असो की अस्त, दोन्ही प्रसंगीं तो जी एकरूपता धारण करतो तिचा रंगच कां पाहून घेत नाहीं ? ’

**उदये सविता रक्तो रक्तश्चास्तमने तथा ।**
**संपत्तौ च विपत्तौ च महतां एक-रूपता ॥**

हा श्लोक ढगांनीं देखील लहानपणीं पाठ करून ठेवला असावा !

सूर्य जेव्हां क्षितिजाच्या तळाला पोहोंचला तेव्हां ढगांच्या झरोक्यांतून सूर्यप्रकाशाचे लाल किरण वरपर्यंत पसरले. आणि वर पसरले त्याहिपेक्षां दक्षिणेस व उत्तरेस अधिक पसरले. झरोके अधिक नव्हते, पण जे होते ते मोठे होते. त्यामुळें किरणांचे मयूख जणुं काय लाल रंगाचे पट्टे ओढले असावेत त्याप्रमाणें भासत होते. आणि आकाश तर स्वतःच्या वैभवानें वजनदार, प्रतिष्ठित आणि गर्भश्रीमंत दिसत होतें. ही शोभा अपेक्षेपेक्षां अधिक वेळ टिकली, त्यामुळें सारखें तिलाच पहात बसण्याची अभिलाषा कांहींशी तृप्त झाली.

जेथें कुमारीच्या न झालेल्या लग्नाच्या अक्षता विखुरलेल्या आहेत, त्या बाजूच्या खडकावर लाटांचें तांडव पहाण्यासाठी म्हणून आम्ही जाऊन बसलों. पहातां पहातां संध्या पश्चिमेंत विलीन झाली आणि चंद्राचें राज्य सुरू झालें. आकाशाला घेरून टाकण्याचा ढगांचा मनसुबा पुरा झाला नव्हता, तितक्यांत

दक्षिणेकडील ढगांतून एक मोठा तारा चमकूं लागला. तो दुसरा कोण असणार ? ते तर अगस्ति महाराज स्वतः दक्षिण-पूर्व दिशेवर आरूढ होत होते. सुदैवानें यमुना आणि याममत्स्य देखील तिरप्या रेषेंत आकाशांत दिसले. त्यामुळें दक्षिण दिशेचें ध्यान करण्याचें फळ मिळालें. तृप्त झालेल्या डोळ्यांनीं आम्हीं उत्तरेकडे नजर वळवली. तेथें आकाशांत देवयानी ( कॅसियोपिया )चा M चांगला वर चढला होता. त्याच्या खालीं जवळ जवळ क्षितिजापाशीं एका ताडाच्या झाडाएवढ्या उंचीवर त्या ताडाच्या पानांचेंच आसन करून ध्रुव-कुमारानें आम्हांला आपलें सुभग दर्शन दिलें. देवयानी व ध्रुव यांना पहातां पहातां नजर पश्चिमेकडे वळली. तेथें हंस म्हणाला कीं, श्रवण तर केव्हांच अस्ताला गेला आहे. म्हणून पूर्वेकडे नजर वळवली. तेथें ब्रह्महृदयानें सांगितलें कीं, ब्रह्ममंडळाचा विस्तार एवढ्यांतच कुठें तरी असला पाहिजे.

आम्ही दक्षिणेकडे तोंड फिरविलें. अगस्ति इतका कांहीं वर आला नव्हता कीं त्याच्या झोंपडीची नीट कल्पना करतां यावी. पण व्याध तर दिसायलाच हवा. परंतु व्याध कितीहि तेजस्वी असला तरी ढगांचा जाड थर कसा विंधूं शकणार ! आम्हीं आमच्या नजरेनें ढगांचा थर विंधण्याचा प्रयत्न केला, तेव्हां शंका आली कीं, ढगांमध्यें अमुक भाग उजळ दिसत आहे. त्याच्या मागेंच व्याध असला पाहिजे. ढगांच्या पलीकडे व्याधाचा प्रकाश आणि अलीकडे आमच्या नजरेची धडक — या दुहेरी हल्ल्यानें ढग विरळ झाले आणि झिरझिरीत पडद्यामागें नाटकांतलीं पात्रें अस्पष्ट दिसावीत तसा व्याध दिसूं लागला. पहातां पहातां व्याध पूर्णपणें स्पष्ट दिसूं लागला आणि मग व्याध, अगस्ति, यमुना आणि याममस्त्य हे सर्व तेलगु अक्षरांच्या शिरोरेखे-प्रमाणें शोभूं लागले.

आतां मृग दिसेल, रोहिणी झळकेल, प्रश्वन डोकावूं लागेल, अशा आशेनें आम्ही आकाशाकडे डोळे लावून बसलों होतों. इतक्यांत रजनीनाथानें स्वतःभोंवतीं वलय पसरलें आणि त्या सुवर्ण-वलयाबरोबरच आकाशांत ढगांनीं गर्दी केली. आकाशांत चांदणें पसरलेलें असलें म्हणून काय झालें ? रात्रीचे ढग फारसे आकर्षक वाटत नाहीत. त्यामुळें काळ्याभोर समुद्राच्या गंभीर जळावर नाचणाऱ्या फेसाच्या चमकत्या रेखांच्या रांगा पाहूनच आम्हीं डोळ्यांना मेजवानी दिली.

समुद्राच्या पाण्यावरील आणि आकाशांतल्या ढगांवरील विविध रंगांचें नृत्य पोटभर पाहून घेतल्यानंतर ही गंभीरता इतकी तृप्तिदायक वाटत होती कीं, या तृप्तीबरोबर स्थितप्रज्ञाचा आदर्श गाण्यांत व संध्येची उपासना करण्यांत कांहीं अपूर्व आनंद प्रत्ययास आला. हा सागर पूर्ण आहे. त्याच्यावर पसरलेलें हें आकाश पूर्ण आहे. या दोघांच्या दर्शनानें जीवनाच्या सायंकाळीं हृदयांत उद्भवलेला आमचा उपशम-प्रधान आनंद सुद्धां पूर्ण आहे. आतां या त्रिविध पूर्णतेमधून कांहींहि काढून घेतलें किंवा भरीस टाकलें तरी पूर्णत्वांत कसलाहि उणेपणा येणार नाहीं. मिळवलेली पूर्णता संपुष्टांत येऊं शकते, कारण ती खरी पूर्णताच नव्हे. आत्मज्ञानांतून विकसित झालेली पूर्णता स्थायी असते, कारण तो वारसा सोबत घेऊनच आपण जन्मलों होतों. तेथवर पोहोंचायला विलंब लागला हाच उणेपणा. जें विकसित झालें तें आत्मसात् झालें. आतां तेथून चढणें कसलें नि उतरणें कसलें !

जें विराट आहे, भूमा आहे, बृहत्तम ब्रह्म आहे त्याच्याशीं एकरूप झाल्यानंतर स्वाभाविकपणें जें जीवन मनुष्य जगतो तेंच खरें ब्रह्मचर्य होय. वासना दाबून टाकली तर कधीं तरी ती पुन्हां वर उसळणार. वासना मारून टाकली तर ती भुताप्रमाणें मानगुटीवर बसणार. वासनेला तृप्त करण्याचे बेत केले तर व्यसनाप्रमाणें ती अखंड आपला पिच्छा पुरविणार आणि वाढत जाणार. वासनेला डोक्यावर चढूं दिलें तर मस्तकांत तिचें चक्रच भ्रमत रहाणार. वासनेला तर तोंड देऊन सवाल केला पाहिजे कीं, तूं कोण आहेस ? मित्राचें रूप घेऊन शत्रुता करायला आली आहेस कीं जीवनाला समृद्ध करण्याची साधना म्हणून आली आहेस ? वासनेचें स्वरूप जोंवर स्पष्ट आणि उघडें होत नाहीं तोंवरच ती मोहक वाटते. मोह अस्पष्टतेमुळें, एकांगी दर्शनामुळें निर्माण होतो. वासनेला वश होण्यांत मुख्य हात आंधळेपणाचाच असतो. वासनेचा आंधळा विरोध देखील तिला बळकटीच आणीत असतो. दोन डोळ्यांनीं पाहून वासनेला ओळखतां येत नाहीं. तिला, महादेवाप्रमाणें, तीन डोळ्यांनीं पाहिलें पाहिजे, मग मात्र तिची शत्रुता आपोआप वितळून जाते.

केवळ तपश्चर्येनें वासनेशीं सामना देतां येत नाहीं, उलट प्रज्ञा स्थिर झाल्यानंतर वासनेचा विरोधच करावा लागत नाहीं.

जीवनांत जोंवर अपूर्णतेची जाणीव आहे तोंवर ब्रह्मचर्य सिद्ध झालें असें म्हणतां येणार नाहीं. अपूर्णता स्वतः तशी बाधक नाहीं. लहान मुलांत अपूर्णता काय कमी असते ? तें निर्मळ भावनेनें जगत जातें आणि त्याची अपूर्णता स्वाभाविक क्रमानें नष्ट होत जाते. अपूर्णतेची जाणीव उत्पन्न झाली कीं लगेच मनुष्य पामर बनतो. सागराप्रमाणें पूर्ण झाल्यानंतर लाटा वाटेल तितक्या उस-ळोत, पाण्याचा जथा हवा तसा जावो, पण सागराला वहावें लागत नाहीं. तो 'आत्मनि तृप्तः' आहे. त्यामुळेंच त्याला स्वतःची मर्यादा ओलांडावी लागत नाहीं. त्याला मर्यादेचें भानच नसल्यामुळें त्याच्याकडून ती अनायासें, अभावित-पणें पाळली जाते. हेंच खरें ब्रह्मचर्य.

प्रार्थना पुरी केली आणि गेल्या चार दिवसांचीं संस्मरणें टिपून ठेवण्याची ऊर्मि मनांत जागी झाली. थोडी नोंद केल्यानंतरच झोंप आली.

दुसऱ्या दिवशीं ब्राह्म मुहूर्तावर भुताप्रमाणें समुद्रकिनाऱ्यावर जाऊन बसलों असतों, पण पावसानें जरा अडविलें. प्रार्थनेच्या वेळीं समुद्रकिनाऱ्यावर जातां जातां पुन्हां आकाशाकडे पाहिलें. दक्षिण दिशा इतकी कांहीं स्वच्छ, सुंदर आणि पारदर्शक होती कीं पूर्वेकडे गोळा झालेल्या ढगांची अगदीं चीड आली. त्यांनीं जर दक्षिणेचें अनुकरण केलें असतें तर काय बिघडलें असतें ?

दक्षिणेस त्रिशंकु नीट उभा होता. जय-विजय त्याच्या द्वारपाळाचें काम करीत होते. कॅरीना अथवा खोटा क्रूस एका बाजूला जाऊन पडला होता. या दोहोंमध्यें कित्येक असे कांहीं सुंदर तारे चमकत होते की, जे वर्धा-मुंबईच्या लोकांना सबंध जन्मांत पहायला सांपडणार नाहींत.

उत्तरेकडे सप्तर्षि अगदीं नम्रपणें पसरलेले होते. ध्रुव रात्रीप्रमाणेंच जवळ जवळ जमिनीला टेकायला आला होता. स्वाति आणि चित्रा या चांदण्या माथ्यावर चमकत होत्या. हस्त किंचित् वांकडा झाला होता. पश्चिमेला चंद्र मावळला होता, पण चांदणें अजून आपलें अस्तित्व जाणवून देत होतें. पुन-र्वसूच्या होडक्यांतून फक्त प्रश्वनच ढगांचा वेध करून डोकावत होता. एकल-कोंडा तारा एकाकी आपल्या स्वभावाप्रमाणें प्रश्वन आणि मघा यांच्याशीं कट्टी करून दूर जाऊन उभा होता. मघाची कोयती फाल्गुनीच्या चौरसाचा सांभाळ करीत होती. पूर्वेकडे विशाखेच्या खालीं गुरु, शुक्र शोभून दिसत होते आणि ते चांगलेच वर आलेले असल्यामुळें बारीक अनुराधा, वाकडी ज्येष्ठा आणि

अणकुचीदार मूळ त्यांना आधार देत होते. गुरु, शुक्र जेव्हां पारिजाताच्या जवळ येतात तेव्हां तें त्रिकुट चांगलें शोभून दिसतें आणि मंगळ जवळ नाहीं अशी चुटपूट लागून रहात नाहीं.

हिंदुस्थानाची एक ज्योतिर्मयी व्याख्या मला सुचली आहे. जर कन्याकुमारीच्या दक्षिणेस आपण गेलों तर ध्रुव दिसेनासा होतो आणि काश्मीरच्या उत्तरेस गेलें तर दक्षिणेकडे अगस्ति दिसत नाहीं. यावरून मीं व्याख्या बनवली आहे कीं, जेथून ध्रुव आणि अगस्ति दोन्ही दिसूं शकतात तोच आपला भारत देश होय.

प्रार्थनेनंतर सर्वच प्राण्यांना करावें लागणारें उदरभरण नांवाचें यज्ञकर्म पोटभर करून घेतलें आणि स्नानासाठीं तयार केलेल्या कुंडांत उतरलों. या नव्या धर्तीवर बांधलेल्या कुंडांत समुद्राचें पाणी अखंड येत असतें. अर्धें कुंड चार फूट खोल आहे, बाकीचें अर्धें आठ फूट. कपडे बदलण्यासाठीं दोन खोल्याहि बांधलेल्या आहेत. अशी नीटनेटकी व्यवस्था धार्मिक पुण्य कमी करणारी आहे असें मुळींच मानतां कामा नये. स्नान करून आम्ही कन्याकुमारीच्या दर्शनाला गेलों. हें मंदिर त्रावणकोरच्या हिंदु राज्यांत असल्यामुळें हरिजनांसाठीं केव्हांचें उघडें झालेलें आहे. मंदिराच्या दरवाजावर सरकारी जाहिरनामा आहे कीं, जे जन्मानें किंवा धर्मानें हिंदु आहेत फक्त त्या सर्वांनाच या मंदिरांत प्रवेश आहे

मंदिराचें स्थापत्य साधें पण प्रशस्त आहे. दगडाच्या खांबावर छत म्हणून आडवे दगडच ठेवलेले असल्यामुळें मंदिराचा आंतला भाग एखाद्या भुयारासारखा वाटतो. देवीची मूर्ति पूर्वाभिमुख आहे, पण त्या बाजूचा बाहेरचा दरवाजा बंद असल्यामुळें देवीला समुद्राचें दर्शन होत नाहीं आणि समुद्राला देवीचें दर्शन होत नाहीं. बिचाऱ्या बंगालच्या समुद्रानें स्वतः जन्मानें किंवा धर्मानें हिंदु असल्याचा कधींच दावा केला नाहीं ! आणि समुद्र असल्यामुळें त्याला मर्यादाभंग करूनहि मंदिरप्रवेश करतां येत नाहीं ! !

कन्याकुमारीची कथा करुण आहे. येथल्या किनाऱ्यावर अक्षतांप्रमाणें विखुरलेली शुभ्र जाड वाळू, माणकांच्या चुऱ्यासारख्या लाल रेतीचा गुलाल आणि शाईशोषक म्हणून वापरण्यांत येणारी काळी रेती, या सर्व प्राकृतिक वस्तु या करुण कहाणीला अधिक करुण बनविण्यांत मदतरूप होत असतात

जगांतलीं सगळींच महाकाव्यें जर शोकान्त असतात, तर हिंदी महासागराची अधिष्ठात्री देवी कन्याकुमारी हिची कथा देखील शोकान्त असणें सर्वथा सुसंगत आहे. करुणरसांत जी सखोलता असते तिच्या द्वाराच जीवनाची खोल प्रतीति होऊं शकते.

दुःखं सत्यं सुखं माया; दुःखं जन्तोः परं धनम् ।
दुःखं जीवन-हृद्गतम् ॥

उथळ जीवनाची समजूत असते कीं, सुख हीच काय ती एक जीवनाची अनुभूति आहे, जीवनाचें सारसर्वस्व आहे. हा भ्रम दूर करण्याचें काम दुःखाकडे सोंपविण्यांत आलें आहे. दुःखानें खचून न जातां जो मनुष्य दुःखाचा जीवनाची साधना म्हणून स्वीकार करतो तोच सुखदुःखाच्या पलीकडे जाऊन जीवनसमृद्धीच्या आनंदाचा आस्वाद घेऊं शकतो. हा आनंद सुखदुःखाच्या अतीत असल्यामुळें सागराप्रमाणें गंभीर आणि आकाशाप्रमाणें अनंत असतो.

या आनंदाच्या नशिबीं कुणाशींहि विवाहबद्ध होण्याचें लिहिलेलें नाहीं.

मराठी ग्रंथ
अनुक्रम...३९२३९... दि:
क्रमांक ... नों: दि:

# वेदांची धात्री तुंगभद्रा

८

## : १ :

जलनिमग्न पृथ्वीला आपल्या सुळ्यांनीं पाण्यांतून बाहेर काढल्यानंतर वराह भगवानांनीं ज्या पहाडावर आपला थकवा दूर करण्यासाठीं आराम केला, त्या पर्वताचें नांव ‘ वराह पर्वत ’च असूं शकणार. भगवान आराम करीत असतांना त्यांच्या दोन्ही दांतांतून पाणी ठिबकूं लागलें आणि त्याच्या धारा बनल्या. डाव्या दांतापासून उत्पन्न झालेली धारा बनली तुंगा नदी आणि उजव्या दांतापासून निघाली भद्रा नदी. आज या उगमस्थानाला ‘गंगामूल’ म्हणतात आणि वराह पर्वताला म्हणतात बाबाबुदान. बाबाबुदान कदाचित् वराह पर्वत नसून त्याचा शेजारी असावा. तुंगेच्या कांठावर शंकराचार्यांचा शृंगेरी मठ आहे. मला तुंगेचें प्रथम दर्शन घडलें होतें तें तीर्थहळ्ळीमध्यें. ( कन्नड भाषेंत हळ्ळी म्हणजे खेडेंगांव. ) तीर्थहळ्ळींत मी एक तासभर देखील थांबलों नसेन. परंतु इतक्या थोड्या अवधींत सुद्धां तेथल्या नदीच्या पात्राची शोभा पाहून मला फार आनंद झाला होता. तीर्थहळ्ळीचें माहात्म्य मला ठाऊक नसलें, तरी कन्नड भाषेंतील एका लहानशा लघुकथेंत तीर्थहळ्ळीचें वर्णन मीं वाचलें होतें. तितकेंच तीर्थहळ्ळी स्मरणांत कायम रहाण्यासाठीं पुरेसें आहे. मागें केव्हां तरी तुंगेच्या किनाऱ्यावरील शिमोगा शहराच्या आसपास महात्मा गांधींबरोबर फिरावयास गेलों होतों. यामुळें देखील ही नदी स्मृतिपटावर अंकित झालेली आहे.

भद्रेच्या किनाऱ्यावर बेंकिपूर शहर आहे. येथल्या भाषेंत बेंकि शब्दाचा अर्थ होतो अग्नि. भद्रेचें पाणी ‘बेंकी’पूरची आग विझवण्यासाठीं पुरेसें नव्हतें का ?

तुंगा आणि भद्रा यांचा संगम होतो कूडलीपाशीं. कूडलीजवळील संगमामुळें बनलेली तुंगभद्रा पुढें कुर्नूलपाशीं, मला मातेसमान असलेल्या कृष्णामाईला जाऊन मिळते. या दरम्यान कुंमुद्वती, वरदा, हरिद्रा आणि वेदावती वगैरे नद्या तुंगभद्रेला येऊन मिळतात. ( वेदावती सुद्धां तुंगभद्रेसारखीच द्वंद्व नदी आहे. वेद व अवती मिळून वेदावती बनते. ) या प्रदेशांत तुल्यबल द्वंद्व संस्कृतीचाच बोलबाला असावा. कारण तुंगभद्रेच्या किनाऱ्यावरच हरिहर-सारख्या पुण्यनगरीची स्थापना झालेली आहे. शैव आणि वैष्णव यांचें भांडण मिटवण्यासाठीं कुणी उभय-भक्तानें हरि आणि हर दोघांची मिळून एक मूर्ति बनवली. तिच्या मंदिराच्या आसपास जें शहर वसलें त्यांचें नांव देखील हरिहरच पडलें.

तुंगभद्रेचें पात्र खडकाळ आहे. जिथें पहावें तिथें वाटोळे गुळगुळीत मोठमोठे दगड नदीच्या पात्रांत स्नान करीत असलेले आढळून येतात. अशा प्रकारचे दगड, कधींकधीं या प्रदेशांत टेकड्यांच्या माथ्यावर देखील एकावर एक विराजमान झालेले आढळून येतात. अशा दगडांमध्येंच एका प्रचंड विस्तारावर विजयनगरच्या साम्राज्याची राजधानी वसली होती.

विजयनगरचे भग्न अवशेष पहाण्यासाठीं म्हणून होस्पेटहून विरूपाक्षला गेलों असतांना या भीमकाय पाषाणांचें दर्शन घेतलें होतें. विजयनगरच्या अप्रतिम कलाकृतींतून निर्माण झालेल्या मंदिरांचे भग्नावशेष पहात असतांना माझें हृदय सम्राट् कृष्णरायाचें श्राद्ध करीत होतें. रात्रीं विरूपाक्षाच्या मंदिरांत झोपलों असतांना, सतत तीनशें वर्षें ज्याची कीर्ति अबाधित राहिली त्या साम्राज्याचें वैभवच सारखें माझ्या स्वप्नांत येत होतें. दुसऱ्या दिवशीं ब्राह्ममुहूर्तावर उठून आम्ही जवळच्याच मातंग पर्वताच्या शिखरावर जाऊन पोहोंचलों. तेथून आम्हांला अरुणोदयाचा व नंतर तितकाच काव्यमय, सूर्योदयाचा देखावा पहावयाचा होता. मातंग पर्वताच्या शिखरावरून तुंगभद्रेचें दर्शन घेऊन आम्ही हळूहळू, परंतु उड्या मारीत खालीं उतरलों.

जेव्हां सीतामाईला उचलून रावण गगनमार्गानें जात होता तेव्हां सीतेच्या वल्कलाचा पदर येथल्या पाषाणांवर घासला गेला होता. आज देखलि त्याच्या रेखा येथल्या दगडांवर आढळून येतात !

नदीच्या प्रवाहांत या ज्या हत्तीएवढ्या शिळा आहेत त्या मागाहून येऊन पडल्या, की विशाळ-काय शिळांमधूनच नदीनें आपला मार्ग शोधून काढला, हें कोण सांगूं शकेल ? दक्षिणेंत वैदिक संस्कृतीच्या विजयाचें द्योतक विजयनगरचें साम्राज्य या नदीच्या कांठींच आकारास आलें आणि या नदीच्या कांठींच कच्च्या घड्याप्रमाणें त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या. विजयनगरच्या साम्राज्याची कीर्ति त्रिखंडांत दुमदुमत होती. चीनचा सम्राट्, बगदादचा बादशहा आणि विजयनगरचे महाराजाधिराज या तिघांचें वैभव सर्वांत मोठें मानलें जाई. त्या वेळीं काय तुंगभद्रा अशीच दिसत असेल ? आणि अशी नाहीं तर कशी असेल ? नदी थोडीच मानवी कृति आहे कीं तिच्या वैभवांत उत्कर्ष आणि अपकर्ष असावेत ?

ज्याप्रमाणें मुळा आणि मुठा मिळून मुळामुठा बनली आहे, त्याचप्रमाणें तुंगा आणि भद्रा यांच्या संगमानें तुंगभद्रा बनली आहे. गीतेंतील ‘ द्वंद्वः सामासिकस्य च ’ या न्यायानें या दोन नद्यांत उच्चनीच भाव जरा देखील नाहीं. दोन्ही नांवें समान पातळीवर एकत्र मिळून वहात आहेत. या नदीच्या पाण्याची माधुरी आणि फलद्रुपता यांची प्राचीन काळापासून वाखाणणी होत आली आहे. गंगेचें स्नान आणि तुंगेचें पान माणसाला मोक्षमार्गाला नेतें हें सगळ्या नदीभक्तांनीं मान्य केलें आहे. मोटारीचा प्रवास नसता तर तुंगभद्रेला अनेक स्थळीं अनेक रीतींनें पाहून घेतलें असतें. तुंगभद्रा ही एका महान् संस्कृतीची प्रतिनिधि आहे. आजाहि वेदपाठी लोकांत तुंगभद्रेच्या कांहीं वसणाऱ्या ब्राह्मणांचे वेदोच्चार आदर्श आणि प्रमाणभूत मानले जातात. वेदांचें अस्सल अध्ययन जरी सिंधु आणि गंगा यांच्या तीरीं झालें असलें, तरी त्यांचें यथार्थ रक्षण तर सायणाचार्यांच्या काळापासून तुंगभद्रेच्या कांठींच झालें आहे.

अलीकडेच चार वर्षांपूर्वी कुर्नूलजवळ आपलें समस्त जीवन कृष्णेला अर्पण करीत असतांना मीं तुंगभद्रेला पाहिलें आणि तिच्याजवळून स्वार्पणाची दीक्षा घेतली.

आतां ऐकतों कीं या तुंगभद्रेवर बांध बांधून त्यामुळें एकत्रित झालेल्या पाण्याच्या जोरावर सारा प्रदेश समृद्ध केला जाईल आणि त्याच पाण्यांतून वीज उत्पन्न करून त्या शक्तीच्या द्वारां उद्योगधंद्यांचा विकास साधला जाईल. मातेच्या सेवाशक्तीला कधीं मर्यादा असते का ?

# सोन्याची खाण

१

आपण सोन्याची खाण पहाण्यासाठीं पृथ्वीच्या पोटांत जाणार आहोंत या विचारानें १९२७ सालीं जी उत्सुकता व थराहून सोडणारी जिज्ञासा मनांत उत्पन्न झाली होती ती पुन्हा उठणें शक्य नाहीं. अंडें एकदांच फुटूं शकतें, त्याप्रमाणें अज्ञाताचें काव्य एकदांच अनुभवतां येतें.

गुजरातेंत महापुरानें हाहाकार माजला होता आणि त्याच वेळीं जीवनाच्या कित्येक असाधारण प्रश्नांनीं माझ्या हृदयांत थैमान घातलें होतें; म्हणून मी बोर्डीहून गांधीजींना भेटण्यासाठीं बंगळूरला आलों होतों. गांधीजींची प्रकृति बरी नव्हती. कारावासाच्या यात्रेचीं मूळ सहा वर्षें पूर्ण होतांच आपली जीवनयात्राहि पूर्ण होणार आहे अशी कांहींशी विचित्र कल्पना घेऊन बापूजी बसले होते, याचा विषादहि बऱ्याच जणांच्या मनांत होता. तशा स्थितींत व्यग्र चित्तानें आम्ही म्हैसूरची सफर करीत होतों. त्याच वेळीं देवदास गांधींच्या उत्साहामुळेंच आम्ही प्रथमच कोलारच्या सोन्याच्या खाणी पहावयास गेलों.

नंतर दुसऱ्यांदा गेलों ते १९३६ सालीं. गांधीजी वल्लभभाईंसह नंदीच्या टेकडीवर राहिले होते. उन्हाळा संपत आला होता. नंदीवर शक्य तितकें अधिक रहावें आणि थंड हवेचा भरपूर फायदा घ्यावा या निश्चयानें आम्ही तेथें राहिलों होतों. शेवटीं जेव्हां नंदीवर वादळें व्हावयाला लागलीं आणि विजांमुळें घरांतील दिव्यांचे गोळे फुटूं लागले तेव्हां आम्ही खालीं उतरलों. बंगळूरला जाण्यापूर्वी घाईघाईनें सोन्याच्या खाणी पाहून आम्हीं आगे कूच केलें. त्या वेळीं आमच्या-बरोबर दुसरे अनोळखी लोक होते. प्रवासी मेळ्यांत जेव्हां अनोळखी लोक बरोबर असतात तेव्हां प्रवासाचा अर्धा आनंद विरून जातो.

या वेळीं आम्हीं पूर्वीप्रमाणें सात हजार फूट खोल गेलों नव्हतों. आणि खालीं घेऊन जाणारी आमची खोली किंवा पाळणे पूर्वीच्या इतक्या वेगानें

उतरतहि नव्हते. परंतु एक विशेष लाभ झाला. दगडाच्या भुग्यांतून एक वेळ सोनें धुऊन काढल्यानंतर त्याच धुळींत राहिलेलें सोनें सायनाइडच्या प्रयोगानें प्रवाही बनविण्याची कृति मीं या वेळीं चांगल्या रीतीनें समजून घेतली.

: १ :

सोन्याची खाण पहाण्याची अलिकडची माझी ही तिसरी खेप. बरोबर चि. सरोज नसती तर पृथ्वीच्या पोटांतून ही पिवळी चमकदार माती उपसून काढण्याचा हा वेडेपणा पहाण्यासाठीं मीं एक दिवस खर्च केला नसता.

प्रथम दर्शनांत एक आगळाच आनंद असतो. त्यापेक्षां कमी प्रतीचा परंतु जवळ जवळ तितकाच आनंद त्या वस्तूचा नव्यानेंच अनुभव करणारी एकादी व्यक्ति बरोबर असल्यास मनुष्याला मिळूं शकतो. आपलें ज्ञान, आपली माहिती आणि अनुभव प्रकट करण्याची जेव्हां मनुष्यास संधि मिळते त्या वेळचा त्याचा आनंद कांहीं कमी नसतो. नवीन माणसाच्या उत्सुकतेंत भागीदार होण्यांत देखील स्वतंत्र आनंद मिळत असतो, कारण त्यामुळें जुन्या अनुभवाचें शिळेपण पुष्कळ अंशीं नाहींसें होतें.

पहिल्यांदा आम्ही आगगाडींतून गेलों होतों. दुसऱ्या वेळीं नंदीहून कोलारला गेलों होतों. या वेळीं बंगळूरहून मोटारनें सोन्याच्या खाणींपर्यंत जाऊन त्याच दिवशीं परत आलों. ६० मैलांचा रस्ता आहे, परंतु आम्ही तर जातां येतां मिळून जवळ जवळ १५० मैलांचें अंतर कापलें.

'इष्टैः सह भुज्यताम् !' या न्यायानें आमचे यजमान श्रीनिवास राव यांना आपल्या लहान मुलीला आमच्याबरोबर पाठविण्याविषयीं मीं सुचविलें. मग न्याय म्हणून तिच्या भावाला बरोबर घ्यावें लागलें. आणि दोघांबरोबर दया म्हणून किंवा कमिशन म्हणून धाकट्या ललितेला आम्हीं बरोबर घेतलें. अशा प्रकारें कानडी भाषा बोलणारीं तीन मुलें बरोबर असल्यामुळें मीं त्यांच्याशीं गप्पा मारून आपल्या कानडी शब्दांच्या भांडाराला उजाळा दिला. वाटेंतील दगडांच्या टेकड्यांनीं हम्पीच्या 'मातंग पर्वता'ची आठवण दिली. आकाशांतील ढगांनीं 'नंदीदुर्ग'चें स्मरण करविलें आणि रस्त्यालगतच्या लांब लांब तलावांनीं 'इंद्रायणी' नदीचें सौंदर्य दाखविलें. याप्रमाणें स्मरणांच्या भारानें भारावून आम्ही सोन्याच्या खाणीपाशीं पोहोंचलों. जिकडे तिकडे बांबूच्या टोपलींत आगपेटी

खोंचून टोपली डोक्यावर घेतलेले व हातांत कार्बाइडचे कंदील घेऊन इकडे तिकडे फिरणारे मजूर नजरेस पडले.

सोन्याच्या खाणीचे सरकारी कमिशनर श्री. दोरायस्वामी यांना आम्हीं अल्पसायासांनीं शोधून काढलें. त्यांच्याबरोबर 'कोलार'चे मारवाडी शेट श्री. भैरवलालजी पण होते. दोघांनाहि बंगळूरहून आमच्याविषयीं तार गेलेली असल्यामुळें ते आमची वाट पहात होते. माझ्या जेवणाविषयीं चार-दोन सूचना दिल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. त्या देऊन आम्ही खाणी पहावयास निघालों.

येथला जवळ जवळ २५ चौरस मैलांचा भूमिभाग सोन्याच्या दगडांनीं भरलेला आहे, असें भूस्तरविद्येच्या तज्ज्ञांनीं निदान केलें आहे. त्यापैकीं सुमारें चार मैल जमीन खोदण्याचें काम चाललें आहे. "ही एक खाण आतां संपत आली" असें या लोकांनीं म्हणावें कीं ताबडतोब अधिक खोलांतून त्याच्याहि-पेक्षां चांगले दगड निघायचे. येथल्या खाणी सबंध जगांत सर्वांत खोल समजल्या जातात. हे लोक जवळजवळ आठ हजार फूट खोल गेले आहेत. आंत उतर-ण्याच्या मुख्य विवराला इंग्रजींत शॅफ्ट म्हणतात. या शॅफ्टमधून पाळण्यांत बसून लोक खालीं उतरतात. प्रत्येक वेळीं ३५ + ३५ = ७० माणसें पाळण्यांत भरून खालीं पाठविण्यांत येतात. एका पाळण्याबरोबर त्याच दोरीला दुसऱ्या बाजूस दुसरा पाळणा अडकविला असल्यामुळें एक खालीं जातांच दुसरा वर येतो, आणि प्रत्येक पाळण्यांत वरचा आणि खालचा असे दोन मजले असल्यामुळें प्रत्येक वेळीं १४० लोकांचे जीव या विजेच्या यंत्राच्या हातांत लोंबकळत असतात. दोन पाळणे अशा प्रकारें एकमेकांशीं जोडल्यानें जोखीम बरीच कमी होते आणि पाळण्याचा वेग ताब्यांत ठेवतां येतो.

ह्या खाणींत काम करणाऱ्या वीस-पंचवीस हजार मजुरांपैकीं बारा-पंधरा हजार मजूर पृथ्वीच्या पोटांत अहिरावण-महिरावणासारखें काम करीत असतात. त्यांना आंत जाण्यास मिनिटभर जरी उशीर झाला तरी शेंकडों रुपयांचें नुकसान होत असल्यामुळें विजेच्या वेगानें मजुरांना आंत नेण्यासाठीं आणि बाहेर पोहोंचविण्यासाठीं मानवी बुद्धीचा चांगलाच उपयोग करण्यांत आला आहे. कोणत्याहि प्रकारें अपघात होऊं नये म्हणून इतक्या युक्त्या येथें योजण्यांत आल्या आहेत कीं मानवी जीवनाची किंमत येथें सर्वांत जास्त मानली जाते याविषयीं खात्री पटते. हजारों रुपयांचें नुकसान झालें तरी हरकत नाहीं, परंतु

एकाहि मनुष्याचें जीवित धोक्यांत येऊं नये हें येथलें सूत्रवाक्य आहे. तरीहि शेकडा दोन-चार लोक संकटांत सांपडतातच. ह्या वर्षी म्हणजे गेल्या कांहीं महिन्यांतच खालीं पृथ्वीच्या पोटांत उतरत असतांना तीसचाळीस जण स्वर्गीं पोहोंचल्याचें दोरायस्वामींनीं सांगितलें. आम्हीं जेव्हां दुःख प्रदर्शित केलें तेव्हां ते म्हणाले. "पृष्ठभागांतील मोकळ्या हवेंत जीवन जितकें धोक्याचें असतें तितकें आंत नसतें. आंत जर दोन टक्के धोका असला तर तुमच्या वरच्या दुनियेंत चार टक्के समजायला कांहीं हरकत नाहीं. आगगाडीखांलीं किंवा मोटार-खालीं सांपडून लोक मरतात, बोटी बुडतात, घरें कोसळतात हीं संकटें काय कमी आहेत? या दृष्टीनें आंतला धोका पुष्कळच कमी आहे. भूकंपाचें भय जितकें पृष्ठभागावर आहे तितकें आंत नाहीं. वर तर घरें कोसळून ढीग होतात तसला कांहीं प्रकार आंत नाहीं."

हें ऐकून मला वाटलें कीं खरें पहातां बाहेर येण्यास मनुष्यानें घाबरलें पाहिजे, कीं आपण आतां कमी सुरक्षित जागीं आलों. जन्मभर बोटींत वावरणारे लोक जमिनीवर चालतांना घाबरतात आणि आपणांस कमी सुरक्षित मानतात, असें कोठेंतरी वाचल्याचें मला आठवतें.

वर पहाण्यालायक सर्व गोष्टी आधीं पाहून घेऊं, असें श्री. दोरायस्वामींनीं सुचविलें. सोबतच्या मुलांनाहि त्यांत मौज वाटेल, मग आंत उतरूं. कायद्या-प्रमाणें लहान मुलांना आंत नेऊं देत नाहींत हें मला माहीत होतें, म्हणून मी जयम्मा, चंद्रशेखर व छोटी ललिता यांना हें सगळें समजावून देऊन त्यांनीं आंत येण्याचा हट्ट धरून रडूं नये ह्या अटीवरच सोबत आणलें होतें. आंत उतरतांना प्रत्येकाला लिहून द्यावें लागतें कीं आपण आपल्या जबाबदारीवर आंत जात आहों. आणि कांहीं अपघात झाला तर त्याचें जोखीम आपल्यावरच आहे, कंपनी किंवा सरकारवर नाहीं. असें लिहून देण्याच्या वयाचे जे नसतात त्यांना आंत घेऊन जाण्याची मनाई आहे. कांहीं लोक असें लिहून देतांक्षणींच गंभीर बनतांना मीं पाहिले आहेत. जणूं काय आपण एकादें वीरकर्म केलें आहे. लष्करांत भरती होतांनाहि माणसाला अशाच प्रकारच्या बहादुरीचा अनुभव येत असावा.

पहिल्या प्रथम खाणींतून बाहेर येणाऱ्या दगडांपासून आम्हीं सुरुवात केली. खाणींतून येणारे दगड मोठमोठ्या त्रिकोनी घमेल्यांतून वर येतात. ह्या

घमेल्यांना ट्रॉलीसारखीं चाकें असल्यामुळें तीं खाणींत नेणेंहि सोपें जातें. वर आणलेल्या घमेल्यांच्या गाड्या ओढण्याचें काम बैल करतात. पूर्वी हें विजेच्या यंत्रानें होत असे. परंतु विजेपेक्षां नंदीश्वरांची मेहनत स्वस्त पडूं लागल्यामुळें उदार अंतःकरणानें हें काम त्यांच्याकडेच सोंपविण्यांत आलें आहे. प्रत्येक घमेल्यांत चार चार टन दगड भरलेले असतात. त्यांतून फार फार तर दोन तोळे सोनें निघतें.

दगड वर आले कीं ज्यांत राम ( म्हणजे सोनें ) नाहीं असें काळे दगड वेंचून फेकून देण्याचें काम अगोदर सुरू होतें. हे सगळे दगड कुटल्यास खर्च फार होईल. म्हणून त्यांना वेंचून काढून बाकीचे दगड दळायला पाठविणें अधिक सोईस्कर असें मानवानें ठरविलें. यासाठीं लोखंडाचें एक मोठें वलयाकार टेबल गरगर फिरत असतें. त्यावर हे दगड येऊन पडतात आणि मजूर त्यांतून वेंचत जातात. पांढऱ्या दगडांतच सोनें असतें. म्हणून ते ठेवण्यांत येतात. हे 'कुबेर-दगड' पुनः घमेल्यांत भरून कारखान्यांत पोहोंचविले जातात. तेथें त्यांचें पहिलें वहिलें सामाजिक जीवन सुरू होतें. एका मोठ्या यंत्राच्या तोंडांत ते भरडले जातात आणि त्यांचे बारीक बारीक तुकडे होतात. हे तुकडे एका राक्षसी सिलिंडर पेल्यांत ओतले जातात. तेथें त्यांचें एकमेकांशीं घर्षण होऊन अमुक इतक्या प्रमाणांत ते गुळगुळीत बनतात. चेष्टेखोर लोकांच्या संगतीनें चिडखोर माणसें ताळ्यावर येतात तीच गत ह्या दगडांची होते. भलेपणा मिळवला कीं सुटलों असें जगांत नाहींच नाहीं. भले आहेत म्हणूनच ते कुटले जातात.

ही कुटण्याची क्रिया पाहून दया येते. प्रत्येक उखळांत लोखंडाचीं चार चार अवाढव्य मुसळें सारखीं कुटीतच असतात. आणि जसजशीं कुटतात तसतशीं आपणांभोंवतीं गोल गोल फिरत असतात – जणुं 'चक्रं भ्रमति मस्तके !' दगड कुटून कुटून हीं मुसळें त्यांचा इतका भुगा बनवितात कीं त्या बारीक रेतीला पाण्याशीं मिसळून प्रवाही बनण्यास वेळ लागत नाहीं.

आतां ह्या प्रवाही रेतींतून सोन्याचे कण गाळून घ्यावयाचेंच काम फक्त बाकी रहातें. प्राचीन काळीं मेंढ्या-बकऱ्यांना मारून व त्यांचीं केसाळ कातडीं पसरवून त्यावरून हें रेतीमय पाणी वहाविण्यांत येत असे. सोन्याचे कण जड असल्यामुळें चामड्याच्या केसांत अडकून रहात व बाकीची रेती पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून जाई. दोरायस्वामींनीं सांगितलें कीं ग्रीक लोककथांतून

' गोल्डन फ्लीस 'चा जो उल्लेख आहे त्याचें कारण हेंच आहे. ( फ्लीस म्हणजे केसाळ चामडें ). त्याच्या रंगावरून त्याला हें नांव मिळालें असावें असें मी समजत होतों. आतां समजलें कीं एकाद्या कृपणाप्रमाणें तें सोन्याचे कण पकडून ठेवतें, येवढ्यावरून त्याला असें नांव मिळालें आहे. असो.

हल्लीं ह्या केसाळ चामड्याऐवजीं लोकरीचीं कांबळीं वापरलीं जातात. त्यांत जे सोन्याचे कण अडकतात ते एका चौकोनी तपेल्यांत झाडले जातात. आणि नंतर त्या तपेल्यांतलें पाणी एका तांब्याच्या पत्र्यावरून वहाविण्यांत येतें. तांब्याच्या पत्र्याला पाऱ्याचा थर दिलेला असल्यामुळें त्याला सोन्याचांदीची कडकडून भूक लागलेली असते. सोन्याचे कण असलेलें पाणी त्याच्यावरून वाहूं लागलें कीं, पारा हे सर्व कण पकडून घेतो. नंतर हा सगळा पारा एकत्र करून गरम करतात. त्यामुळें पारा निराळा व सोनें निराळें होतें. पोटांतून पारा निघून गेल्यामुळें सोन्याचे कण स्पंजासारखे बनतात. हे पुनः वितळवून त्यांचा रस बनविण्यांत येतो आणि नंतर त्याच्या विटा बनवून मुंबईस पाठविण्यांत येतात. खाणींतून निघालेल्या दगडांचें वजन करूनच ते कारखान्यांत पाठविण्यांत येतात. ह्या वजनावरून एकंदर किती सोनें उतरेल ह्याचा अंदाज बरोबर निघतो. पण जरा कुठें जास्त फरक पडला तर मग काय विचारतां ? सबंध कारखान्यांत हाहाकार उडतो आणि कोठें चूक झाली, कोठें चोरी झाली ह्या सगळ्याचा तपास करण्यांत येतो. कारखान्यांत फिरतां फिरतां दोरायस्वामी म्हणाले कीं, येथें प्रत्येक मनुष्य फक्त आपणा स्वतःला साव समजतो आणि बाकी सर्वांची चोराप्रमाणें झडती घेण्यांत येते. ( सोन्याची खाण न पहातांच शंकराचार्यांनीं लिहिलें होतें कीं, ' पुत्राद् अपि धनभाजां भीतिः । ' )

दगडाच्या पोटांतून सोनें काढून घेतल्यानंतर बाकीचा भुगा कचरा म्हणून फेंकून देण्यांत येतो. त्याच्या मोठमोठ्या टेकड्या चहूंकडे दृष्टीस पडतात. ही रेती ना सिमेंट बनविण्याच्या कामीं येत कीं ना कांच बनविण्याच्या. म्हणून बिचारी ही वाळू आपला उपयोग शोधून काढील अशा भविष्यकालीन मनुष्याची वाट पहात शिळा बनलेल्या अहिल्येप्रमाणें तपश्चर्या करीत येथें पडली आहे !

ह्या रेतींतून केवळ ९८ टक्केच सोनें आपण काढूं शकलों आहोंत, असा मानवानें पुनः एक शोध लाविला. दोन टक्के सोनें कांबळ्याच्या चाळणींतून सुटून जाऊन रेतींतच वाहून जातें. मनुष्य सोन्याचा दास बनेल पण सोन्याकडून

स्वतःची अशी फसवणूक करून घेणार नाहीं. त्यानें हा रेतींचा ढीग पुनः पाण्यांत भिजवून त्यांत सायनाईड टाकून सोनें प्रवाही बनविलें आणि अशा रीतीनें रेतींतून सोनें काढून घेतलें. हें पाणी नंतर फिल्टर करून जस्ताच्या पातळ चाळणींवर ओतण्यांत येतें. कमजात सायनाईड जस्ताशीं संयोग होतांच सोन्याला सोडून देऊन जस्ताला चिकटतें. आणि अशा प्रकारें सोन्याचा काळा ढीग निराळा तयार होतो. सायनाईड म्हणतें, 'तुम्हांला जस्ताची खुबी काय माहित ? त्याच्यासमोर सोन्याच्या सहवासाची काय किंमत !' खरोखर –

'तत् तस्य किमपि द्रव्यं यो हि यस्य प्रियो जनः।'

सोनें महाग व जस्त स्वस्त असें मनुष्यानेंच ठरविलें आहे ना ? गाईला मानवी बालकांपेक्षां आपलीं वासरें चाटण्यांतच अधिक संतोष वाटतो.

हें सायनाईडनें टाकून दिलेलें सोनें गरम केल्यावर 'सुवर्णवर्ण' सोनें प्रकट होतें आणि तें पाहून कष्टाळू माणसाच्या आनंदाला सीमा रहात नाहीं. पाऱ्याच्या मदतीनें जेव्हां सोनें एकत्र करण्यांत येतें तेव्हां त्यांत सोन्याबरोबर चांदीहि मिसळते. पारा कितीहि गुणग्राही असला तरी तो थोडासा "कलर ब्लाइंड" (वर्णांध) आहे. सोनें कोणतें, 'रजत' कोणतें हा विवेक त्याला नसतो. यामुळें येथल्या खाणींत तयार झालेल्या सोन्यांत सुमारें दहा टक्के चांदी असते. ती निराळी करण्याचें काम मात्र येथें होत नाहीं.

शनिवार असल्यामुळें आम्हीं सोन्याचें दर्शन घेऊं शकलों नाहीं. पहिल्या वेळीं जेव्हां आम्हीं गेलों होतों तेव्हां आम्हांला एक वीट पहावयास मिळाली होती. एका विटेची किंमत लाख सव्वा लाख रुपये होती. विटांच्या तिजोरीला दोन कुलुपें होती. प्रत्येक कुलपाची किल्ली निरनिराळ्या दोन गोऱ्या अधिकाऱ्यांकडे होती. हे दोन अंमलदार जेव्हां आपापल्या कचेरींतून आले तेव्हां कोठें तिजोरी उघडली आणि आंतली एक वीट टेबलावर ठेवण्यांत आली. मुख्य व्यवस्थापकानें आम्हांला आव्हान दिलें कीं,

"एका हातानें तुम्ही ही वीट उचलूं शकलां तर आम्हीं ती तुम्हांला बक्षीस देऊं."

सगळ्यांनीं प्रयत्न केला. परंतु कोणालाच यश आलें नाहीं. दोन्ही हातांनीं उचलणें देखील सोपें नव्हतें. आम्ही दुसऱ्यांदा गेलों तेव्हां याहिपेक्षां अधिक आकर्षक दृश्य आम्हांला पहातां आलें. आठ दिवसांचें सोनें भट्टींत टाकून त्याची

वीट बनविण्याची तयारी होत होती तेव्हां आम्ही तेथें जाऊन पोहोंचलों. मोठ्या कढईतलें धगधगणारें सोनें साऱ्या मानव जातीला शाप देत होतें. चार मजुरांनीं लांब लांब सांडसांनीं ती कढई उचलून वीट बनविण्याच्या चौरस द्रोणांत तो रस ओतला आणि वर गार पाणी ओतलें. द्रोणांतून वीट चटकन् निघून यावी म्हणून तो वरून जरा रुंद व खालून किंचित् अरुंद असा बनविलेला असतो. विटेलाहि त्यामुळें तसलाच आकार प्राप्त होतो. वीट धरण्याची इतकी चांगली सोय असल्यामुळें मला वाटलें होतें कीं आपण ती जोरानें पकडून उचलूं शकूं. परंतु तो प्रयत्न विफल सिद्ध झाला. वीट धरणें सोपें आहे, उचलणें मात्र अशक्य.

रेतींतून सायनाईडच्या मदतीनें सगळें सोनें पाण्यांत घेण्याची क्रिया किचकट आहे. पाणी आणि रेती एकत्र झालेलीं असतात तेव्हां भांड्यांत खालून हवेचे बुडबुडे सोडून रेती-पाण्यांत मोठा खळबळाट उत्पन्न करण्यांत येतो. हीं भांडीं उंच उंच टॉवरसारखीं असतात आणि त्यांचें 'चळवळे' ( Agitators ) असें नांव असतें. मीं दोरायस्वामींना विचारलें, " ह्या ॲजिटेटर्सवर तुम्ही राजद्रोहाचा आरोप ठेवीत नाहीं ? त्यांना हद्दपार करीत नाहीं ? त्यांच्यासाठीं कोणती शिक्षा आहे ? "

दोरायस्वामी उत्तरले, " या लोकांनीं ॲजिटेशन बरोबर केलें नाहीं तरच मला त्यांना शिक्षा द्यावी लागते. त्या वेळीं मी त्यांची दयामाया करीत नाहीं ! "

मोठमोठ्या हौदांत हें पाणी गोल गोल फिरतें. जणूं काय डोकें फिरतें आहे त्यांचें !

दगडांना वाटत असेल, आमचा खरोखर अपराध काय ? पोटांत थोडीशी पिवळी माती आहे त्यासाठीं किती कष्ट आम्हांला सहन करावे लागतात. आम्हांला जर याची कल्पना असती तर आम्ही परमेश्वराची प्रार्थना केली असती कीं देवा, ही सोन्याची साडेसाती आमच्या मागें नको !

असें सांगतात कीं नादिरशहा जेव्हां हिंदुस्थानांत आला तेव्हां शाहसूजाकडून कोहिनूर हिरा घेण्यासाठीं त्यानें त्या बादशहाचा अमानुष अपरिमित रीतीनें छळ केला. माणूस माणसाला छळतो तेव्हां त्याला आपण नृशंस, घातकी, नराधम म्हणतों. परंतु मनुष्य सोन्याचा दगड, सुगंधी फुलें किंवा धूप कुटतो, उकळतो किंवा जाळतो तेव्हां कोणाला त्याचें कांहींच वाटत नाहीं !

पृथ्वीच्या पोटांत सरळ उतरून दर ५०० किंवा हजार फुटांखालीं इकडे तिकडे कपारी खणून माणूस तिचीं आंतडीं कुरतडतो आणि त्याला म्हणतो मानवाची बहादुरी, त्याचा निसर्गावर विजय ! आणि असें करतांना माणसा-सारखा माणूस आपल्याच बंधूंना आठ आणे रोजीची लालूच दाखवून पृथ्वीच्या पोटांत ढकलून देतो आणि तेथें जर एखाद्याचा हात तुटला, डोकें फुटलें, प्राण गेला आणि त्याहिपेक्षां अनिष्ट म्हणजे — एखाद्याचें डोकें फिरलें तर स्वस्थ चित्तानें मानून घेतो कीं ' हें कांहीं फार नाहीं ! ' खरोखर शहाण्या समजल्या गेलेल्या मानव जातीचें डोकेंच फिरलें आहे. म्हणून अशी नरकाला नेणारी प्रवृत्ति त्याला सुचते. प्राचीन काळीं हें सारें पाहून गुदमरलेल्या कवीनें आक्रोश केला होता कीं,

" स्वापतेयकृते मर्त्याः किं किं पापं न कुर्वते ? "

( स्वापतेय = सोनें )

( जुलै १९३९ )

# नंदीदुर्ग

१०

गुजरातच्या महापुराचेच ते दिवस. मी बंगलोरला गेलों होतों. पण गांधीजी त्या वेळीं नंदीहून कुमारापार्कांत रहावयास गेले होते म्हणून इकडील प्रदेशाचें भूषण असलेलें हें ठिकाण मला पहातां आलें नव्हतें. आपलें घराणें मूळ किल्लेदाराचें हें तुला ठाऊक आहेच ! आपल्या पूर्वजांनीं शिवाजीच्या वेळीं किल्ले लढविले असावेत. आपल्याला गिरि-प्रवासाची इतकी हौस त्यामुळेंच असेल. एकादा उंच पहाड किंवा मोठा पर्वत मी पहातों तेव्हां त्याच्या शिखरावर चढून जाण्यास माझे पाय शिवशिवूं लागतात. पर्वत उंच आहे आणि मी मात्र खालीं आहें हें माझ्यानें सहनच होत नाहीं.

परंतु ही माझी वृत्ति विजेत्याची नसून जिज्ञासूची आहे. जितकें वर जाऊं तितकें अधिक दिसेल, दूरवरचें दिसेल आणि तितका आत्मीय भाव वाढेल, हाच त्यांतला आल्हाद ! स्वदेशभक्ति म्हणजे स्वजन-सेवा, स्वदेशांत रहाणाऱ्या लोकांची सेवा हें मला माहीत आहे, तरीहि हिंदुस्थानच्या नुसत्या भूमीचेंहि स्वतंत्र आकर्षण मला कांहीं कमी नाहीं. माझ्या देशाचा मोठ्यांतमोठा भाग एकाच वेळीं पर्वतावरून नजरेला जेव्हां पडतो तेव्हां माझें हृदय भरून येतें. पोळीचा किंवा लाडवाचा मोठा तुकडा तोंडांत घातल्यानें लहाणपणीं तुला जो आनंद वाटत असे तोच आनंद आपल्या या लहान डोळ्यांत स्वदेशाचा हा मोठा घास भरून घेतांना मला होतो. हिमालयांतील तुंगनाथ किंवा अशाच दुसऱ्या उंच शिखरावर उभें राहून शेंकडों मैल पसरलेला हिमशिखरांचा मेळावा मीं पाहिला तेव्हां मला काय आनंद झाला होता ! सिलोनच्या दक्षिणेकडे देवेंद्र येथें आपली दुनिया संपुष्टांत येते, तेथें दीपगृहावर उभें राहून उत्तरेकडे उसळणारा नारळीच्या झाडांचा समुद्र पाहिला होता तेव्हां त्याच आनंदाचा प्रत्यय आला होता. दक्षिणेकडे हिंदी महासागर आणि उत्तरेकडे

विश्वामित्राच्या अपूर्व सृष्टीचा सागर या दोहोंचें मीलन पाहून माझ्या मानस-सागरांत अक्षय तृतीया झाली असेल तर त्यांत आश्चर्य तें कसलें ? त्रिवेणी संगम नदीचाच असतो असें नाहीं. सागरांच्याहि बाबतींत अशा संगमाची कल्पना करतां येईल.

कुर्गची राजधानी मरकारा येथें असें एक स्थान आहे कीं जिथें प्रकृतिमाता एखाद्या सम्राज्ञीप्रमाणें आपलें अतुल वैभव प्रगट करते. आणि सिलोनांत जेव्हां अनुराधापुराजवळील महेंद्र पर्वताच्या शिखरावर एका सायं-काळीं जाऊन पोहोंचलों तेव्हां दूरवरचा प्रदेश तर दिसलाच पण सम्राट् अशोक, महेंद्र आणि संघमित्राच्या काळापर्यंतचा आपला इतिहासहि माझ्या नजरेसमोर उभा राहिला. हृदय विशाल करून या विश्वाशीं ज्याला एकत्व अनुभवावयाचें आहे त्यानें वरवर चढतच राहिलें पाहिजे, हें धर्मराज युधिष्ठि-रालाहि माहीत होतें. गिर्यारोहण देखील जन्मभूमीच्या उपासनेची एक उत्तम साधना आहे.

तुला वाटेल कीं नंदी येथें वर्णन करण्याजोगें कांहीं नसावें म्हणून ही इतर पर्वतांची जुनी कथा लिहिली आहे. पण तसें नाहीं. कोणतीहि प्रवृत्ति सुरू करण्यापूर्वी तिच्या पूर्वाचार्यांचें स्मरण करणें स्वाभाविक व शास्त्रविहित आहे. नंदीच्या ह्या पहाडाचा जुना इतिहास मी येथें लिहिणार अशी तुझी अपेक्षा असेल तर तुला निराशच व्हावें लागेल. आपण स्वतः तर संशोधन करीत नाहीं. गॅझेटियर मागवितों व त्यांत जी माहिती सांपडेल ती निरनिराळ्या रीतीनें लिहितों. मला तसें करावयाचें नाहीं. मीं एवढेंच म्हणेन कीं नंदीचें सबंध नांव नंदीदुर्ग आहे. प्राचीन काळीं या ठिकाणाला नंदगिरि म्हणत असत. नंद म्हणजे आनंद. आजहि या पर्वतावर आनंदाची लयलूट आहे. या पहाडाच्या पायथ्याशीं लहानमोठ्या अनेक शिळांमध्यें कोरलेले नंदी विराजमान आहेत आणि हा सबंध पहाडदेखील एकाद्या मोठ्या सांडासारखा दिसतो. संस्कृत कवींना शाब्दिक साम्यावरूनहि कल्पना सुचत. शृंग म्हणजे शिंग आणि शृंग म्हणजे शिखर. यावरून नंदी आणि पहाड दोघेहि 'शृंगी' आहेत. म्हणून या पर्वताचें नांव कोणीतरी नंदाच्या ऐवजीं नंदी केलें असावें. पर्वताच्या पायथ्याशीं भोग-नंदीचें मंदिर आहे तर पहाडावर योग-नंदीचें. भोग सोडून मनुष्य जेव्हां वर चढतो तेव्हांच तो योगारूढ होऊं शकतो !

नंदी स्टेशनावर अजमासें १०॥ वाजतां जाऊन पोहोंचलों. स्टेशनवरून पहाड कांहीं तितकासा आकर्षक दिसत नाहीं. मुंडण केलेला एकादा साधु उभा असावा तसें त्याचें माथें दिसतें. दुरून त्या माथ्यावर महादेवाच्या देवळासारखें कांहीं तरी दिसतें, तितकेंच त्याचें सौंदर्य. पायथ्यापर्यंत मला नेण्यासाठीं एक रिक्षा आली होती. परंतु माणसासारखा माणूस पशू बनून त्यानें आपणांस ओढून न्यावें हें मला पसंत नव्हतें. आणि पर्वत चढण्यापूर्वी दोन मैल चालत जाणें हाहि कांहीं मोठा कठिण प्रश्न नव्हता. म्हणून रिक्षेंत सामान ठेवलें व पायीं चालण्याचें पुण्य मिळविलें.

पर्वताच्या पायथ्याशीं तुम्हांला जिवंत उचलून नेण्यासाठीं चार माणसें तयार असतात. बसण्यासाठीं वेताची आकर्षक खुर्चीहि असते. परंतु पर्वत चढण्याचा आनंद आणि खुर्चीच्या २॥ रुपयांची बचत दोन्हीकडून फायदाच होता. पण मीं एक चूक केली. एक स्वयंसेवक माझ्यासाठीं वरून फळें घेऊन आला होता. तीं मीं पोटभर खाल्लीं. मला वाटलें कीं पर्वतावर चढण्यापूर्वी एंजिनमध्यें पुरेसा कोळसा-पाणी असलें पाहिजे. पर्वत चढणारे आम्ही तिघे चौघे-जण होतों. आम्हांला वर जातांना पाहून खालच्या खेड्यांतील एका अनोळखी मुलाला वाटलें कीं आपणहि जावें. गाडी पाहून तिच्याबरोबर पळत जाण्याची निष्कामवृत्ति एकट्या ग्रामसिंहांतच असते असें नाहीं. माणसांमध्येंहि अशी सामाजिक वृत्ति मूळचीच आहे. मनुष्यानें विचारपूर्वक ती टाकून देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु मरण आणि ' परण ' ( लग्न ) प्रसंगीं तर ती दिसूनच येते. मुलाला मीं भरपूर न्याहारीला दिलें. तेव्हां त्यानें माझी एक लहानशी टोपली घेण्याचें ठरविलें. थोडासा भार पोटांत आणि थोडासा पाठीवर ही व्यवस्था त्याला अनुकूल झाली आणि मी दुहेरी ओझ्यांतून मुक्त झालों.

नंदी चढण्याचे मुख्य रस्ते दोन आहेत. एक जुना पायऱ्या असलेला आणि दुसरा दूरचा परंतु सोपा. इंग्रजींत त्याला ' ब्राइडल् पाथ ' म्हणतात. आपण त्याला घोडरस्ता किंवा तट्टूरस्ता म्हणूं. गांधीजी ह्या रस्त्यानें चालत आले. पांच मैलांचा हा रस्ता चढायला त्यांना अडीच तास लागले.

जवळच्या रस्त्याला खालपासून वरपर्यंत मोठमोठ्या पायऱ्या आहेत. पन्नास पन्नासच्या अंतरानें पायऱ्यांवर आंकडे खोदलेले आहेत. अगदीं वरच्या फाटकावर १६५० चा आंकडा वाचायला मिळतो. हा आंकडा

पायऱ्यांचा आहे कीं फुटांचा आहे ह्याविषयीं आमच्यांत मतभेद आहे. महादेवभाईंना वाटतें कीं तो फुटांचा आहे आणि मला वांटतें तो पायऱ्यांच्या संख्येचा निदर्शक आहे. मध्यें मध्यें मीं मोजून पाहिलें तेव्हां दोन आकड्यां-मध्यें बरोबर ५० पायऱ्या होत्या. परंतु महादेवभाईंना ५३ पायऱ्या सांपडल्या. गॅझेटियरमध्यें लिहिलें असावें कीं पायथ्यापासून शिखर १६५० फूट आहे आणि पायथा समुद्रसपाटीपासून ३००० फूट आहे. म्हणजे ह्या पर्वताची उंची अल्मोऱ्याइतकी म्हटली पाहिजे. ज्यानें पर्वतावरचा प्रवास केलेला नाहीं त्याच्या दृष्टीनें ही उंचीची चर्चा आणि बारकाई अर्थहीन वाटेल. परंतु पर्वतांच्या रसिकांना तर त्यांत क्रिकेट मॅचच्या स्कोअरपेक्षांहि अधिक रस वाटेल.

मीं पायऱ्या चढायला सुरुवात केली. आणि पोटांतल्या फळांनीं तक्रार करायला सुरुवात केली. पोटांत उजवीकडे दुखायला लागलें. मनांत भीति वाटायला लागली कीं वाटेंतच कदाचित् मुक्काम ठोकावा लागेल. परंतु पुष्कळ वेळां अशा प्रकारची भीति अस्थानीं असते. जो कच्च्या दिलाचा असतो त्यालाच तिची तमा. इतका उंच पर्वत चढायचा आहे असा विचार मनांत आणून माझे सोबती भरभर चालूं लागले. मी अशी चूक कसा बरें करीन ! रस्त्याची उंची आणि चालण्याची गति यांचें प्रमाण राखण्याची कला माझ्या हातांत, खरें म्हटलें तर माझ्या पायांत आली आहे. मी आस्ते आस्ते कदम दर कदम चालूं लागलों आणि कोणत्याहि ठिकाणीं विसावा घेण्यासाठीं किंवा गप्पा मारण्यासाठीं न थांबतां शेचाळीस मिनिटांत टिपुसुलतानाच्या ग्रीष्म विहारांत येऊन दाखल झालों. हा रस्ता सव्वा तासाचा आहे म्हणतात. परंतु मला खात्री वाटते कीं कोणीहि सामान्य मनुष्य माझ्या पद्धतीनें चालल्यास ४५ मिनिटांत पोहोंचलाच पाहिजे.

दुसरीं पंधरा मिनिटें ! आणि ओकलॅण्डस्‌मध्यें पोहोंचून मी गांधीजींची पायधूळ घेतली. हवा उत्तम होती. जसजसें वर चढावें तसतशी दूरचीं शेतें, डोंगर, खेडीं आणि तलाव दिसूं लागले. तांबडी लाल जमीन आणि त्यांत चांदीच्या रसाप्रमाणें चमकणारे तलाव ! असलें दृश्य निर्माण करूं म्हटलें तर कठिण. आणि ह्या विस्तीर्ण प्रदेशांतले अनेक रस्ते मनुष्यवस्ती शोधत शोधत दूरवर जात होते. माणसाला जर यात्रेचें पुण्य मिळत असेल तर यात्रा कर-विणाऱ्या ह्या रस्त्यांचें पुण्य किती ! दूर दूर जाणारे आणि दोहोकडच्या झाडांमुळें

ओळखूं येणारे रस्ते पर्वतावरून पाहून किती तरी विविध विचार मनांत उठतात. रस्त्यांची जात वणजाऱ्यांची आहे. जनता जनार्दनास तो संस्कृतीच्या संदेशवाहकाचें काम करतो. जंगलांचें हृदय भेदून माणसांना तीं उघडीं करून देतो. सगळ्या तऱ्हेच्या खाणाखुणा पुसून टाकणाऱ्या वाळवंटावरहि तो विजय मिळवितो. वाकडीं तिकडी वळणें घेऊन पर्वतांची खुशामत करीत तो त्यांच्या डोक्यावर चढून बसतो. नदी-नालेहि त्याला अटकाव करूं शकत नाहींत. मनुष्याच्या दुर्दान्त परिव्राजक इच्छाशक्तीचा तो प्रतिनिधि आहे.

नंदीचा रस्ता सिंहगडच्या रस्त्याप्रमाणें लांब किंवा बिकट नसल्यामुळें मी जर त्याचें विस्तृत वर्णन लिहूं लागलों तर तो औचित्यभंग होईल. सिंहगडच्या रस्त्याला रात्रींची वाघोबाची स्वारीहि भेटायची. परंतु येथें ससा सुद्धां आढळायचा नाहीं. ज्या रस्त्यावर विजेचे दिवे आहेत त्याला कोणी जंगली रस्ता कसें म्हणेल ? येथें तर ठिकठिकाणी पाट्या लावल्या आहेत कीं येथें संस्थानातर्फे इतकीं पेरूचीं झाडें लावलेलीं आहेत, इतकीं मोहोगनीचीं आहेत, इतकीं करंजीचीं आहेत इ. सर विश्वेश्वरय्यांनीं नंदीला शृंगारायला सुरवात केली आणि सर मिर्झा इस्माइलनीं तें कार्य पुरें केलें. आतां खालून वर मोटारी जाऊं शकतील असा रस्ता झाला कीं संपलें ! म्हणजे मग नंदीची शांति आणि सात्त्विकता आसपासच्या टेंकड्यांकडे धूम ठोकील. आणि येथें हॉटेल, मौज, शौक आणि रेडीयो येतील. मुंबईनें मलबार हिलची जी दशा करून टाकली तीच बंगलोर नंदीची करील. भोगलोलुप माणसाला प्राकृतिक सौंदर्य बिघडविणें चांगलेंच साधतें !

थकले भागलेले तुम्ही वर आलांत कीं पहिला आनंद म्हणजे येथली झाडी ! आंत शिरतांच राजपुरुषाप्रमाणें उभे असलेल्या विशाल खोडें असलेल्या युकॅलिप्टसच्या उंच सरळसोट वृक्षांचें बन दिसतें ! जिकडे दृष्टि टाकाल तिकडे हीं झाडें आणि यांचीं चिल्लीं पिल्लीं काळजीपूर्वक लावलेलीं दिसतील; मधून मधून कापराचीं झाडेंहि आहेत. सुरूचीं पण आहेत.

दुर्गाच्या मधोमध एक विशाल पुष्करणी आहे तिचें नांव 'अमृतसरोवर.' चहुंकडल्या उतरत्या पायऱ्या माणसाला पाण्यापर्यंत धांवत जाऊन हात, पाय, मस्तक आणि पोट शांत करण्याचें निमंत्रण देत असतात. परंतु संस्थानचे नियम फारच उपयोगी आणि कडक असल्यामुळें आंत कोणीहि मनुष्य किंवा जनावर उतरूं शकत नाहींत. कायद्याला न जुमानणारीं कांहीं पानें वाऱ्याच्या

मदतीनें आंत उतरून जलविहार करूं लागतात. पण त्यांची ती क्रीडा दीर्घ कालपर्यंत कोणी चालूं देत नाहीं. इतकें स्वच्छ राखलेलें पाणी आरोग्यप्रद असेल हें वेगळें सांगण्याची जरूर नाहीं. तरीहि दर महिन्याला डॉक्टरांकडून ह्या पाण्याचें रीतसर रासायनिक पृथक्करण करविण्यांत येतें. हल्लीं तर दर पंधरा दिवसांनींच होतें.

आपल्या तीर्थस्थानांतील पाणी स्वच्छ राखण्याच्या बाबतींत शास्त्रांनीं दंडक घालून दिलेले आहेत. परंतु आमच्या लोकांनीं प्रत्येक ठिकाणीं इतकी घाण करून ठेवली आहे कीं, तीं तीर्थस्थानें अनाचाराचें आगर आणि कॉलऱ्याचें माहेरघर बनलीं आहेत.

दुर्गाच्या दक्षिणेकडे महादेवाचें मंदिर आहे. त्यांत महादेवाबरोबर नंदी, अंबिका, कालभैरव इत्यादि अनेक कल्पिलेल्या मूर्ति ह्या असणारच. परंतु येथें येऊन राहिलेल्या पहिल्या वहिल्या ऋषीची पण मूर्ति येथें आहे. उष्माण्ड ऋषि हे त्याचें नांव.

पश्चिमेकडे एक तुटलेला कडा आहे. टिपूच्या काळीं ज्याला देहदंडाची शिक्षा होत असे त्याचा येथून कडेलोट करीत असत. महाराष्ट्रांतील प्रत्येक किल्ल्यावर अशा प्रकारचें स्थान असतेंच. सिंहगडचा कडेलोट तूं पाहिला आहेसच. येथल्या कडेलोटाला ‘ टिपूज ड्रॉप ’ म्हणतात. विजेच्या खुर्चीत बसवून माणसाला मारण्यापेक्षां ही पद्धति कमी खर्चाची आणि अधिक माणुसकीची आहे असें म्हणावें लागेल. माणसाला हवेंतली मुसाफरी करायला सोडून दिलें कीं वाटेतच तो भीतीनें अर्धमेला व्हायचा. निदान बेभान तरी व्हायचा. कोहळ्याप्रमाणें खालीं जाऊन आदळला कीं क्षणांत चक्काचूर. प्रेताची व्यवस्था लावायचेंहि कारण नाहीं; वाघ, लांडगे, कोल्हे, घारी ती मेजवानी झोडायला टपलेलेच असतात.

आम्ही रोज सकाळ संध्याकाळ खूप फिरतों. हवा तर सुगंधानें दरवळून गेलेली असते. वारा मोठमोठ्यानें वातावरणाचा रिपोर्ट देत असतो. पांढरीं, लाल फुलें जणुं आपल्या उन्मादांत डुलत असतात. आणि हरतऱ्हेचे “ गगनविहारी खगवैतालिक ” आपापल्या निवडक लकेरी हवेवर सोडत असतात. अशा वेळीं भटकण्याचा कोणाला थकवा यावा ! आणि थकवा आलाच तर ठिकठिकाणीं दगडी बाकें ‘ या महाराज, बसा महाराज ’ म्हणून मनधरणी करीत असतातच.

पण मनधरणी करण्याचा खरा ठेका तर येथल्या सूर्याच्या सोनेरी किरणांनींच घेतला आहे. हल्लीं सगळीकडे अभ्रें असतातच. त्यामुळें सूर्योदयाच्या वेळीं त्यांचा लपंडाव आणि सूर्यास्ताच्या वेळींहि तीच क्रीडा. आणि सूर्याचे किरण पसरले म्हणजे आसपासचे आणि दूरदूरचे असंख्य जलाशय एकदम चमकूं लागतात. घटकेंत वाटतें, कल्हईचा रस ओतला गेला असावा तर घटकेंत वाटतें, नभोंच्या चांदव्याचें झुंबर तुटून त्याचे तुकडे इतस्ततः विखुरलेले आहेत. कधीं मयासुराला इंद्राचा राजमंडप उभारायचा आहे त्याची ही पूर्वतयारी आहे असा भास होतो, तर कधीं लोकांकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून पृथ्वीमातेनें आपलें सोनें आणि चांदी सगळीच पोटांतून ओकून टाकली असावी असें वाटतें. अथवा वनस्पतिसृष्टि आणि प्राणिसृष्टीच्या उपासमारीचा विचार मनांत येऊन धरणीमातेनें ही स्तन्यधारा सोडली नसेल हें तरी कशावरून? कसेंहि असो, परंतु पहाल तिकडे जलाशय हें येथल्या दृश्याचें वैशिष्ट्य आहे. आणि इतकें असूनहि ही भूमि बंगालच्या भूमीप्रमाणें दलदलीची नाहीं. चांगली तीन हजार फूट उंचीची खडबडीत जमीन आहे. चिखलाचें नांव नाहीं!

काल रात्रीं मोठें वादळ झालें. सोसाट्याचा वारा सुटला होता. बोराएवढाले थेंब पडूं लागले. आम्ही दारें-खिडक्या लावून पक्ष्यांचीं पिल्लें घरट्यांत बसतात तसे बसलों. इतक्यांत कडाड्-कड् करीत वीज पडली आणि घरांतले विजेचे दिवे मालवले. अशा वेळीं अंधाराची खुमारी कांहीं औरच असते. अंधार हें कांहीं दारिद्र्य नव्हे, उलट समृद्धि आहे. पृथ्वीपेक्षां आकाश ज्याप्रमाणें अनंतपट विशाल आहे, वाणीपेक्षां मौन जसें अनंतपट मोठें आहे, त्याचप्रमाणें प्रकाशापेक्षां अंधार, तुलना न करतां येण्याइतका वैभवशाली आहे.

अवसेच्या रात्रीं कोट्यवधि तारे चमचम करीत असतात. परंतु ते सगळे मिळून आकाशांतली पोकळी तसूभरहि कमी करूं शकत नाहींत. जगांतल्या साऱ्या ज्योति एकत्र झाल्या तरी 'सगळीकडे अंधारच आहे' इतकेंहि जाहीर करण्याची शक्ति त्यांच्यांत नाहीं. सबंध हिंदुस्थानांत जर दोन तीनच झाडें असतील तर त्याला कोणी वन किंवा जंगल म्हणणार नाहीं. तसे आकाशांतले नव लाख तारे एकत्रित केले तरी त्याला कोणी 'वस्ती' म्हणणार नाहीं.

(मे १९३६)

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 39239 दि:
क्रमांक नों: दि:

# दक्षिण भारताचें उत्तुंग काव्य

## ११

खरोखर नीलगिरि पर्वत दक्षिण भारताचें उत्तुंग काव्य आहे. सह्याद्रीच्या पूर्व आणि पश्चिम पर्वतराजींचें मीलन येथें होतें. कन्याकुमारीजवळचा तीन सागरांचा संगम पहातांना त्याच्या भव्यतेमुळें मन भारावून जातें; तितकी जरी नाहीं तरी थोडीबहुत तशीच स्थिति नीलगिरीवरून आसपासचा निसर्ग पहातांना होते. पूर्व आणि पश्चिम समुद्र इतके जवळ असून सुद्धां भूपृष्ठाचा एक आठ हजार फूट उंचीचा सुळका वर जाणें ही कांहीं मामुली गोष्ट नाहीं. दुरून पहातांना कोणताहि डोंगर नीलवर्ण दिसतो. असें असतांना आमच्या पूर्वजांनीं याच पहाडाचें नांव नीलगिरि असें कां ठेवलें असावें? नीलगिरि इतकें काव्यमय नांव असतांना इंग्रजांनीं त्याला ‘ब्ल्यू मौंटन’ म्हटलें आहे.

मद्रासहून उटीला जाणाऱ्या रेल्वेगाडीला ‘ब्ल्यू मौंटन ट्रेन’ म्हणतात. हें नांव कांहीं चांगलें वाटत नाहीं. नीलगिरि कसें कान व डोळे यांना थंडावा देणारें नांव आहे. तपासाअंतीं नंतर मला समजलें कीं, नीलगिरीवरती व आसमंतांत जिकडे पहावें तिकडे दोन-तीन प्रकारचीं गर्द निळीं फुलें दाटीवाटीनें उगविलेलीं असतात आणि म्हणून या पर्वतराजीचें नांव नीलगिरि झालें. किती सार्थ नांव आहे!

संस्कृतमध्यें निळ्या आणि हिरव्या रंगांत फारसा फरक करण्यांत येत नाहीं. हिरवीगार झाडी असलेलीं जंगलेंच्या जंगलें नीलगिरीवर आहेत. बहुधा अशी झाडी प्रत्येक उंच पर्वतावर आढळत नाहीं.

नीलगिरीचें दर्शन आणि आरोहण मीं दोन वेळां केलें आहे. मद्रासहून निघून पेरियनायकम, पालयम आणि मेट्टुपालयम-मार्गें पहाडी रेल्वे-रस्त्यानें उटी किंवा उटकमंडला गेलों होतों तेव्हां नीलगिरीचें पहिलें दर्शन मला घडलें. म्हैसूरहून मोटारींतून उटीला जाऊन तेथें थोडा वेळ राहून त्याच मोटारीनें

पेरियनायकम-पालयमला ज्या वेळीं गेलों तेव्हां नीलगिरीचें दुसऱ्यांदा दर्शन झालें. म्हणजे निरनिराळ्या बाजूंनीं, निरनिराळ्या वेळेला नीलगिरीची शोभा पहाण्याचा लाभ मला झाला.

पहाडी दंतुर रेल्वे म्हणजे एक प्रकारचें खेळणेंच म्हणा ना. रस्ता इतका चांकडातिकडा आहे कीं थोडेच डबे असूनहि ही गाडी तीन-चार ठिकाणीं नागमोडी झालेली असते. इंजिन चालविणारा सारथी आणि गाडीची सर्व जबाबदारी संभाळणारा गार्ड कोणत्याहि ठिकाणीं एकमेकाला पाहूं शकत नाहींत. म्हणून प्रत्येक डब्यांत एक एक माणूस ठेवण्यांत आलेला असतो. त्याच्याजवळ हिरवा आणि लाल बावटा दिलेला असतो. गार्डानें लाल बावटा दाखवितांच शेजारच्या डब्यांतील माणूस लाल बावटा फडकावतो. ताबडतोब याच गतीनें व पद्धतीनें प्रत्येक डब्यांतून लाल बावटा दाखविला जातो. असें करत करत गाडी चालविणाऱ्या ड्रायव्हरला गार्डाची सूचना पोहोंचविली जाते.

या रेलगाडीची चढण इतकी उभी आहे कीं, रेल्वेच्या दोन रुळांच्या दरम्यान दांते असणारी एक पट्टी ठेवलेली असते. त्यावर दांते असणारें आगगाडीचें चक्र बसविलेलें असतें. आणि ड्रायव्हरनें ब्रेक लावतांक्षणींच दंतुर चाक दंतुर-पट्टींत अडकून बसतें आणि गाडी जागच्या जागीं उभी रहाते, अजिबात खालीं घसरत नाहीं. कांहीं वेळ या यांत्रिक युक्तीच्या अवलोकनांतच आमचें मन गुंतलें होतें. माझ्याबरोबर श्री. जाजु यांची अनसूया आणि नाना धर्माधिकारी होते. त्यांना दंतुर रेल्वेच्या कार्यपद्धतीबद्दल कांहीं कांहीं गोष्टी मीं समजून देत होतों. इतक्यांत आसपासच्या पर्वतशिखरांकडे माझें लक्ष गेलें. तिकडे लक्ष जाण्याचा अवकाश, मग कसली चढण आणि कसली दंतुरपद्धति ! गिरिकंदराची शोभा पाहून माझें भान हरपलें होतें.

पर्वताची चढण चढून आपण जसजसे वर जातों तसतशी वनस्पतिसृष्टि बदलत असते. अमूक वृक्ष अमुक हजार उंचीपर्यंतच उगवायला तयार असतात. एखादे वेळीं राजस्थानच्या रेताड वाळवंटांतले उंट डोंगर चढण्यास तयार होतील पण हे वृक्ष आपली मर्यादा सोडून खालींहि जाणार नाहींत किंवा अधिक उंचीवरहि जात नाहींत. वृक्षततींतील ही वर्ण-व्यवस्था चटकन लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं.

प्रथम कुन्नूर लागलें. तेथील हवामान सौम्य आणि मजेदार आहे. मला इतकेंच माहीत होतें कीं, कुन्नूरमध्यें भारत सरकाराचें आहार-संशोधन केंद्र आहे. प्रत्येक प्रांतांतील लोकांचा आहार आणि त्यांतील सत्त्वांश यांचें संशोधन येथें होतें. आहार-शास्त्रावरचें मॅक्कॅरिसनचें एक पुस्तक मीं वाचलें होतें. नंतर अक्रोइडचाहि ग्रंथ अवलोकन केला; आणि जरुरीपुरतें आहारशास्त्राचें ज्ञान घेतलें.

कुन्नूरनंतर आलें उटकमंड. या डौलदार नांवाचा इंग्रजांनीं उटी असा संक्षेप केला. मूळ नांवांतील नाद किती श्रुतिमनोहर आहे – नांवांतील भव्यतेचा साक्षात्कार त्याची फोड केली म्हणजे कळून येते – उदधिमंडल. केरळमंडलचें गोऱ्या इंग्रजांनीं ज्याप्रमाणें कारोमँडल केलें तसेंच त्यांनीं उदधिमंडलचें उटकमंड बनविलें. ह्या गोऱ्या माणसांना आपल्या सुंदर सुंदर फुलांना ललित नांवें देतां आलीं नाहींत. आमच्याकडील सुंदर नांवें बिघडवून टाकल्याशिवाय त्यांना बोलतांच येत नाहीं.

उदधिमंडलमध्यें एक दिवस आणि एक रात्र आमचा मुक्काम होता, परंतु तेवढ्या वेळांत आम्ही भटकलों मात्र खूप. तेथील गव्हर्नरच्या प्रासादाच्या भोंवतीं एक जंगी वनस्पति-बाग आहे. याला ‘ बोटॅनिकल गार्डन ’ म्हणतात. त्या बागेंत प्रत्येक प्रकारचें झाड आपल्याला पहावयास सांपडतें. ही बाग पहाण्याच्या बाबतींत कोणतीच अडचण नव्हती त्यामुळें बागेच्या प्रत्येक विभागांत फिरून सर्व शोभा मनसोक्त पाहिली.

नंतर रामकृष्ण मिशनच्या सेवाश्रमांत जाण्याचा आमचा बेत होता; पण जोराचा पाऊस सुरू झाला आणि जमीन इतकी निसरडी झाली कीं पाय सारखे घसरूं लागले. मग तसेच आम्ही मागें फिरलों. इतक्या उंचीवर एवींतेवी आलोंच आहोंत तर येथील दोड्डाबेट्टाचें शिखर पाहून घ्यावें असा दुसऱ्या दिवशीं विचार केला. या शिखराची उंची ८६० फूट आहे.

घोड्यावरून किंवा हत्तीवरून बसून जातांना असें प्रतीत होतें कीं, त्या प्राण्याची वाहून नेण्याची शक्ति ही आपलीच शक्ति आहे. मोटार चालवितांना जो जोश येतो त्यामुळें तिच्या वेगामागची शक्ति आपलीच आहे असेंहि वाटतें. अगदीं त्याचप्रमाणें उत्तुंग शिखर चढतांना मनुष्य कल्पनेच्या भरारींत इतका मस्त होतो कीं, क्षणभर त्याला वाटतें कीं शिखराची उंची म्हणजे आपलीच उंची !

येथें असली कल्पनेची मस्ती नसती तरी देखील माणसाला धुंद करून सोडण्याला पुरेसें असें दुसरें एक दृश्य येथें आहे. हा सारा प्रदेश युकॅलिप्टस्च्या उंच उंच वृक्षांनीं व्यापलेला आहे. कांहीं ठिकाणीं तर ८० ते ९० फूट उंचीचे वृक्ष होते. आमच्याबरोबर एक वाटाड्या होता, त्यानें सांगितलें कीं, हे तर बालवृक्ष आहेत. ('These are mere babies'). अजून त्यांना पुरता सुगंध प्राप्त झाला नाहीं. खरोखर युकॅलिप्टस्च्या झाडाचा सुगंध फारच मस्त असतो. त्याच्या सुगंधानें सारा आसमंत पुरेपूर भरून ओसंडून जात होता. एक प्रकारची धुंदीच चढते त्या सुगंधाची.

नीलगिरीवर जी एक छोटीशी उपत्यका (पठार) आहे तिची शोभा ती केवळ इतक्या उंचीवर आहे म्हणूनच.

आम्ही नंतर नीलगिरि उतरलों आणि मंगळूरला गेलों आणि तेथून मुंबईला परत आलों.

मी दुसऱ्यांदां जेव्हां उटीला गेलों होतों, तो म्हैसूरचा दसरा समारंभ पाहूनच मोटारीनें गेलों होतों. तेथून उतरून आम्हांला मदुरेला प्रयाण करावयाचें होतें. या वेळीं माझ्याबरोबर चि. सरोजिनी होती. कांहीं वेळ पृथ्वीराज असरहि आपल्या मोटारींतून आमच्याबरोबर आले होते.

म्हैसूरमधील रस्ते दुतर्फा असणाऱ्या वड, पिंपळ, निंब अशा मोठमोठ्या वृक्षांनीं आच्छादलेले आहेत. ते आपलें जीवन पथिकांना सांवली देऊन कृतार्थ करतात. आम्ही भर दुपारीं जेव्हां उटींमध्यें प्रवेश केला तेव्हां आम्ही इतकें दमलों भागलों होतों कीं कांहीं खावेंसें सुद्धां वाटेना. परंतु तेथल्या शीतल हवेनें आमचा श्रमपरिहार झाला, थकवा चटकन नाहींसा झाला. मग मात्र मनसोक्त भोजन केलें आणि पूर्वपरिचित अशा नीलगिरीचें दुसऱ्यांदा सौंदर्यप्राशन केलें.

त्यानंतर मी व चि. सरोजिनी स्वित्सर्लंडमध्यें गेलों होतों. तेथें मॉंट्र्यू (Montreux) ते रोचर डी नाया (Rocher de Naya) या दरम्यानच्या अशाच दंतुर रेल्वेमध्यें आम्ही बसलों होतों.

खरें पाहिलें तर नीलगिरीचा प्रदेश टोडा, कुरुंबा इत्यादि वन्य आदिवासी जातींच्या लोकांचाच आहे. येथें जेव्हां हिंदु राजांचा अंमल होता तेव्हां ते या वन्य जातियांच्या जन्मसिद्ध हक्कांचें रक्षण करीत असत. इंग्रजांचें राज्य आलें

अनुक्रम

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२३१२



आणि त्यांच्या हालांना प्रारंभ झाला. त्यांचें सर्वस्व लुटल्यावर कांहीं एका लहानशा प्रदेशांत त्यांना बेरकसे अधिकार दिले गेले. गुजरातींत एक म्हण आहे कीं, ऐरण छिनावून घेतली आणि सुई दान केली. म्हणजे आंवळा देऊन कोहळा काढला. नीलगिरीची यात्रा मीं दोनदां केली खरी, पण पायकारा व कारतेरी हे प्रेक्षणीय प्रपात मी पाहूं शकलों नाहीं.

नीलगिरि पर्वतराजीच्या उतरणीवर कॉफी पुष्कळ प्रमाणांत पिकते. युकॅलिप्टस्‌पासून जें तेल काढतात त्याला निलगिरी तेल म्हणतात. ज्यांच्यापासून क्विनाइन निघतें ते सिंकोना वृक्षाहि येथें बरेच आहेत. येथील प्राणीसृष्टीमध्यें सुद्धां विविध प्रकारचे पशुपक्षी आहेत. हत्ती, हरीण, सिंह जसे आहेत तसे प्रवासी पक्षी, लहान मोठे साप या नीलगिरीच्या आश्रयानें रहातात.

इंग्रजांनीं येथें येऊन येथील सर्व परिसराची शोभा थोडीबहुत वाढविली. त्यांनीं विश्रामसाधनें तयार केलीच पण थंड हवेच्या ठिकाणीं जाऊन विश्रांति कशी घ्यावी हेहि शिकविलें. आपण हीं गिरिकंदरांतील स्थानें ऋषीमुनींच्या तपाचरणासाठीं राखून ठेवलीं होतीं. उंच डोंगरावर कपडे जसे जास्त घालावे लागतात तसा आहारहि भरभक्कम घ्यावा लागतो. तेव्हां अशा ठिकाणीं रहाच कशाला ? जीवनांत ऐषाराम करण्याचे पाठ आपण प्रथम मोगलांपासून शिकलों आणि नंतर इंग्रजांपासून.

नीलगिरि पर्वत म्हणजे दाक्षिण भारताचें उत्तुंग काव्यच आहे आणि तें तसेंच कायम रहाणार. सह्याद्रीचा उतार जेथें संपतो आणि मलय पर्वताच्या चढणीला प्रारंभ होतो तेथें पालघाटच्या मोठ्या घाटाची रखवाली करणारा नीलगिरि पहारेकरी किंवा रक्षणकर्ता आहे. साधुलोक म्हणतील कीं, छे, ही तर आमची तपोभूमि आहे; गिरिजन आपला दावा मांडतील कीं, ही आमची ईश्वरदत्त मातृभूमि आहे. परंतु स्वतः नीलगिरि मात्र म्हणेल, ‘ मी विविध तऱ्हेच्या वनस्पतींचा आश्रयदाता आहें; आणि बाकीचे सारे माझ्या ठायीं वाढलेल्या वनस्पतींचेच आश्रित आहेत. त्यांना कोण हिशोबांत घेतो ! ’

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ३१२३१ वि. ग्रं.
क्रमांक २०६९ नों. दि.